
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
ग्रं. क्र. १४८३



# मराठी साहित्य दर्शन

१२

कपिल

REFBK-0013095
REFBK-0013095

**स्वा. वि. दा. सावरकर**

अ. वि. गृह प्रकाशन पुणें

अ. वि. गृह प्रकाशन

# मराठी साहित्य-दर्शन

पुष्प बारावें

स्वा. डॉ. वि. दा. सावरकर

*

संपादन व प्रस्तावना

म. श्री. दीक्षित

REFBK-0013095

२८ मे]      मूल्य रुपये २.५०      [१९६३

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणें २.

: प्रकाशक :
दि. दा. गांगल, एम्. एस्‌सी.
अ. वि. गृह प्रकाशनासाठी,
१७८६, सदाशिव पेठ, पुणें २.

*

प्रथमावृत्ती, २८ मे १९६३
© प्रकाशकाधीन

: मुद्रक :
दि. दा. गांगल, एम्. एस्‌सी.
लोकसंग्रह छापखान्यासाठी,
१७८६, सदाशिव पेठ, पुणें २.

# प्रकाशकाचें निवेदन

मराठी साहित्य-दर्शनाचें हें पुष्प वाचकांच्या हातीं देण्यांत आम्हाला धन्यता वाटत आहे. मराठी साहित्यांतील थोर लेखकांच्या वाङ्मयाचा परिचय थोडक्यांत करून द्यावा असा त्याच्या मागचा हेतु आहे. मराठींतील नामवंत साहित्यिकांचें विपुल लेखन अनेक ग्रंथांच्या द्वारें, मासिकें, साप्ताहिकें, वृत्तपत्रें व रेडिओ इत्यादि विविध माध्यमांच्या द्वारें प्रकाशित होत असतें. ग्रंथालयांत किंवा ग्रंथागारांत पाऊल टाकलें की, एखाद्या लेखकाचींसुद्धा असंख्य पुस्तकें आढळून येतात. तेव्हा अशा स्थितींत कोणतें पुस्तक वाचूं व कोणतें नको, याचा संभ्रम माणसाला पडतो व त्यामुळें तो थोडासा गोंधळूनहि जातो. याशिवाय एखाद्या लेखकाच्या सर्व ग्रंथांचें वाचन व परीक्षण करणें प्रत्येक व्यक्तीला शक्य नसतें—निदान सध्यांच्या यांत्रिक-युगांत तेवढी सवडहि सर्व व्यक्तींना मिळतेच असें नाही. परंतु नामवंत लेखकाच्या सर्व वाङ्मय-प्रकारांचें दर्शन घडावें, ही इच्छा मात्र व्यक्तीच्या ठिकाणीं असते. अशा इच्छेची पूर्ति या मालेच्या द्वारें होईल अशी आम्हांस खात्री वाटते.

मराठींतील कांहीं नामवंत साहित्यिकांचा या दृष्टीने परिचय करून द्यावा, अशा हेतूने मालेचा प्रारंभ करण्यांत आला आहे. नामवंत साहित्यिकांच्या विपुल वाङ्मय-भांडारांतून निवडक व उत्कृष्ट, शिवाय त्यांत साहित्यिकाने लिहिलेले शक्यतों सर्व तऱ्हेचे वाङ्मय-प्रकार यावेत या हेतूने आम्ही संपादकांना विनंती केली व ती त्यांनी मान्य केली, याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. मराठी साहित्यप्रेमी वाचकांना हें पुष्प अर्पण करून हें निवेदन पूर्ण करतों.

२८ मे, १९६३.

व्यवस्थापक,
अ. वि. गृह प्रकाशन पुणें २.

# सावरकर : व्यक्ति आणि वाङ्मय

स्वातंत्र्यवीर सावरकरांचें साहित्य म्हणजे धारदार तळपती तलवार आहे. पण ही तलवार रांगड्या सैनिकाची नाही की क्रूर सेनापतीची नाही. तर एका प्रतिभासंपन्न, वीर्यशाली आणि विचारवंत महापुरुषाच्या हातची आहे ती. या तलवारीची धार जितकी सूक्ष्म, या तलवारीचें पाणी जितकें चमकदार, तितकीच या तलवारीची मूठ नक्षीदार नी कलात्मक आहे. ज्या व्यक्तीने ही तलवार उचलली, पेलली नी हाताळली त्या व्यक्तीची मूठ म्हणजे वज्रमूठ आहे, त्या मुठीमागील हात हा खड्गहस्त आहे आणि त्या हाताला आदेश देणारें मन महाकवीचें आहे, देशभक्ताचें आहे, हिंदु-संघटकाचें आहे, समाजसुधारकाचें आहे, बलोपासकाचें आहे आणि व्यवहारी विचारवंताचें आहे. अशी ही तलवार म्हणजे मराठी भाषेची भवानी तलवारच आहे. ही तलवार पूर्वी समर्थांनी चालविली, मोरोपंतांनी हाताळली, 'माला' कारांनी फिरवली, लोकमान्यांनी उगारली, अच्युत बळवंतांनी खेळवली, 'काळ' कर्त्यांनी तळपवली आणि त्यानंतर ती सावरकरांनी पेलली. ज्वलंत, राष्ट्रप्रेम आणि सर्वांगीण समाजहिताची कळकळ असल्याशिवाय ही तलवार कोणीही हाती धरू शकत नाही आणि यशस्वीपणे तिची करामत दाखवू शकत नाही. स्वदेश, स्वसमाज आणि स्वभाषा यांच्या उन्नतीसाठी उत्कट नी उग्र भक्ति असणारा सावरकरांसारखा क्रियाशील साहित्यिकच ही तलवार पेलू शकतो.

मराठी माणसाला अभिमान वाटावा असें सावरकर हें नांव आहे. सावरकर या नांवांत कोण जादु आहे ! या नांवांत केवढी स्फूर्ति आहे ! सावरकरांची मूर्ति ती केवढी, पण तिने कीर्ति केवढी मिळविली ! उंची पहावी ती जेमतेम पांच फूट दोन अडीच इंच. वर्ण पीतगौर. प्रकृति नाजुक. वेष सदासर्वकाळ एक ठराविक. पायांत बूटमोजे, शुभ्र तलम धोतर, स्वच्छ शर्ट, त्यावर पांढरा स्वच्छच कोट, हातीं नित्य छत्री, आणि उंच--विस्तीर्ण अशा भालप्रदेशावर सर्वपरिचित अशी वाटोळी काळी टोपी. सावरकरांच्या नाजुक वामनमूर्तीचें खरेंखुरें वैशिष्टच नी वैभव म्हणजे त्यांची तेजाळ मुद्रा आणि चष्म्या आडून चमचमणारे गरुडदृष्टीचे डोळे. त्या डोळ्याखालची नासिकाहि सरळ नी बाकदार. दोन्ही कानाजवळील लांब कल्ले त्यांच्या मुद्रेची शोभा आणखीनच वाढवतात. अशा या तेजस्वी वामनमूर्तीचें ज्यांना दर्शन घडलें

ते नशिबवान होत.. ज्यांनी या मूर्तीचें मूर्तिमंत वक्तृत्व ऐकलें तेहि भाग्यवान होत. अभागी ते की, ज्यांनीं या विनायकाच्या साहित्यसृष्टींत संचार केला नाही. कमनशिबी ते की, ज्यांनी पक्षांधतेमुळे सावरकरांच्या ' उत्तम-उदात्त-महन्मधुर ' अशा साहित्याकडेहि पाठ फिरविली आणि त्यांच्या वाङ्मयीन श्रेष्ठतेची कांहीशी उपेक्षा केली.

सावरकरांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी असीम त्याग केला, लोकोत्तर पराक्रम केला नी अनंत हालअपेष्टा सोसल्या. सावरकरांचें चरित्र हें इतक्या विविध रसांनी व नाट्यपूर्ण घटनांनी भरलेलें आहे की, तें यथार्थ वर्णावयास महाकाव्याचेंच माध्यम हवें. वीर सावरकरांचें वीरत्व अनेकांगी आहे. त्यांचा कीर्तिध्वज विविधरंगी आहे. या ध्वजाने आजवर अनेक रणधुमाळ्या पाहिल्या. अनेकदा त्याला हेलकावे बसले, अनेकदा त्याने गोते खाल्ले, अनेकदा तो खाली आला, वर गेला. कांही वेळा तो धुळीला मिळाल्याचाहि भास झाला. पण नाही. साऱ्या आपत्काळांवर विजय मिळवून या मृत्युंजयाचा कीर्तिध्वज आजहि ताठ मानेने उभा आहे. संघटन नी सामर्थ्य यांची तेजस्वी शिकवण देणारा हा द्रष्टा विचारवंत नेता आज वृद्धापकाळामुळे अंथरुणाला खिळला आहे. पण त्याच्या शिकवणीची आज सर्वांनाच वारंवार आठवण येत आहे. स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीचा वडवानळ पेटवलेल्या सावरकरांनी त्या स्वातंत्र्याचा अर्थहि सांगितला, तें राखण्याचा मार्गही दर्शविला. स्वातंत्र्यप्राप्ति आणि स्वदेशोन्नति हेंच सावरकरांचें ध्येय नी जीवितकार्य होय. या ध्येयासाठी त्यांनी पराकाष्ठेचा त्याग केला. हालअपेष्टा सोसल्या. नुसत्या शारीरिक नव्हे तर मानसिकही. सावरकरांचें सारें जीवन म्हणजे यज्ञ आहे, झुंज आहे. ही झुंज त्यांना कधी परसत्तेशी, कधी स्वकीयांशी तर कधी दैवाशीसुद्धा द्यावी लागली आहे, व ती देतांना कधी कारावास, कधी लोकप्रियता, कधी अप्रियता-जननिंदा, तर कधी शारीरिक व मानसिक यातनाहि भोगाव्या लागल्या आहेत. पण अनुकूल व प्रतिकूल परिस्थितींत त्यांनी आपली निष्ठा कधीहि ढळू दिली नाही. भारतीय राष्ट्र आणि या राष्ट्राचा प्रमुख घटक असणारा हिंदुसमाज यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी जें जें, ज्या ज्या वेळी योग्य वाटलें तें तें सावरकरांनी निर्भीडपणे सांगितलें, लिहिलें नी स्वत: आचरून दाखविलें.

सावरकरांनी जें उत्कट नी सरस काव्य लिहिलें आणि ओजस्वी वैचा-

रिक गद्य निर्मिलें त्याची पार्श्वभूमि वरीलप्रमाणे आहे. ती समजून घ्यायची म्हणजे सावरकरांचें मन, बुद्धि, ध्येय, निष्ठा, जीवितकार्य यांचा मागोवा घेणें प्राप्त ठरते. प्रमत्त प्रतिभा आणि प्रखर बुद्धिमत्तेचें देणें असणाऱ्या सावरकरांनी सारें लेखन केलें तें हेतुपूर्वक आणि आपल्या जीवितकार्याच्या प्रचारासाठी. सावरकरांच्या अंगीकृत कार्यांतूनच त्यांचें साहित्य निर्माण झालें आहे. सावरकरांचें जीवितकार्य समजल्यावाचून त्यांच्या साहित्याचें यथार्थ दर्शन होऊ शकत नाही. व्यक्तिगत जीवन आणि साहित्य यांच्या परस्परसंबंधांविषयी तात्त्विक चर्चा करणाऱ्यांनी सावरकर-साहित्याचा विचार करून पहाण्यासारखा आहे. सावरकर-साहित्याची महनीयता ही केवळ सावरकर या व्यक्तीच्या नी कार्याच्या महनीयतेवर अवलंबून आहे. सावरकरांचें समर्थ व्यक्तिमत्त्व आणि त्यांचें अष्टपैलू कर्तृत्व वगळून त्यांच्या साहित्याचा विचार वा मूल्यमापन होऊ शकत नाही. राजकीय स्वातंत्र्य, सशस्त्र क्रांति, हिंदुसंघटन, अस्पृश्यतानिवारण, समाजसुधारणा, सैनिकीकरण, विज्ञानोपासना, भाषाशुद्धि, राष्ट्रवाद, हिंसा अहिंसाइत्यादि विषयांबाबतचे सावरकरांचे क्रांतिकारक विचार-मग ते कुणाला पटोत वा न पटोत-त्यांच्या साहित्यांत निरनिराळ्या रूपांत व्यक्त झाले आहेत. हे विचार क्रांतिकारक अशासाठी म्हणावयाचे की, सावरकरांनी ज्या कळकळीने, अटीतटीने, अभ्यासपूर्वक नी वाङमयीन ढंगाने ते मांडले तितके ते क्वचितच इतर कोणी मांडले असतील.

भावना आणि बुद्धि या दोन्ही शक्तींचा सावरकरांवर वरदहस्त आहे. ही भावना आणि बुद्धीहि उत्कट नी तीक्ष्ण आहे. या दोन्ही शक्ति असल्यामुळे सावरकरांच्या हातून काव्य-नाटच-कादंबरी यासारख्या सरस ललित लेखनाबरोबरच निबंध-चरित्र-इतिहास यासारखे वैचारिक गंभीर लेखनहि झालें. सावरकर हे जन्मजात प्रतिभासंपन्न कवि. परिस्थितीमुळे ते राजकारणादि क्षेत्राकडे वळले. पण त्यांचा मूळ पिंड उत्कट कवीचा आहे. त्यांचें कविमन हें वस्तुतः महाकवीचें आहे. जितकें कोमल नी तरल तितकेंच शाविल, कठोर नी युयुत्सूवृत्तीचें. काव्य आणि इतिहास हे त्यांचे बालपणापासूनचे अभ्यासाचे विषय. त्यांच्या आयुष्यांत ज्या अनेक अद्‌भुत नी नाटचपूर्ण घटना घडल्या त्याचें कारण म्हणजे पूर्वजांच्या पराक्रमाने भारावलेलें त्यांचें कविमन हें होय. सावरकरांच्या साऱ्या साहित्यांत त्यांचें काव्य हें अधिक उत्कट, विलोभनीय नी लोकप्रिय आहे. त्यांची काव्य-

रचना तीन प्रकारची आहे. देशभक्तीपर, कल्पनाप्रचुर आणि प्रचारात्मक. अर्थात या तिन्ही प्रकारच्या काव्यांतून उत्कटता, ओज, कल्पनाविलास विचारगांभीर्य आणि ध्येयनिष्ठा हे गुण समान आहेत. रसवत्तेच्या दृष्टीने श्रेष्ठ ठरणारी सावरकरांची कविता रचनेच्या दृष्टीने मात्र उणी पडते. या रचनेंतील प्रौढत्व , संस्कृतप्राचुर्य, पल्लेदारपणा नी खडबडीतपणा, रसास्वादांत अडथळे आणतो ही गोष्ट नाकारून चालणार नाही. सावरकरांच्या सार्‍या स्फुट कविता नी खंडकाव्यें अशा धर्तीची आहेत असें मात्र नाही. प्रासादिक, ओजस्वी नी हृदयंगम कविताहि सावरकरांनी निर्मिली आहे. तिचें प्रमाण अल्प असलें तरी ती गुणाने फार मोठी आहे.

सावरकरांच्या काव्यरचनेंत पदें, पोवाडे, फटके, स्तोत्रें, आर्या, आरत्या, भावगीतें, खंडकाव्यें इत्यादि प्रकारची विविधता जशी आढळते, तशीच ती त्यांच्या गद्य वाङमयांतहि आढळते. हें वाङमय वाङमयगुणांनी जसें रसोत्कट तसेंच वैचारिकतेच्या दृष्टीने संपन्न, तेजस्वी असें आहे. विशिष्ट विचार आणि ते अभ्यासपूर्वक पण जोरकस भाषेंत मांडण्याची पद्धति यामुळे या वाङमयाचा वाचकांवर विलक्षण प्रभाव पडतो. सावरकरांच्या ज्वलंत विचारांचा आणि ओजस्वी लेखणीचा प्रभाव असा जबरदस्त कीं, जोसेफ मॅझिनी, सत्तावनचें स्वातंत्र्यसमर, बाजीप्रभूचा पोवांडा या विषयांवरील त्यांचीं पुस्तकें जन्मतात न जन्मतात तोंच आंग्ल-सत्तेने ती जप्त केली. वाङमयाचें सामर्थ्य केवढें असतें, लेखणीचें शस्त्र किती प्रभावी असू शकतें याचें प्रत्यंतर सावरकरांच्या पुस्तकांनी इतिहासाला दाखवून दिलें आहे. अशा ऐतिहासिक वाङमयीन कृतींतून ऐतिहासिक चुका हुडकत बसणें म्हणजे अरसिकता दर्शविणें आहे. [सावरकरांचें गद्यवाङमय उत्कट भावना, प्रबल विकार आणि प्रखर विचार यांनी युक्त आहे. स्वातंत्र्यप्रेम, इतिहासाभिमान, झुंजारवृत्ति, समाजसुधारणेची कळकळ, काव्यात्मकता, चिंतनशीलता इत्यादि विविध गुणांनी हें वाङमय ओतप्रोत भरलेलें आहे.

सावरकरांसारख्या कष्टभोगी कर्मयोग्याने जे विविध प्रकारचें रसरशीत गद्यवाङमय लिहिलें तें वाचन खरोखर अचंबा वाटतो. ' कमले ' सारखें रम्योदात्त काव्य तर सावरकरांनी अंदमानच्या अंधेरींत बसून लिहिलें. तिथल्या अंधारांतून निसटल्यावर ते रत्नागिरीच्या फुफाट्यांत पडले. पण तेथेहि या महत्त्वाकांक्षी, जिद्दी आणि समाजकल्याणाची तळमळ असणार्‍या

प्रतिभावंत पंडिताने चौफेर लेखनाची आघाडी उघडली. राजकीय निर्बंध आणि सामाजिक चळवळी चालू असतांना त्यांचे लेखन अखंड चालू होते. या लेखनासाठी वाचन, चिंतन नी मनन ते केव्हा आणि कसे करीत हें त्यांचे त्यांनाच ठाऊक ! चरित्र, आत्मचरित्र, कथा-कादंबरी, नाटकें, इतिहास, निबंधप्रबंध, पत्रें--वार्तापत्रें इत्यादि विविध प्रकारचें वाङमय निर्माण करून सावरकरांनी मराठी भाषेची थोर सेवा केली आहे. भाषाशुद्धि आणि लिपिशुद्धीसारख्या प्रश्नांवर त्यांनी केलेली वाङमयीन चळवळ तर अपूर्वच म्हणावी लागेल. वाङमयगुणांनी समृद्ध असणारी सावरकरांचीं रोमांचकारी भाषणें हींसुद्धा वाङमयांत मोडू शकतात. या साऱ्या वाङमयांतून सावरकरांची भावना, बुद्धि, वृत्ति, विचारसरणी आणि तेजाळ व्यक्तिमत्व यांचें रम्य रौद्र दर्शन घडतें.

या वाङमयांतील राजकीय, सामाजिक आणि वाङमयीन विचारसरणी सर्वांना रुचेल अशी नाही. त्या विचारसरणीबाबत मतभेद असू शकतात. तसेंच सावरकरांच्या नांवावर छापलेली सर्वच पुस्तकें तंत्र, आशय, आणि अभिव्यक्ति या दृष्टीने उत्कृष्ट ठरतील असेंहि नाही. उदाहरणार्थ, सावरकरांना कथा नी नाटकें लिहीणें जमलें नाही. 'सन्यस्त खड्ग' हें त्यांचें विचारप्रधान गाजलेलें नाटकसुद्धा नव्या रंगावृत्तीमुळे रंगभूमीवर 'चढू' शकले. ऐतिहासिक स्वरूपाचें त्यांचें वाङमय उघडच भावनाधिष्ठित व प्रचारात्मक आहे. ज्या हेतूने तें लिहिलें त्याच्या इष्टानिष्टतेविषयी मतभेद होऊ शकेल. पण त्या वाङमयाची प्रेरकता नी प्रभाव कोणी नाकारू शकणार नाही. सावरकरांची दोन्ही आत्मचरित्रें विशेषत: 'माझी जन्मठेप' मराठी वाङमयांत अमर पावलीं आहेत. 'काळेपाणी' ही त्यांची कादंबरीहि यशस्वी म्हणून उल्लेखिता येईल. सावरकरांसारख्या प्रचारकी पंडिताच्या हातून निर्माण झालेली 'काळेपाणी' सारखी नाविन्यपूर्ण व सरस ललितकृति म्हणजे मराठी वाङ्मयांतला चमत्कार आहे. त्यांचें निबंधवाङमय मराठी सारस्वताला नि:संशय भूषणास्पद आहे. या निबंधवाङमयाच्या रचनेवर नी आशयावर खास लेखकाची मुद्रा आहे. हिंदुधर्मांतील आणि समाजातील पूर्वापार रूढी, विधि, वेडगळ समजुती, हास्यास्पद आचार इत्यादि विषयांवर या निबंधातून सावरकरांच्या आक्रमक लेखणीने जे प्रहार केले आहेत त्याला मराठींतील निबंधवाङमयांत तोड सापडणार नाही.

सावरकरांचा व्यासंग, समाजहिताविषयीची त्यांची कळकळ, आग्रही, मुद्देसूद पण चढाईचें मतप्रतिपादन, उपरोधउपहास, कोटीक्रम, क्वचित् विनोद, पुरोगामी दृष्टि आणि जोरकस, पल्लेदार, पण कांहीशी खडबडीत भाषाशैली इत्यादि वैशिष्टयें या निबंधांतून प्रकर्षाने आढळून येतात. विज्ञानाची कास धरून आणि यंत्रयुगाचें स्वागत करूनच हिंदुसमाज नी भारतीय राष्ट्रे बलिष्ठ होईल हा विचार सावरकरांनी आपल्या निबंधांतून ठासून सांगितला आहे. सावरकरांना जातीयवादी आणि हिंसावादी ठरविणाऱ्यांनी त्यांचे निबंधवाङमय जरा काळजीपूर्वक वाचावें; म्हणजे त्यांना सावरकर हा महाकवीचें हृदय असणारा विचारवंत आहे असें कळून येईल. भारतीय राष्ट्रे आणि समाज यांच्या उन्नतीसाठी सावरकरांनी उभी ह्यात खर्ची घातली नी आपली तेजस्वी लेखणी-वाणी राबवली. ऐंशी वर्षांची ही तेजाळ रुद्रधारी नी वीणाधारी मूर्ति आपल्या नुसत्या अस्तित्वाने आजहि विचारजागृति नी मार्गदर्शन करू शकते. पण त्यासाठी आपण जागे असले पाहिजे.

सावरकरांच्या व्यक्तित्वाचें आणि वाङमयाचें वर जें स्थूलमानाने दर्शन घडवलें त्या अनुरोधाने प्रस्तुत पुस्तकांतील कवितांची आणि उताऱ्यांची निवड केली आहे. ही निवड करतांना सावरकरांनी हाताळलेले वाङमयीन प्रकार, त्यांतील वाङमयगुण आणि विचारदर्शन या तिन्ही गोष्टी लक्षांत घेतल्या आहेत. अशा निवडीच्या बाबतींत रुचिभिन्नतेमुळे मतभेदाला नेहमीच वाव असतो. तसा मतभेद या पुस्तकांतील निवडीच्या बाबतींत होऊ शकेल. निवडलेल्या कविता आणि उतारे यांत नाविन्य आहे की नाही आणि ते उत्कृष्ट आहेत की नाहीत एवढेच वाचकांनी पहावें. सावरकरांचे वाङमय आणि त्यांची वाङमयीन श्रेष्ठता यांची कल्पना प्रस्तुत पुस्तकामुळे वाचकांना आली तरी पुष्कळ झालें.

अनाथ विद्यार्थी गृहाच्या प्रकाशन विभागाने या पुस्तकाचें संपादन मजवर सोपविलें व प्रा. पां. श्री. घारे यांनी आत्मियतेने तें मजकडून करून घेतलें याबद्दल मी उभयतांचा आभारी आहे.

वर्षप्रतिपदा, शके १८८५
नवा ८६५ सदाशिव, पुणें २

**म. श्री. दीक्षित**

# सावरकर-साहित्य

**कथा-कादंबरी** :—१ सावरकरांच्या गोष्टी, २ काळे पाणी, ३ मला काय त्याचे ?

**काव्य** :—१ रानफुलें (दीर्घकाव्यें), २ गोमांतक (खंडकाव्य), ३ सावरकरांची कविता (स्फुट कविता), ४ सिंहगड (पोवाडा), ५ बाजीप्रभु (पोवाडा), ६ चाफेकर (पोवाडा), ७ कमला (खंडकाव्य).

**नाटकें** :—१ संगीत उःशाप, २ संगीत उत्तरक्रिया, ३ संगीत संन्यस्त खड्ग,

**चरित्रें** :—१ जोसेफ मॅझिनी : आत्मवृत्त व राजकारण, २ तेजस्वी तारे.

**आत्मचरित्रें** :—१ सावरकर आत्मचरित्र अर्थात् माझ्या आठवणी, २ माझी जन्मठेप.

**इतिहास** :—१ सत्तावनचें स्वातंत्र्यसमर (War of Independence या मूळ ग्रंथाचे प्रा. वि. वि. पटवर्धनकृत भाषांतर), २ हिंदुपदपादशाही, ३ शिखांचा इतिहास (अप्रसिद्ध), ४ नेपाळी आंदोलनाचा इतिहास, ५ ऐतिहासिक पुरुषांचे उत्सव का करावेत ?

**निबंध-प्रबंध** :—१ हिंदुत्व, २ सावरकर-साहित्य (भाग १ ते ५), ३ जात्यु-च्छेदक निबंध, ४ क्ष-किरणें, ५ हिंदुत्वाचे पंचप्राण, ६ गांधीगोंधळ, ७ रणशिंग, ८ सहा सोनेरी पानें (भाग १).

**भाषाशुद्धि-लिपिशुद्धि** :—१ मराठी भाषेचें शुद्धीकरण, २ नागरी लिपिशुद्धीचें आंदोलन.

**भाषणें** :—१ बॅ. सावरकरांची भाषणें, २ हिंदुराष्ट्रदर्शन, ३ संघटन संजीवनी, ४ हिंदूंच्या चळवळीचें ध्येय व धोरण, ५ अभिनव भारत सांगता समयीचीं भाषणें.

**पत्रें-वार्तापत्रें** :—१ लंडनची बातमीपत्रें, २ अंदमानच्या अंधेरींतून (Echo's from Andaman या मूळ इंग्रजी ग्रंथाचे कै. विश्वनाथराव केळकरकृत भाषांतर)—एकूण पुस्तकें ३९.

●●●

# अनुक्रमणिका


| काव्य | पृष्ठ |
|---|---|
| १. स्वतंत्रतेचें स्तोत्र | १ |
| २. तारकांस पाहून | ३ |
| ३. माझें मृत्यूपत्र | ७ |
| ४. आत्मबल | १२ |
| ५. हिंदूंचें एकतागान | १४ |

| गद्य | |
|---|---|
| ६. स्वातंत्र्ययुद्धाची शपथ | १६ |
| ७. मॅझिनीचें राजकारण | २३ |
| ८. अशा रीतीने लक्ष्मी लढली. | ३० |
| ९. अंदमानांतील शेवटचे दिवस | ३६ |
| १०. माझी मालती कुठे आहे हो! | ४४ |
| ११. तोडून टाका या सात स्वदेशी बेड्या | ५७ |
| १२. विज्ञानबळ | ६७ |
| १३. यंत्राने का बेकारी वाढते? | ८० |
| १४. भाषाशुद्धीची कसोटी | ९४ |
| १५. स्वराज्य आणि साहित्य | १०९ |
| १६. कर्तव्याचें कृपाण | ११९ |


●●●

## निवडक सावरकर संदर्भ-साहित्य


१. सावरकर दर्शन—भा. कृ. केळकर.

२. सावरकर विविध दर्शन—लेखसंग्रह.

३. सावरकर चरित्र—शि. ल. करंदीकर.

४. सावरकर काव्य-समालोचन—लेखसंग्रह.

५. प्रतिभा-सावरकर विशेषांक १५–१–१९३६.

६. सह्याद्रि सावरकर विशेषांक—जून १९४३.

७. सावरकर नवनीत—संपादक—भा. द. खेर.

८. मराठी वाङमयाचा इतिहास—अ. ना. देशपांडे (खंड २ रा).


●●●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रमांक 36225 वि: निबंध
... 3/8/68 ... 2853
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
23064

१

## स्वतंत्रतेचें स्तोत्र

[ स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठी तळमळणाऱ्या सावरकरांनी रचलेली उत्कट आणि रम्योदात्त अशी ध्येयदर्शी कविता. ]

( चाल—चंद्रकांत राजाची )

जयोऽस्तु ते श्रीमहन्मंगले ! शिवास्पदे शुभदे
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वंदे ।। धृ. ।।

राष्ट्राचें चैतन्य मूर्त तूं नीति-संपदांची
स्वतंत्रते भगवति ! श्रीमती राज्ञी तूं त्यांची
परवशतेच्या नभांत तूंची आकाशीं होशी
स्वतंत्रते भगवती चांदणी चमचम लखलखशी
गालावरच्या कुसुमीं किंवा कुसुमांच्या गालीं
स्वतंत्रते भगवती ! तूंच जी विलसतसे लाली
तूं सूर्याचें तेज उदधिचें गांभीर्यहि तूंची
स्वतंत्रते भगवती ! अन्यथा ग्रहण नष्ट तेंची
मोक्ष मुक्ति हीं तुझींच रूपें तुलाच वेदान्ती
स्वतंत्रते भगवती ! योगिजन परब्रह्म वदती
जें जें उत्तम, उदात्त, उन्नत, महन्मधुर तें तें
स्वतंत्रते भगवती ! सर्व तव सहचारी होतें

हे अधम-रक्त-रंजिते । सुजन-पूजिते । श्रीस्वतंत्रते
तुजसाठि मरण तें जनन
तुजवीण जनन तें मरण
तुज सकल चराचर शरण
भरतभूमिला दृढालिंगना कधि देशिल वरदे
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वंदे १

हिमालयाच्या हिमसौधाचा लोभ शंकराला
क्रीडा तेथे करण्याचा कां तुला वीट आला ?
होय आरसा अप्सरसांना सरसें करण्याला
सुधाधवल जान्हवीस्रोत तो कां गे त्वां त्यजिला ?
स्वतंत्रते ! या सुवर्णभूमित कमती काय तुला ?
कोहिनूरचें पुष्प रोज घे ताजें वेणीला
ही सकल-श्री-संयुता । आमुची माता । भारती असता
कां तुवा ढकलुनी दिधली ?
पूर्वीची ममता सरली
परक्यांची दासी झाली
जीव तळमळे, कां तूं त्यजिलें उत्तर याचें दे
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वंदे २

पुणें १९०३ ( वय २० )

• • •

२

# तारकांस पाहून

[ १९०६ सालीं बॅरिस्टर होण्यासाठी स्वा. सावरकर इंग्लंडला बोटीने निघाले. त्या वेळीं एका रात्रीं आप्तजनांच्या विरहाने व्याकुळ झालेल्या मन:स्थितींत स्फुरलेली ही कल्पनारम्य कविता. ]

( चाल–चंद्रकांत राजाची )

सुनील नभ हें, सुंदर नभ हें, नभ हें अतल अहा !
सुनील सागर, सुंदर सागर, सागर अतलचि हा
नक्षत्रांही तारांकित हें नभ चमचम हासे
प्रतिबिंबांही तसा सागरहि तारांकित भासे
नुमजे लागे कुठे नभ कुठे जलसीमा होई
नभांत जल तें, जलांत नभ तें संगमुनी जाई
खरा कोणता सागर यांतुनि वरती की खाली
खरें तसें आकाश कोणतें, गुंग मती झाली
आकाशींचे तारे सागरिं प्रतिबिंबित होती
किंवा आकाशीं हे बिंबति सागरिंचे मोती
किंवा आकाशचि हें सगळे, कीं सागर सगळा
भवसागर बोलती पुराणीं प्रथित ऋषी ज्याला

हे चांदणि ! सुखशीतल गमसी तशीच असशी ना
आगचि लागो लोळ आगिचा तुजसी वद त्यांना
विमल विरल मेघांची दुलई ओढुनि निजलीसे
अशा अप्सरेचिया अनावृत वदनासम विलसें
आल्हादक किति चंद्रबिंब हें नंदसुधा झरते
फुटो भिंग तें भिकार त्या जें मसणासम करतें
चंद्र चांदण्या असेंच अंतर मापुनि देवानें
खचल्या नभि नी नयनीं कांचा सुललित बेतानें
त्याचें रिझवो रूप जना कीं आल्हादक कोळें
फुटोत ते त्या विद्रुप करिते दुर्बिणिचे डोळे

❦ ❦ ❦

कथिति ज्योतिषि तसे आगिचे लोळ कुणी तारे
असतिल दुसरे, नव्हेत हे, हे अमृत-बिंदु सारे !
की जै असुरां-सुरांमधें क्षीराब्धि-मथनकालीं
अमृत-कलश वरि येता ओढाताण सबळ झाली
ओढाताणित इतस्ततः त्या अमृत-बिंदु गळले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले
थवे काजव्यांचे कीं नंदनवनिच्या चकचकले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले
सुनील शालूवरि मायेच्या लकलकती टिकले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले

❦ ❦ ❦

सुवर्ण-गौरा गौरी श्रीहर लीलारत झाले
थाप पडे तों द्वारीं श्रीहरि भेटाया आले

नग्ना लगबग गिरिजा धावे सावरू शालूला
हिसका बसुनी हार गळयांतिल तटकन तो तुटला
त्या हारांतिल मोती सैरावैरा ओघळले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले

दशाननें पळवूनि जानकी नभःपथे नेली
अश्रुबिंदु जे देवी टपटप ढाळित त्या काळीं
तेचि राहिले असे चकाकत जाणो दिव्य बलें
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले
आकाशाच्या ग्रंथ-संग्रहालयासि अर्पियला
काले ग्रंथ प्रचंड विश्वेतिहास जो लिहिला
रौप्यमुद्रिकांकित तद्‌भागां अनुक्रमें रचिलें
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले

नरकपतीचा हल्ला आला चितोडनगराला
देवांनाही स्वांग जलदिनें वर्दी द्यायाला
सिद्धाग्नींतुनि फर्कन ज्वाला-लोळ नभीं उठती
चितोडगडवासिनी देवि तों त्यावरि आरुढती
ज्वालारूढा देवि दुरुनि त्या चमकति तेजबळे
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले

परी सागरा, सांग काय ही लटपट ? ही कुठली
चटकचांदणी कवण ? नभांतुनि निसटुनिया विपली

रात्रीं ऐशा अशी एकटी लगबगिने घुसली
तुझिया जलमंदिरीं सर्वेची दिसेनशी झाली
लाजुं नको, जा भोग विलासा कामोत्सुक तूं, ती
तुझिया शतजलतरंगमंजुल सुखा साथ दे ती
प्रेमाची चांदणी परंतु ज्यांची दूर वसे
किती प्रवासी तळमळती बा, तुझ्या निकट ऐसे
तुझा तुझ्या चांदणिशीं पाहुनि प्रिय संगम साचा
तव मत्सर ना, परी छळी त्या वियोग दयितांचा !

हे ताऱ्यांनो, जाणतसां का कुठुनि तुम्ही आलां ?
कुठें चाललां कवण हेतु ह्या असे प्रवासाला ?
कवण हेतु तो ज्यास्तव तुम्हीं गगनगामि व्हावें
सूर्यापासुनि इतुकें दूरचि भूनें विचरावें
गजराजाहुनि फुलपाखरूची सुरंग शोभावे
बीज फुलावें, फुलुनि सुकावें, सुकुनि बीज व्हावें
लहान मोठी घटिका-यंत्री बहुविधयंत्रें तीं
स्वस्वगतीनें परि एक्याची साध्यास्तव फिरती
असा कोणता हेतु जयाच्या सिद्धीस्तव साचीं
विश्वाच्या या चक्रें फिरतीं भव्य घड्याळाचीं
अम्हां कळेना म्हणूनि पुसतों तुम्हां कळे का तें ?
का न कळत वर्तावें जाणति इतकेंची ज्ञाते !

समुद्रमार्ग १९२६ ( वय २३ )

३

## माझें मृत्युपत्र

[ १९१० सालीं सशस्त्र क्रांतीच्या हालचाली केल्याबद्दल स्वा. सावरकरांना इंग्लंडमध्यें अटक झाली. काळेपाणी किंवा मृत्युदंड यापैकी कोणतीतरी शिक्षा होणार हें जाणून त्यांनी आपल्या वत्सल वहिनीला धीरोदात्तपणे जें ओजस्वी पत्र लिहिलें तें म्हणजेच ही कविता. त्यागी देशभक्ताचें हें मृत्युपत्र म्हणजे मराठी काव्याचें अमर लेणें आहे ! ]

( वसंततिलका )

वैशाखिचा कुमुदनाथ नभांत हासे
यच्चंद्रिका धवल सौधतलीं विलासे
घाली स्वयें जल जिला प्रिय बाळ लोभे
जाई फुले, परिमले सुमनांत शोभे

आले घरीं सकल आप्त-सुहृद् जिवाचे
आनंदमग्न कुल गोकुल काय साचें
आदर्श दीप्ति-शुचिता-धृति-यौवनांचें
पाहूनि जें तरुणमंडळ, कीर्ति नाचे

प्रेमे हृदें विकसलीं नव यौवनाच्या
गंधे सुवासित उदात्त सुसंस्कृतीच्या
दिव्या लता-तरुंसि जें गृह बाग झाला
ज्या पौर हर्षित वदे जन ' धर्म-शाला '

सैंपाक त्वां निजकरे कुशले करावा
प्रेमे तुझ्या अधिकचि सु-रसाल व्हावा
संवाद सर्व मिळुनी करिता नितान्त
जेवावयासि बसलों जइं चांदण्यांत

श्रीरामचंद्र-वनवास-कथा रसाला
कीं केंवि देश इटली रिपुमुक्त झाला
तानाजिचा समरधीर तसा पवाडा
गावा चितोरगड वा शनवारवाडा

झाली कशी प्रियकरा अपुली अनाथा
दुर्दास्यखिन्न शरभिन्न विपन्न माता
शोके विवंचुनि तिच्या जइं मोचनाचे
केले अनंत तरुणां उपदेश साचे

झाल्या तदा प्रियकरांसह आणभाका
त्या सर्व देवि वहिनी स्मरती तुम्हां का ?
' बाजी प्रभू ठरुं ' वदे युवसंघ सर्व
' आम्ही चितोरयुवती ' युवती सगर्व

कीं घेतलें व्रत न हें अम्हि अंधतेने
लब्धप्रकाश इतिहास-निसर्ग-माने
जें दिव्य, दाहक म्हणूनि असावयाचें
बुद्धयाचि वाण धरिलें करिं हें सतीचें

ज्या होती तैं प्रियजनांसह आणभाका
त्यांते स्मरोनि मग सांप्रत हें विलोका
नाही पुरीं उलटलीं जरि आठ वर्षे
तों कार्यसिद्धि इतुकी मन कां न हर्षे ?

आसेतु-पर्वत उचंबळला प्रदेश
वीराकृती धरित टाकुनि दीन वेष
भक्तांचिया रघुपदीं झुलताति झुंडी
जाज्वल्य होयहि हुताशन यज्ञकुंडीं

तो यज्ञ सिद्ध करण्यास्तव उग्र दीक्षा
जे घेति येइ तइं तत्कृतिची परीक्षा
'विश्वाचिया अखिल मंगल-धारणाला
बोला असे कवण भक्ष्य हुताशनाला ?'

आमंत्रण प्रभु रघूत्तम सोडिता हें
दिव्यार्थ, देव ! अमुचें कुल सज्ज आहे
हे साध्वि, गर्जुनि असें पहिल्या हवीचा
हा ईश्वरी मिळविला अम्हि मान साचा

धर्मार्थ देह वदलों ठरलें नितांत
ते बोल फोल नच बालिश बायकांत
ना भंगली भिउनियां धृति यातनांना
निष्काम-कर्मरति योगहि खंडिला ना

ज्या होति तैं प्रियजनांसह आणभाका
केल्याचि सत्य कृतिने अजि ह्या विलोका
दीप्तानलांत निजमातृ-विमोचनार्थ
हा स्वार्थ जाळुनि अम्ही ठरलों कृतार्थ !

हे मातृभूमि ! तुजला मन वाहियेलें
वक्तृत्व वाग्विभवही तुज अर्पियेलें
तूतेंचि अर्पिलि नवी कविता रसाला
लेखाप्रती विषय तूंचि अनन्य झाला

त्वत्स्थंडिलीं ढकलिलें प्रिय मित्रसंघा
केलें स्वयें दहन यौवन-देह-भोगां
त्वत्कार्य नैतिक सुसंमत सर्व देवा
तत्सेवनींच गमली रघुवीर-सेवा

त्वत्स्थंडिलीं ढकलिली गृहवित्तमत्ता
दावानलांत वहिनी नवपुत्रकांता
त्वत्स्थंडिलीं अतुल-धैर्य वरिष्ठ बंधू
केला हवी परमकारुण पुण्यसिंधू

त्वत्स्थंडिलावरि बळी प्रिय बाळ झाला
त्वत्स्थंडिलीं बघ अता मम देह ठेला
हें काय, बंधु असतों जरि सात आम्ही
त्वत्स्थंडिलींच असते दिधले बळी मीं

संतान या भरतभूमिस तीस कोटी
जे मातृभक्ति-रत सज्जन धन्य होती
हें आपुलें कुलहि त्यांमधि ईश्वरांश
निर्वंश होउनि ठरेल अखंड-वंश

कीं तें ठरोहि अथवा न ठरो परंतू
हे मातृभू, अम्हि असों परिपूर्ण-हेतू
दीप्तानलांत निज-मातृ-विमोचनार्थ
हा स्वार्थ जाळुनि अम्हि ठरलों कृतार्थ !

ऐसे विवंचुनि, अहो वहिनी ! व्रतातें
पाळोनि वर्धन करा कुल-दिव्यतेतें
श्रीपार्वती तप करी हिमपर्वतीं ती
की विस्तवांत हसल्या बहु राजपूती

तें भारतीय अबला-बलतेज कांही
अद्यापि या भरतभूमित लुप्त नाही
हें सिद्ध होइल असेंचि उदार उग्र
वीरांगने, तव सुवर्तन हो समग्र

माझा निरोप तुज येथुनि हाच देवी
हा वत्स वत्सल तुझ्या पदिं शीर्ष ठेवी
सप्रेम अर्पण असो प्रणती तुम्हांते
आलिंगन प्रियकरा मम अंगनेते

लंडन १९१० ( वय २७ )

४

# आत्मबल

[ सागरांत उडी मारून इंग्रजांच्या कैदेंतून सुटून जाण्याचा स्वा. सावरकरांनी महापराक्रम केला; पण तो फसून सावरकर पुनः कैद झाले. आगबोटीवरील या कैदेंत आपला छळ चौपट वाढणार याची जाणीव होऊन तो सोसण्याचें धैर्य यावें म्हणून ही कविता रचिली आहे. कायिक आणि मानसिक अशा अनेक महासंकटांतून सावरकर आजवर निभावून गेले याचें कारणहि त्यांचें हें आत्मबल. साक्षात मृत्यूला आव्हान देणारें ! ]

( चाल–चामराचे सुरावर )

**अनादि मी, अनंत मी, अवध्य मी भला**
**मारिल रिपु जगतिं असा कवण जन्मला ॥ धृ. ॥**

**अट्टहास करित जईं धर्मधारणीं**
**मृत्युसीच गांठ घालुं मी घुसे रणीं**
**अग्नि जाळि मजसी ना खड्ग छेदितो**
**भिउनि मला भ्याड मृत्यु पळत सूटतो**
**खुळाऽरिपूऽ ! तया स्वयें**
**मृत्युच्याचि भीतीनें भिववुं मजसि ये**

लोटि हिंस्त्र सिंहाच्या पंजरीं मला
नम्र दाससम चाटिल तो पदांगुला
कल्लोळीं ज्वालांच्या फेंकिशी जरी
हटुनि भंवति रचिल शीत सुप्रभावली
आण तुझ्या तोफांना क्रूर सैन्य तें
यंत्र तंत्र शस्त्र अस्त्र आग ओकतें
हलाऽहलाऽ! त्रिनेत्र तो
मी तुम्हांसि तैसाची गिळुनि जिरवितों !

समुद्रमार्ग १९१० ( वय २७ )

• • •

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६२२५ वि: निबंध
क्रमांक १४८३ नों दि २/४/६४

५

# हिंदूंचें एकतागान

[ जन्मठेपेच्या कैदेंतून सुटका झाल्यानंतर सावरकरांना रत्नागिरी येथे कांही वर्षें स्थानबद्ध ठेवण्यांत आलें होतें. येथील निर्बंधावस्थेंत या कर्मयोग्याने हिंदुसंघटन, शुद्धि, अस्पृश्यतानिवारण, सहभोजन, इत्यादि मार्गांनी राष्ट्रसेवा चालूच ठेवली होती. प्रचार हा सावरकर-साहित्याचा एक प्रमुख हेतु असल्यामुळे या काळांतील त्यांची कविताहि प्रचारात्मक उतरली. सावरकरांची हिंदुसंघटनेविषयींची तळमळ प्रस्तुत गीतांत अतिशय उत्कटतेने व काव्यमय शब्दांत व्यक्त झाली आहे. सामुदायिकरीत्या गावी अशी ही उत्तेजक कविता आहे. ]

( चाल–तू टाक चिरुनि ही मान– )

**तुम्ही अम्ही सकल हिंदू । बंधुबंधू**
**तो महादेवजी पिता आपुला चला तया वंदूं ॥ धृ० ॥**

**ब्राह्मण वा क्षत्रिय चांग । जरि झाला**
**कसलेंहि रूप वा रंग । जरि त्याला**
**तो महार अथवा मांग । सकलांला**
**ही एकचि आई हिंदुजाति आम्हांस तिला वंदूं** १

एकची देश हा अपुल्या । प्रेमाचा
एकची छंद जीवाचा । कवनाचा
एकची धर्म हा आम्हां ! सकलांचा
ही हिंदुजातिची गंगा आम्ही तिचे सकल बिंदू २

रघुवीर रामचंद्राचा । जो भक्त
गोविंदपदांबुजिं जो जो । अनुरक्त
गीतेसि गाउनी पूजी । भगवंत
तो हिंदुधर्मनौकेंत बसुनियां तरतो भवसिंधू ३

उभयांनि दोष उभयांचे । खोडावे
द्वेषासि दुष्ट रूढीसी । सोडावे
सख्यासि आईच्यासाठी । जोडावें
अम्हि अपराधांसी विसरुनि प्रेमा पुन्हा पुन्हा सांधूं ४

लेंकुरें हिंदुजातीचीं । हीं आम्ही
आमुच्या हिंदुधर्मासी । त्या कामीं
प्राणही देउनी रक्षूं । परिणामीं
या झेंड्याखाली पूर्वजांचिया एकाची नांदूं ५

रत्नागिरी १९२५ ( वय ४२ )

६

# स्वातंत्र्ययुद्धाची शपथ

[ ‘ सावरकर आत्मचरित्र अर्थात् माझ्या आठवणी : भाग पहिला ’ या पुस्तकांतील हा उतारा. वयाच्या पंधराव्या वर्षी सावरकरांनी भारतीय स्वातंत्र्ययुद्धाची शपथ कोणत्या परिस्थितींत व मनःस्थितींत घेतली याचा शोध आणि बोध प्रस्तुत उताऱ्यावरून होतो. सावरकरांच्या सशस्त्र क्रांतिकार्याचा उगमच या शपथेंतून झाला आहे. ]

बोलता बोलता हिंदुस्थानभर प्लेग वणव्यासारखा पसरला. सरकारी प्लेगनिवारक छळाचाहि प्लेग त्यामागोमाग तसाच भडकत गेला. ठिकठिकाणीं दंगेहि झाले. पण प्लेगचें किंवा प्लेगनिवारक छळानें कोणाचेच डोळे उघडेनात. शेवटीं पुण्यास गोष्ट अगदीच विकोपास गेली. सोजीर लोकांचा जाच, त्यांच्या त्या बुटांच्या लाथा, घरें फोडीत दिसेल तें जाळीत. हे देव्हाऱ्यांतील देवदेखील फेकून देत. मरत्या नवऱ्यापासून बायकोला, आईपासून मुलाला बळाने हिसडून अटकेंत दडपीत. फिरणाऱ्या प्लेगनिवारक टोळ्यांचा धिंगाणा दैत्यांच्या धिंगाण्यासारखा सर्व लोकांस असह्य आणि त्रासदायक झाला. आणि शेवटीं त्याची व्हायची ती प्रतिक्रिया होऊन, चाफेकरबंधूंनी सरकारच्या या प्लेगनिवारक अधिकाऱ्यांच्या जाचाचा सूड म्हणून, रँड आणि आयर्स्ट या दोघां इंग्रजी अधिकाऱ्यांस सन १८९७ च्या जूनमध्यें त्यांच्या भरधाव चाललेल्या बगींत झेप घालून गोळी झाडून ठार मारलें; आणि तें कधी, तर महाराणी व्हिक्टोरियाचा हीरकोत्सव हिंदु-

स्थानभर ज्या दिवशीं सरकारच्या वतीने गाजविला जाऊन ब्रिटिश सत्तेच्या विजयशाली प्रभावाने हिंदुस्थान दिपविलें जाणार होतें, तेव्हा त्या नेमक्या रात्रीं ! त्या हीरकोत्सवाच्या अंत:स्थ मर्मावरच या धाडसी सूडांतील अंत:स्थ हेतूने घाला घातला ! त्यामुळे अर्थातच सरकार पिसाळून गेलें. विलायतपर्यंत पुणेरी ब्राह्मणाचा दरारा आणि द्वेष भडकून गेला. दडपशाहीच्या रावणी गर्जना उठू लागल्या, की पुण्याच्या पुढाऱ्यांना भरचौकांत वेत मारून पाठी सडकून काढू या ! त्यास तितकेंच बेडर प्रत्युत्तर देत 'केसरी' विचारू लागला, "सरकारचें माथें ठिकाणावर आहे ना ?" टिळक धरले गेले; नातूंस देशपारीची शिक्षा होऊन अटकेंत ठेवलें गेले; मोद-वृत्तिकादिक संपादकवर्ग बंदिवासांत पडले. दामोदरपंत आणि बाळकृष्णपंत चाफेकरहि सापडले. त्यांच्या कटाच्या खटल्याने तर 'आगीं'त तेल ओतलें. हिंदुस्थानांतून ब्रिटिश सत्ता सशस्त्र बंडाने उलथून पाडण्याचा वासुदेव बळवंतांचाच कित्ता चाफेकर गिरविणार होते. तितकी ध्येयाची स्पष्टता, किंवा व्यूहाची वा कार्यक्रमाची व्यापकता तोंवर जरी का कटवाल्यांच्या योजनेंत समाविष्ट झाली नव्हती, तरीहि व्हिक्टोरिया राणीच्या मुंबई येथील पुतळ्यास डांबर फासून जोड्यांची माळ घालणें इत्यादि अनेक राजद्रोही कृत्यें त्यांनी आधींच केलीं होती. या सर्व अपराधास्तव शेवटीं त्यास फाशीची शिक्षा झाली. या बातमीने उभा देश हळहळतो आहे तोंच त्या चाफेकर बंधूस ज्या विश्वास घातक्यांनी दहा हजार रुपयांसाठी धरून दिलें त्या दोघाहि द्रवीड बंधूंवर चाफेकरांच्या तिसऱ्या धाकट्या भावाने—वासुदेवने—आणि त्याचा मित्र रानडे यांनी अचानक छापा घालून भर पुण्यांत ठार केल्याची बातमी येऊन उभा देश नुसता हादरून गेला !—त्यांनाही फाशीची शिक्षा झाली. आणि ते तिघे चाफेकर बंधू आणि रानडे फाशीं जात असताच ज्या प्लेग-निवारकनियमांनी लोकांचा असह्य छळ झाला म्हणून त्याचा सूड उगविण्यासाठी या तरुणांनी हें अत्यद्भुत भीषण कर्म केलें ते नियमहि फासावर चढविले गेले ! ते सोजीर लोक पुण्यांतून काढून घेण्यात आले. ती त्रासदायक अरेरावी बंद झाली ! जर ती या भीषण प्रतिक्रियेचे आधीच बंद

होती तर ? पण नाही; प्रतिक्रियेनंतरच ती अप्रियक्रिया हतवीर्य व्हावी ! हा नेमानेम !

ह्या अत्युद्भुत रोमहर्षक घटना इतक्या संतत आणि द्रुतक्रमाने घडत गेल्या की त्या धक्क्यामागून बसलेल्या धक्क्याने मुर्दाडांतील मुर्दाडांच्या अंगांतदेखील उत्तेजन आणि उत्क्षोभ संचारल्यावाचून राहिला नाही. असा सारा देश त्या निशेने धुंद झाल्यासारखा झाला. मग माझ्यासारख्या स्वदेशास स्वतंत्र करण्यास आधीच तळमळू लागलेल्या आणि शिवाजीच्या आणि पौराणिक वीरांच्या रंगांतच रंगून राहिलेल्या युवकाची गोष्ट काय सांगावी ! वर त्या त्या प्रसंगाचें वर्णन मीं ज्या शब्दांत दिलें आहे, ते शब्द, ते प्रसंग त्या त्या वेळी मला जसे भासले, तसे तसेच रेखाटले जावेत अशाच शब्दांत देण्याचा प्रयत्न करण्याचा माझा बेत असताही मीं त्या भावना ज्या शब्दांत त्या वेळी व्यक्तविल्या असत्या, त्याहून शतपट सौम्य शब्दांतच त्या वर वर्णिल्या गेल्या आहेत.

चाफेकर-रानड्यांच्या खटल्याचीं, शिक्षेचीं आणि फाशीचीं वर्णनें वाचीत असता वर्तमानपत्रांचे अंक माझ्या गळत्या अश्रूंनी चिंब भिजत. इतरत्र लोक मनांतून त्यांस वाखाणीत, पण तीं नांवें घेण्यासच नव्हे, तर मोठ्याने ऐकण्यासहि थरथर कापत. वर्तमानपत्रें त्यांस खुनी, देशाचा घात करणारे, जातीला कलंक लावणारे, म्हणून भाराभर शिव्या–वरवर का होईना–हासडीत. तेव्हा मी फार खिन्न आणि संतप्त होई. मी उघड उघड त्यांचें समर्थन करी आणि त्यांस वीरवर Martyr म्हणे. ( कारण हुतात्मा किंवा देशवीर हा शब्द त्या वेळी प्रचलित नव्हता. ) तेव्हापासूनच ही स्वभाषेची उणीव मला झोंबे. मीं नाना शब्द त्या अर्थी काढण्याचा यत्न करावा पण तें जमेना. शेवटी मॅझिनीच्या भाषांतराचे समयी मीं आधीच वापरीत असलेल्या " देशवीर " शब्दास National Martyr ह्या अर्थी निश्चित करून तो प्रचारांत आणला. पण नुसत्या Martyr या शब्दाइतका तो व्यापक नव्हता. धर्मवीर, देशवीर, शस्त्रवीर असे फुटकळ प्रयोग करावे लागत. उत्तर हिंदुस्थानांतील शहीद शब्दही वापरीत होतों, पण तो अरबी आहे हें कळताच सोडून दिला. पण अंदमानांत असता एकदा माझ्या बंधूंशी बोलता बोलता

मला " हुतात्मा " हा शब्द सुचला; आणि तो त्या अर्थी Martyr पेक्षाही अत्यंत समर्पक, अधिक व्यापक, आणि अधिक पावित्र्यसूचक असल्याने तो मनास अगदी पटला. तेव्हापासूनच तो प्रचलित केला. केसरींत त्यांस माथेफिरू, वेडे पीर म्हटलेलें पाहून मला विषाद वाटे. सामान्य लोकांत केसरीचे शब्द आंधळ्या संवयीने अर्थबिर्थ न पाहता रूढ होत. म्हणून या शब्दांचा मी तीव्र प्रतिविरोध करीं. मी म्हणे ते माथेफिरू तर तुम्ही मुर्दाड. मुर्दाडापेक्षा माथेफिरूसच राष्ट्रशत्रु अधिक वचकतात. पिनल कोडाच्या भीतीसाठी देखील त्यांस माथेफिरू म्हणण्याचें कारण नाही. त्यास त्या भीतीसाठी चांगले म्हणू नका. पण शिवीगाळ कां करता? लोक आपल्या भ्याडपणाची लाज झाकण्यासाठी त्यांस माथेफिरू आणि वेडेपीर म्हणतात. नाही तर अशींच कृत्यें करणाऱ्या इंग्लिशांना, रशियनांना, आयरिशांना हींच पत्रें आणि हेच लोक " वीर !" " Martyr" ( हुतात्मा ) म्हणून निःसंकोचपणे कां गौरवितात ? कारण त्यांत इंडियन पिनल कोडाची भीति नसते. याच वेळेस पुण्याचे कांही तरुण कोणत्याश्या नाटक मंडळींत जाण्यासाठी घरांतून पळून आलेले वाटेने एका सावकाराचें घर म्हणून अनाहूतपणे आमच्या घरीं येऊन उतरले. त्यांच्याकडून मी पुण्यांतील मेळ्यांचीं वीररसाने स्रवणारीं पदें प्रथमच ऐकलीं. मीं आणि माझ्या मताच्याच माझ्या भगूरच्या बालमित्रांनी त्यांना चाफेकरांची माहिती सारखी विचारावी; आणि वर्तमानपत्राचे शेंदाड शिपाई अशा लढवय्यांस माथेफिरू इ. दुष्ट विशेषणें लावतात, याचा धिक्कार करावा असें म्हणत असता एक दिवस त्यांच्यांतील लवाटे आणि अण्णा नांवाच्या दोघां प्रमुखजणांनी अगदी गपचुप म्हणून मला नि माझ्या मित्रांना सांगितलें कीं अहो, चाफेकरांना उघडपणे माथेफिरू म्हटलें तरी आंतून टिळकांनीच त्यांस रँडचा खून करण्यास आज्ञा दिली होती ! मला वडील म्हणत, " आपण पुणेकर; तेव्हा आपणांस पुण्याविषयी वाटेल ती थाप मारण्याचा उपजत अधिकार ! तिला कोण खोटी म्हणणार ! अशा कल्पनेने त्या वेळेस पुण्यांतील बाहेर भटकणारे अनेक उडाणटप्पू वाटेल त्या बाता झोकीत फिरत असत; आणि त्यायोगे लोकांत आपण कोणीतरी त्या कटांतीलच मर्मज्ञ आहोंत, केवळ गुप्त फोडणें

शहाणपणा नाही म्हणून त्याविषयी बोलणें बरें नाही असें म्हणत सारखे सारखे बोलत असत; नि फुकटचा डौल मिरवीत असत. त्यांपैकी हेही कोणी तरी असावेत झाले. एखाद्या पोलिसाने नुसतें दरडावलें तर हे आता शेपटचा घालतील, त्यांचे काय ऐकतोस," असें माझे वडील वारंवार सांगत; पण तरीहि त्यांची ती बातमी ऐकून मला फार बरें वाटलें. मीं म्हटलें असें असेल तर टिळकासारख्या वीर केसरीने वीर केसरीस अनुरूप असेंच कृत्य केलें! पण मग तर चाफेकरांना माथेफिरू, वेडेपीर इत्यादि शिव्या देण्याचा "केसरी" प्रभृति पत्रांचा हा संप्रदाय अधिकच अक्षम्य आणि निंद्यतर ठरतो. राष्ट्रकार्यार्थ फार तर चाफेकरांचा संबंध नाकारणे ही युक्ति टिळकांसारख्या मोहऱ्यास, वीर सेनापतीस, वाचविण्यासाठी अवलंबवावी. पण आपणच तरुण क्रांतिकारकांस असें महत् कार्य करण्यांत महत्कृत्य आहे म्हणून कर असें सांगावें, आणि त्या वीरांनी तें करतांच आपण आपली कातडी वाचविण्यासाठी पगडी फिरवून त्यांस त्याच कृत्याविषयी माथेफिरू आणि वेडेपीर म्हणावें याहून निंद्य नीति ती कोणती? राष्ट्रघातकी मूर्खपणाहि कोणता? कारण त्यांस माथेफिरू म्हटल्याने पुन्हा दुसरा तरुण असें करणें मूर्खपणाचें आहे, असें वाटून कचरणार आणि तरुणास कोणी न्यायमूर्ति, कोणी हायकोर्ट जज्ज, होणें हाच देशभक्तीचा मुर्दाड मार्ग मोठा सभ्य, मोठ्या शहाणपणाचा वाटून अशा शत्रुंजय बलिदानाचा जाज्वल्य मार्गच वेडेपणाचा वाटेल. त्यामुळे देशांत चाफेकरांच्या तेजाने चेतू पाहणारी शत्रुंजय वीरवृत्ति पुन्हा थंडगार होऊन जाईल!

आणि हा शेवटचाच विचार माझ्या मनास अत्यंत अस्वस्थ करू लागला. चाफेकर, रानडे, आपल्या स्वदेशाच्या छळाचा सूड घेऊन फासावर चढले. त्यांच्या प्राणज्योतीने जाता जाता चेतविलेली ही शत्रुंजय वृत्ति यज्ञकुंडांत समिधेमागून समिधा टाकून अशीच भडकावीत नेणे असेल, आणि ती शेवटी कोण्या प्रचण्ड स्वातंत्र्ययुद्धाच्या महायज्ञांना परिणमवणे असेल तर—त्याचे दायित्व माझ्यापुरते मजवरही पडत नाही काय? चाफेकरांचें कार्य कुणी-तरी चालविलें पाहिजे ना? तर मग तें मींच कां चालवू नये? तो होम मींही का करू नये??

भारतीय स्वातंत्र्ययुद्धाची शपथ ! : वासुदेव आणि रानडे फाशी गेले ! तो त्या नाटकाचा शेवटचा प्रवेश मीं ज्या दिवशी वर्तमानपत्रांत वाचला - ते फाशीच्या आदल्या रात्रीं स्वस्थ निजले. पहाटे उठले. गीतापाठ केला आणि 'नैन छिदन्ति शस्त्राणि' असे गर्जत गर्जत एकमेकांचा हसून निरोप घेत फासावर चढले—तें वर्णन ज्या दिवशी वाचलें तेव्हापासून तर कांही दिवस हे वरील प्रश्न रात्रीं झोपेंतदेखील माझ्या मनास माझें मत विचारीत राही. शेवटी दोन चार दिवसांच्या मनाच्या ह्या अवस्थेंत मला बाळपणांतील माझा शेवटचा आधार, माझें संकटीं समाधान करणारी, जिला माझीं सुखदुःखें मीं सांगताच आणि ती तीं हसतमुखी ऐकताच माझ्या मनास नेहमी हलकेसें वाटे ती माझी आई – तिच्याकडे, त्या देवीकडे मीं धांव घेतली. देवघरांत गेलों, तिची पूजा भक्तिभावे बांधून स्वदेशाच्या दुःस्थितीने तळमळणाऱ्या म्या सद्‌गदित अंतःकरणाने तिचें ध्यान आरंभिलें. आणि शेवटी तिच्या पवित्र चरणांवर हात ठेऊन – तिला साक्ष ठेवून, आणि मला तेव्हा भासें तसें तिची अनुमति घेऊन मीं प्रतिज्ञा केली की, 'माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी मी सशस्त्र युद्धांत शत्रुस मारीत चाफेकरांसारखा मरेन, किंवा शिवाजीसारखा विजयी होऊन माझ्या मातृभूमीच्या मस्तकीं स्वराज्याचा राज्याभिषेक करवीन !' आमच्या नव्या घराच्या लहानशा पण सुंदर देवघरांत सुगंधी फुलांचा दरवळ पसरलेला; तुपाचा मंद मंद दिवा नीरांजनांत तेवत आहे, उदबत्त्यांचा उन्मादकारक नागमोडी धूर कुसुमांच्या कोमल परिमलांत विणला जात आहे; महिषासुरास तुडविणारी, सिंहावर आरूढ, अष्टभुजा, जिच्या आठी हातांत शस्त्रास्त्रें उपसलेलीं, उग्र परंतु मजकडे सुहास्य वदने मंदस्मित पाहात असलेली ती सुंदर देवीची मूर्ति देव्हाऱ्यांत विराजत आहे; तिच्यापुढे त्या तशा पुण्यमय वातावरणांत मीं शपथ घेतली. यापुढे मी माझ्या देशाचे स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतु उभारून " मारिता मारिता मरेतों " झुंजेन ! ! !'

त्या चिमुकल्या देवघरांत माझ्या वयाच्या १५ व्या वर्षी मीं सद्‌गद अंतःकरणाने त्या देवीच्या पायाला हाताने स्पर्श करताच त्या दैवी स्पर्शास

ही जी शपथेची लहानगी ठिणगी उडाली–पुढे भविष्यांत तिचा केवढा भडका होणार होता ! किती रक्तपात, घातप्रत्याघात, वध, फाशी, वनवास, छळ, यश आणि अपयश, दौरात्म्य आणि हौतात्म्य, प्रकाश आणि अंधार आगीचे आणि धुराचे कल्लोळ–खंडोखंडी ती आग भडकणारी होती की जी त्या वेळी त्या एका लहानशा ठिणगींत एक चमक होऊन दिसली. एक भयंकर वादळचे वादळ त्या पहिल्या विजेंत तळपत सामावलेलें होतें ! कारण आता भूतकाळाच्या दुर्बिणींतून माझ्या जीवनाच्या घटनाक्रमाकडे पाहताना हें स्पष्ट दिसत आहे की पुढे हिंदुस्थानभर गाजलेल्या अभिनव भारताच्या क्रांतिकारक संस्थेचा खरा उगम या शपथेंतच झाला. ही माझी प्रतिज्ञाच अभिनव भारताचें मूळ बीज होती ! हें सन १८९८ चें वर्ष होतें.

● ● ●

७

# मॅझिनीचें राजकारण

[ ' जोसेफ मॅझिनी : आत्मचरित्र आणि राजकारण ' हा देशभक्तीने रसरसलेला ओजस्वी ग्रंथ सावरकरांनी १९०६ सालीं लंडनमध्ये लिहिला. पण प्रसिद्ध होताच इंग्रज सरकारने तो जप्त केला. या ग्रंथाला सावरकरांनी ज्वलंत भाषेंत जी स्वदेशभक्तिपर प्रस्तावना लिहिली तीमुळे सरकारचें धाबें दणाणलें. सावरकरांची उत्कट देशभक्ति आणि त्यांची ओजस्वी लेखनशैली या प्रस्तावनेंत विशेषत्वाने प्रतीत होते. अशा या क्रांतिप्रवण प्रस्तावनेंतील स्फूर्तिदायक भाग पुढे देण्यांत येत आहे. ]

जगामध्ये आजपर्यंत जेवढ्या राज्यक्रांत्या झाल्या त्या सर्वांहून इटलीच्या राज्यक्रांतींत उदात्त वृत्तीचा कळस झालेला आहे. स्वदेशाभिमानाची ज्योत इतकी प्रज्वलित झालेली होती; प्रत्येक देशभक्त व्यक्तिविषयक सुखाबद्दल इतका उदासीन होता; स्वदेशासाठी सर्वस्व वाहण्याची इतकी चढाओढ सुरू होती; परक्या सत्तेकडून हें चैतन्य दाबून टाकण्यासाठी इतके भयंकर जुलूम करण्यांत येत होते; त्या जुलमांत देशभक्तांचे तांडे चिरडले जात असताहि प्रत्येक वर्षी लोकक्षोभाची उसळी इतकी विलक्षण व निधड्या छातीची होत होती व अखेर साठ वर्षांवर लढून लढून देशवीरांनी इतक्या चिकाटीने यश मिळविलें की, सर्व महत्कृत्यांनी व महनीय नरमण्यांनी अलंकृत अशी दुसरी राज्यक्रांति आजपर्यंत झालेली नाही, असें इतिहासास

कबूल करावें लागतें. या इटलीच्या राज्यक्रांतींत सद्‌गुणांचा जो इतका उत्कर्ष झाला याचें मुख्य कारण असें आहे की, ती राज्यक्रांति ही व्यक्तीसाठी, लोभासाठी किंवा त्वेषासाठी झालेली नसून तिचा पाया अत्यंत उन्नत अशा महत्तत्त्वांवर रचलेला होता. "मोठाल्या क्रांत्या ह्या तरवारीपेक्षा तत्त्वांनीच घडवून आणलेल्या असतात." तरवारीशिवाय तत्त्वांचा जय होत नाही ही दुःखाची गोष्ट आहे व म्हणून इटलीने तरवार उपसली. परंतु "त्या तरवारीचे अग्रभागीं जर सत्याचें अधिष्ठान नसतें तर त्या तरवारीला तिने स्पर्शही केला नसता." ज्या तत्त्वावर या पवित्र स्वातंत्र्ययुद्धाचा पाया रचला होता तीं तत्त्वें प्रथमतः मॅझिनीनें इटलीस शिकविलीं. इटलीच्यासाठी लढलेल्या देशभक्तांमध्ये मॅझिनीच्या "तरुण इटलींत" ज्यांनी शिक्षण घेतले नव्हतें असे लोक फारच थोडे होते. ह्या तत्त्वविचारांत व इतर राजकारणपटु कारस्थान्यांच्या उपदेशांत एक महत्त्वाचा भेद आहे. मॅझिनीचे राजकारण हें केवळ ऐहिक व स्वार्थप्रवृत्तीचें नव्हतें. तसें असतें तर त्या राजकारणाने प्रवृत्त झालेल्या देशवीरांचे अंतःकरणांत इतक्या उदात्त वृत्तीचा उदय झाला नसता. मॅझिनीचें राजकारण हें प्रवृत्ति व निवृत्ति ह्यांचें एकीकरण होतें. त्याच्या राजकारणाची इमारत ही नीतीच्या पायावर उभारलेली होती. हें सिद्ध केल्याने त्या वेळपर्यंत राजकारणाची थोर पुरुषांकडून जी अवहेलना होत असे ती नष्ट झाली. राजकारण हें स्वार्थाचें व अप्पलपोटेपणाचें शास्त्र आहे व यांत जो बळी तो कानपिळी या पशुवृत्तीचाच अंमल आहे अशी सर्वत्र समजूत असल्याने या राजकारणाचा साधुपुरुषांना तिटकारा येणें साहजिकच होतें. दुसऱ्याच्या देशावर घाला घालणें, त्याचें स्वातंत्र्य लुबाडून घेणें, हें जर राजकारण असेल – तोपर्यंत व अजूनही तें बहुतेक राष्ट्रांकडून तसेंच आहे असें मानण्यांत येतें तर मग या राजकारणांत व नरकांत भेद कोठे राहिला? मॅझिनीने राजकारणास या नरकगामी कल्पनेपासून मुक्त केलें. राजकारण हे परमेश्वरी कर्तव्य आहे असें त्याने स्पष्ट रीतीनें सिद्ध केलें. प्रवृत्ति व निवृत्ति हीं दोन परस्परविरोधी तत्त्वें नसून ती एकाच मार्गाच्या दोन भिन्न भागांचीं नांवें आहेत, असें त्यानें प्रतिपादन केलें. "नाही, स्वर्ग व पृथ्वी यांच्यामध्यें विरोध आहे

किंवा तीं भिन्न आहेत हें सत्य नाही. नाही. स्वर्गांत सत्य व न्याय्याचें ईश्वरी राज्य चालावें व पृथ्वीवर असत्य व अन्याय्य यांचा अंमल चालावा हें खरें नाही. पृथ्वी ही स्वर्गाची शिडी आहे." राजकारणाला स्वार्थपरायणतेचें हिडिस स्वरूप देणाऱ्या लोकांची चुकी अशा रीतीने उघडकीस आणून मग मॅझिनीने फाजील धर्माभिमान्यांचा समाचार घेतला आहे. धर्माने राजकारणांत लक्ष घालणें अवश्य आहे, इतकेंच नव्हे तर तें त्याचें कर्तव्य आहे. राजकारण म्हणजे समाजाची, स्वदेशाची व राष्ट्राची दास्यमोचना व संवर्धना होय. तिकडे दुर्लक्ष करणें म्हणजे मनुष्यजातीवर आलेलें भयंकर संकट निमूटपणे पाहण्याचें अक्षम्य पातक करणें होय. धर्माची खरी व्याख्या म्हणजे मनुष्यमात्राचें धारण करणें ही होय. मनुष्यमात्र दास्यपंकांत किंवा अनीतींत पिचत असता आपण तेवढें स्वतःस मुक्त करून घेऊ ही समजूत ढोंगीपणाची आहे. भूतदयेशिवाय स्वतःच्या मुक्तीला दुसरा मार्ग नाही. "तुमची जेव्हा चौकशी होईल तेव्हा परमेश्वर तुम्हांला असें विचारणार नाही कीं 'तुम्हीं स्वतःच्या कल्याणासाठी काय केलेंत ?'; तर तो तुम्हांला असेंच विचारणार आहे कीं, 'तुम्ही भूतमात्रांच्या कल्याणाकरिता काय केलें आहे ?" हें भूतमात्राचें अंतिम कल्याण करण्यासाठी, त्यांची ज्ञानाने व पावित्र्याने आत्मोन्नति होण्यासाठी व त्यांना सत्कृत्यें करण्यास सामर्थ्य येण्यासाठी पहिली अत्यंत आवश्यक गोष्ट म्हटली म्हणजे त्यांचें दास्यविमोचन करणें–त्यांस स्वातंत्र्य मिळवून देणें–ही होय. जोपर्यंत एखाद्या व्यक्तीला तुरुंगांत बांधून टाकिलें आहे तोपर्यंत, तिच्या हातून सत्कृत्यें घडणें व प्रगमन होणें हें जितकें अशक्य आहे, तितकेंच जोंपर्यंत एखादा देश राजकीय पारतंत्र्यांत खिळून टाकलेला आहे तोंपर्यंत त्याच्या हातून मानवी प्रगमनाला मदत होणें अशक्य आहे. अशा स्थितींत, "आपण सर्वजण एकमेकांच्या मुक्ततेबद्दल जबाबदार आहोंत. जर आपण आपल्या इतर मानवी बंधूंस परवशतेंत व अज्ञानांत तसेंच पडूं देऊं, तर परमेश्वराचा द्रोह केल्याचें महत्पाप आपल्या माथीं बसेल. स्वतःची उन्नति व मुक्तता करण्याचा एकच मार्ग आहे; व तो सर्वांना मुक्ति मिळेल असा प्रयत्न करणें हा होय." आपण ज्या देशांत जन्मलों व ज्या देशाचें अन्न खाल्लें त्याचें कर्ज फेडल्या-

शिवाय आपणांस स्वर्गाचीं द्वारें खुली होणार नाहीत, हें व्यक्तिविषयक मोक्षासाठी धडपडणाऱ्या ढोंगी साधूंस किंवा भ्रमिष्ट धर्माभिमान्यांस कळलें पाहिजे.

"भूतांची दया हें भांडवल संतां! आपुल्या ममता नाही देहीं!!
तुका म्हणे सुख पराचिया सुखें! अमृत हें मुखें स्रवतसे!!"

हें खरें धर्मरहस्य होय. व म्हणून धर्माभिमान्यांस व धर्मोपदेशकांस मॅझिनी विचारतो, "अहो धर्माधिकारी हो, तुमचाही जन्म या भूमींतच झाला नाही काय? तुम्हांलाही या भूमीनेच पोसलें नाही काय? हिच्याच दुधावर तुम्ही वाढला नाही काय? मग ती जुलमाखाली चिरडत असता तुम्ही स्वस्थ बसून स्वर्गांत कसें चढाल? तुम्हांला देश नाही काय? तुम्हांला भूतदया नाही काय? तुमच्या या कृतघ्नतेने तुम्ही पापी ठरत आहा. धर्म हा आता तुमच्या छावणींत नसून तो आमच्या छावणींत आलेला आहे. बायबलमध्ये स्वातंत्र्य पवित्र मानलें नाही काय? व तुमचा देश पारतंत्र्याने अपवित्र झालेला नाही काय? मग सर्वत्र स्वातंत्र्य नांदावें, मनुष्यांतील द्वेषभाव नष्ट व्हावा, धर्माचा खरा जयजयकार व्हावा, अशी जर तुमची खरी इच्छा असेल तर तुम्ही आम्हांस मिळा." अशा रीतीने धर्म हा राजकारणाचा विरोधी नाही हें मॅझिनीने आपल्या अधिकारयुक्त वाणीने प्रतिपादन केलें. तो स्वतःच एक ठिकाणीं म्हणतो कीं, "राजकारणाला आम्हीं धर्माच्या उच्चतेप्रत नेले." जे कारस्थानपटु धर्माचा व नीतीचा धिक्कार करून राजकारणाला धर्म नाही म्हणून म्हणत होते, व जे धर्मपट राजकीय स्थितीकडे दुर्लक्ष करून धर्माला राजकारण नाही म्हणून म्हणत होते त्या दोन्ही पक्षांचे अपराध व दोष उघडकीस आणून, "आयुष्यांत भिन्नता नाही, आयुष्य एकरूप आहे. परमेश्वराच्या आज्ञा परस्परविरोधी नाहीत. परमेश्वरी आज्ञा एकच आहे व ती सर्वांना सारखी लागू आहे." अशा पवित्र व उदात्त तत्त्वाचा मॅझिनीने उच्चार केला. राज्यक्रांतिकारक पुढाऱ्यांत नीति व धर्म यांच्या पावित्र्यांतून ज्याला राज्यक्रांतीची स्फूर्ति मिळाली आहे असा महात्मा मॅझिनीशिवाय अन्यत्र सापडणें हें युरोपच्या इतिहासांत दुर्लभ आहे. हें मॅझिनीचें विशिष्ट कर्तृत्व आहे. त्याच्या व त्याच्या उपदेशाने प्रवृत्त झालेल्या तत्कालीन इटालियन देशवीरांच्या आयु-

ष्यांत जो उदात्तपणा व पावनत्व दिसून येतें तें सर्व वरील नीतितत्त्वाचें फल आहे. स्वार्थासाठी नव्हे तर परमेश्वरी कर्तव्य म्हणून स्वदेश स्वतंत्र करण्यास जे देशवीर तयार होतात त्यांच्या तरवारीपुढे ऑस्ट्रियाच काय, पण गर्वानें मदांध झालेला वाटेल तो देश चळचळ कापू लागेल. जर सर्व लोकांचीं मनें राजकारण व धर्म हे एकरूपच आहेत अशा पूत निष्ठेने उद्युक्त होतील तर या जगांत पारतंत्र्याचें नांवदेखील उरणार नाही. **राजकारणाला धर्म आहे व धर्माला राजकारण आहे,** हें महत् सत्य, हें कालदेशाबाधित सत्य, हें परमेश्वरी सत्य ओळखून "जर माझ्या प्रिय देशभूमीचे दोन कोटी लोक 'आता स्वातंत्र्य मिळवावयाचेच' असें म्हणून उठले तर त्यांना एक ऑस्ट्रिया तर काय, पण असे तीन आस्ट्रिया एकत्र झाले तरी त्यांचा उच्छेद करून आपलें स्वातंत्र्य परत मिळविता येईल!" दोन कोटी देशबंधूंवरच त्या महात्म्याची ही केवढी उडी! मग जर त्याच्या देशाची लोकसंख्या याहून दहा पाच पट असती व त्याचा शत्रु जर ऑस्ट्रिया एवढाच असता, तर त्याने स्वदेशस्वातंत्र्य मिळवावयास एक क्षणही लागू दिला नसता! मर्दांची गोष्ट अशीच आहे. धर्म व स्वराज्य या तत्त्वद्वयाची एकरूपता मॅझिनीचे शब्दांत ऐकिल्यावर कोणाही महाराष्ट्रीयाला महाराष्ट्राच्या मॅझिनीची आठवण झाल्यावाचून राहणार नाही. सत्पुरुष हे परमेश्वराच्या अंशाने संभूत झालेले असल्याने त्यांचे आत्मे हे भिन्न नसतात व म्हणूनच त्यांचे विचारही परस्परांशी विसंगत होत नाहीत. निरनिराळ्या देशांतील त्यांची नांवें तेवढीं वेगळीं, बाकी तत्त्व एकच. इटलीमध्ये जन्मलेल्या रामदासांना मॅझिनी म्हणतात व हिंदुस्थानांत जन्मलेल्या मॅझिनीला रामदास म्हणतात. बाकी दोघेही एकच तत्त्व सांगतात कीं, राजकारण धार्मिक असेल तरच तें पवित्र आहे व धर्म राजकीय असेल तरच तो पवित्र आहे. "अमका मनुष्य धार्मिक आहे असें मला कळताच मी पहिला प्रश्न हा विचारीन कीं, त्याने लोकांच्या मुक्ततेसाठी काय केलें आहे व काय सोसलें आहे? अमका 'मनुष्य' आहे असें कळताच मी पहिला प्रश्न हा विचारीन कीं तो गुलाम आहे काय? कारण जो गुलामगिरींत स्वस्थ राहतो तो मनुष्य नसून ती नुसती जड माती आहे!"

राजकारणाला स्वार्थलंपटतेच्या तावडींतून सोडवून त्याला ईश्वरी कर्तव्याचें उच्च स्वरूप दिल्यानंतर मग अर्थातच त्या कर्तव्यासाठी प्रत्येक मनुष्याने कशा रीतीने उद्योग करावा हें सांगणें प्राप्त होतें. मॅझिनीची कर्तव्यमीमांसा फारच उदात्त तत्त्वांवर रचलेली आहे, परंतु येथे मी त्या महात्म्याच्या राजकीय मतांचीच साखळी देण्याचा प्रयत्न करीत असल्याने त्या मीमांसेचें यथास्थित विवेचन करणें शक्य नाही. मॅझिनीच्या "मानवी कर्तव्यें" या नांवाच्या अत्यंत चटकदार निबंधाचें भाषांतर करण्याचा हेतु आहे. तो जर सफल झाला तर ही कर्तव्यमीमांसा केवळ मराठी वाचकांना मॅझिनीचे शब्दांतून वाचावयास मिळेल. येथे इतकें सांगितलें म्हणजे पुरें आहे कीं, जें कर्तव्य म्हणून ठरत असेल तें मनुष्याने वाटेल तें संकट आलें तरी पार पाडलेंच पाहिजे, असें मॅझिनीचें मत आहे. **कर्तव्यासाठी कर्तव्य करा.** कर्तव्याच्या तत्त्वाने आत्मार्पणाचें सामर्थ्य येतें. ह्या उदात्त कल्पनेने आत्मा परमेश्वराच्या रूपांत लीन होतो. या कर्तव्यनिष्ठेने मनुष्याच्या अंगांत विलक्षण चैतन्य येतें. मनुष्य अचाट कर्में करू शकतो. या कर्तव्याच्या फलाशाविरहित निष्ठेने देशवीरांच्या फांशीचे खांब हे स्वर्गाकडे नेणारे जिने होतात." आयुष्य हें सुखलंपटतेंत न घालविता ते कर्तव्यलंपटतेंत घालवावें **"आयुष्य हें चैन नसून आयुष्य हें कर्तव्य आहे."** राजकारणांतील अगदी प्रथम आधारभूत कर्तव्य म्हटलें म्हणजे स्वदेश-स्वातंत्र्य हें होय. मनुष्यजाति, स्वदेश, कुटुंब व व्यक्ति अशा पायरीने मनुष्यांची कर्तव्यतारतम्यता आहे. या परंपरेच्या वाटचाला जी राजकीय कर्तव्यें आहेत त्यांमध्यें स्वदेश-स्वातंत्र्य हें प्रधान कर्तव्य आहेच आहे; परंतु राजकीय कर्तव्यासाठीच केवळ नव्हें तर इतर सर्व कर्तव्ये मनुष्याकडून यथास्थित रीतीने पार पाडण्यास स्वदेशस्वातंत्र्य आधी मिळविलें पाहिजे. व्यक्तीचीं किंवा कुटुंबांचीं कर्तव्यें जर त्यांच्या स्वदेशपारतंत्र्यांत असतील तर कधीहि यथास्थित चालावयाचीं नाहींत. लोकांत असत्य व दारिद्र्य माजून तो देश भ्याड व कमकुवत होतो. त्या देशाला ज्ञान देणें अशक्य होतें. "जेथे शिकण्यास दारिद्र्याने वेळ मिळत नाही तेथे नुसत्या शाळा उघडून काय होणार ?" या राजकीय पारतंत्र्याने देशांतील व्यक्ति व कुटुंब यांचीच वाढ खुंटते असें

नाही, तर मनुष्यजातीची वाढही तितक्या प्रमाणाने खुरटत जाते. "प्रत्येक देशाला मनुष्यजातीच्या उत्क्रांतींत भर टाकण्यासाठी एक विशिष्ट कामगिरी सांगितलेली असते. परंतु पारतंत्र्यामुळे तो देशच अस्तित्वांत आहे असें म्हणता येत नसल्याने, त्याच्या वाटयाला आलेलें कर्तव्य त्या देशाकडून घडणें अशक्य होतें व म्हणून तितक्या मानाने मनुष्यजातीची उन्नति अडकून राहते. सर्व देशाची उन्नति म्हणजे मानव्याची उन्नति ! परंतु जोंवर पारतंत्र्याने कांही देश नीचतेला खिळून टाकलेले आहेत तोंवर मानव्य उन्नतीला जाणार कसे ? म्हणून **व्यक्तीच्या, कुटुंबाच्या, समाजाच्या व मनुष्यजातीच्या सर्व प्रकारच्या उन्नतीचें मुख्य साधन जें राजकीय स्वातंत्र्य तें संपादन व संरक्षण करणें हें प्रथम कर्तव्य होय.** ही परमेश्वराची आज्ञा होय. ही धर्माची आज्ञा होय.

● ● ●

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 36224 वि: निबंध
क्रमांक 9/४१६६ नों दि 9.8.53

८

# अशा रीतीने लक्ष्मी लढली–

[ 'सत्तावनचे स्वातंत्र्यसमर' (भाषांतरकार प्रा. वि. वि. पटवर्धन) हा सावरकरांचा ग्रंथ म्हणजे क्रांतिकारकांची गीता किंवा गाथा गणली जाते. इंग्रजी राजवटींत जप्त झालेला आणि शेकडो क्रांतिकारकांना स्फूर्ति देणारा हा ग्रंथ. ग्वाल्हेरच्या रणांत राणी लक्ष्मीबाई लढता लढता कशी पतन पावली याचें सावरकरांनी केलेलें वर्णन अत्यंत ओजस्वी व काव्यमय आहे. तें रसोत्कट वर्णन पुढे दिलें आहे. ]

स्वराज्य त्यांच्या हातांतून निघून चाललें होतें. कारण पहिल्याने स्तंभित झालेला तोच सर ह्यू रोज आता आपल्या हाताखाली उत्कृष्ट सैन्यबल घेऊन मोठ्या त्वरेनें ग्वाल्हेरवर चालून आलेला होता! बरोबर येताना त्या नीच नी फितूर शिंद्यालाही पुढे घालून घेऊन तो आलेला होता; आणि त्याने ग्वाल्हेरला येताच 'आपण ही लढाई केवळ शिंद्याकरिताच करीत आहो' असेहि प्रकट सांगून टाकलें. आंधळ्या राजनिष्ठेचा नादान नी लाचार (दु) र्गुण अंगीं मुरलेल्या ग्वाल्हेरच्या साध्या भाबडटांना फसविण्याचा नी त्यांनी शिंद्याविरुद्ध हातीं शस्त्र धरून लढाईला सिद्ध होऊ नये म्हणून हा सारा डाव होता. परंतु आता जुना जमाना पालटून नव्या काळाचा जन्म झालेला होता. क्रांतिकारकांना युद्धांत उभे करण्यात थोडें फार यश आल्यामुळे इंग्लिशांशी झुंज देण्याला तात्या पुढे सरसावला. राणी तर खंबीरपणे, शांत नि लढ्याच्या सिद्धतेने सुसज्ज होती. तिनें आपली तरवार उपसलेली होती; मग कोणती भीति तिला भेडसावणार

होती ? आशेप्रमाणे निराशेलाहि तिने पायाखाली चिरडून टाकिलें होतें; ऐहिक गोष्टींचा तिला मनापासून तिटकारा आलेला होता. शेवटची एकच एक आशा नि आकांक्षा तिला जी उरली होती ती हीच होती की, अंतः-काळी, देहांतून शेवटचा श्वास बाहेर पडण्याचे वेळी आपल्या खड्गावर स्वातंत्र्याचा ध्वज आभिमानाने नि डौलाने डुलत असावा ! तें खड्ग आणि तो ध्वज हे केव्हांहि मलीन होऊन पदतळी पडण्यासाठी नव्हते; रण-भूमीवरच त्यांना चिरविश्रांति मिळावी असा संकेत होता ! म्हणून तिने रावसाहेबांना धीर दिला; शक्यती सर्व अव्यवस्थित सैन्याची पुन्हा जुळवा-जुळव केली; आणि पूर्व प्रवेशद्वाराच्या रक्षणाचें सर्व दायित्व आपण स्वीकारून ती सिद्ध झाली. त्या रणदेवतेने गर्जना करून लोकांना इतकेंच सांगितलें की, ‘ माझें कर्तव्य पार पाडण्यासाठी देहमन होमून मी सिद्ध झालें आहें; तुमचें कर्तव्य तुमचें तुम्ही पाहून घ्या ! ’

तिने नेहमीचा युद्धवेष धारण केला. आपल्या उमद्या घोड्यावर ती आरूढ झाली, आणि आपली रत्नजडित मुठीची तरवार म्यानांतून उपसून तिने आपल्या हाताखालील सैन्याला चढाई करण्यासाठी आज्ञा दिली ! कोटेकी सराईचा जो भाग तिच्या रक्षणासाठी सोपवून देण्यात आलेला होता, त्या ठिकाणी तिने आपापले सुसज्ज सैनिक उभे केले. इंग्लिशांचे सैन्य दृष्टीचे टप्प्यांत येताच शिगें, तुताऱ्या नि नगारे यांनी वातावरण दुमदुमून गेले. तिच्या धैर्याला आणि तिच्या साहसीपणाला शोभेल असे सैन्य जर तिच्या हाताखाली असते, तर – ! काचकूच करणारे नि हेंगाडे सैनिकही तिच्या नेतृत्वाच्या प्रभावाने वीरश्रीने रणांत उड्या घेत. अशा सैनिकांसह नि आपल्या निवडक घोडेस्वारांसह चालून जाऊन राणीने इंग्लिश सैन्याला चांगलेंच झोडपून काढलें. तिच्या दोन सख्या—मंदार आणि काशी—याहि अतुल शौर्याने तिच्याबरोबर लढल्या. पुरुषवेष धारण केलेल्या नि रणरंगांत रंगलेल्या या दोन आकर्षक बांध्याच्या स्वदेशभक्त तरुण मुलींची स्मृतीहि त्यांच्या स्वामिनीबरोबरच इतिहासांत, त्या इतिहासा-इतकीच चिरंजीव होऊन राहावी ! स्मिथसारखा सेनापति आज राणीच्या सैन्याशी लढा देण्यास आलेला होता ; तरी आजचें राणीचें साहस नि

शौर्य पाहात राहावे असेच होतें. बिजलीप्रमाणे ती आज रणामध्ये तळपत होती. इंग्लिशांनी राणीचा बळकट सेनाव्यूह फोडण्याचा अनेक वेळा यत्न करून पाहिला. पण प्रत्येक वेळी तिने आपली पकड येवढीसुद्धा ढिली पडू दिली नाही. तिचे सैन्य वेळोवेळी प्रचंड उत्साहाने इंग्रजांवर तुटून पडे नि इंग्रजांचा फडशा पाडून येई. शेवटी स्मिथला माघार घेणें भाग पडले. सेनाव्यूह फोडण्याचें दुर्घट काम तसेंच सोडून नागिणीच्या बिळांत हात न घालता त्याने आपलें लक्ष दुसरीकडे वळविलें !

अशा रीतीने त्या दिवशींचें युद्ध संपलें नि दि. १८ हि उजाडला. या दिवशीं अगदी निकराने रण लढविण्याचा इंग्लिशांनी निर्धार केलेला दिसला. सगळ्या बाजूंनी ते पराकाष्ठा करून किल्ल्यावर चालून आले. आदले दिवशी ज्याला सपशेल माघार घ्यावी लागली होती त्या जनरल स्मिथने बरोबर ताजेंतवानें साहाय्यक सैन्य घेऊन काल जेथून त्याला माघार घ्यावी लागली होती त्याच झांशीच्या बाजूवर तो आज पुन्हा चालून गेला. राणीहि आपल्या सर्व सैन्यांनिशी त्याचा समाचार घेण्यास सिद्ध झालेली होती. ' देहमन सारें होमून ती आपलें कर्तव्य आचरण्यास रणांत उतरलेली होती. ' त्या दिवशीं तिने डोक्याला चंदेरी बत्ती, अंगामध्ये तमामी अंगरखा नि पायांत पायजमा परिधान केला होता. मोत्याचा कंठा तिने गळ्यांत घातलेला होता. तिचा नेहमीचा घोडा दमल्यामुळे त्या दिवशी तिने एक नवीनच चिलखत-खोगीराने सुसज्ज असलेला ताजातवाना घोडा आपल्या मांडीखाली घेतलेला होता. तिच्या दोन दासी सरबत घेऊन जो येताहेत तो इंग्लिशांनी चढाई चालू केली असल्याची बातमी आली. तत्काळ ती एखाद्या तीरासारखी तंबूतून बाहेर पडून रणांगणावर उडी घेती झाली. बाणसुद्धा इतक्या वेगाने घुसत नसेल, मेघांमधून विद्युल्लताहि इतक्या चपलाईने कडाडत बाहेर पडत नसेल, आणि चालून येणाऱ्या हत्तीवरहि सिंहीण आपल्या गुहेतून इतक्या क्रोधाने झेप टाकून चालून जात नसेल—तितक्या वेगाने, तितक्या चापल्याने नि तितक्या क्रोधाने आपल्या तंबूतून बाहेर पडून राणी रणांगणावर उडी घेती झाली. एक इंग्लिश लेखक लिहितो ' लागलीच ती सुस्वरूप राणी रणांगणावर आली, नि ह्यू रोजच्या बळकट

सैन्यव्यूहासमोर निधडेपणाने तोंड देऊन प्रतिकार करीत उभी राहिली. पुनः पुनः चढायावर चढाया करण्यास ती आपल्या पलटणींना पाठवून देत होती. तिचा सैन्यव्यूह जरी शत्रूने ठिकठिकाणी फोडला होता नि तिचें सैन्य जरी क्रमाक्रमाने जास्तजास्तच रोडावत चाललेले होते तरी आघाडीवरच्या सैन्य विभागांत आपल्या कोलमडत चाललेल्या सैन्यामध्येही चेतना नि संघटना निर्माण करीत नि अश्रुतपूर्व पराक्रम गाजवीत ती सारखी तळपत असलेली दिसली.' परंतु कशाचाच आता उपयोग नव्हता. स्वतः सर ह्यू रोजने सांडणीस्वारांची पलटण राणीच्या पिछाडीवरून आंत घुसविली नि तिचा व्यूह फोडला. तरीसुद्धा त्या खंबीर नि निधड्या छातीच्या राणीने आपलें स्थान सोडलें नाही.

परंतु जेव्हां राणीच्या बाजूवरचें सैन्य असामान्य शौर्याने लढत होते तेव्हा पिछाडीवरून इंग्लिश सैन्यें आपल्यावर चालून येत असल्याचें तिनें पाहिलें; कारण पाठीमागे लढत असलेल्या क्रांतीकारक सैन्याचा प्रतिकार त्या वेळी संपूर्णपणे कोलमडून पडलेला होता.

तोफखाना बंद पडलेला, मुख्य सैन्याची पार धुळदाण उडालेली, विजयी इंग्लिश सैन्य सर्व बाजूंनी गोळा होऊन कोंडींत धरण्यास सरसावलेलें, अशा आणीबाणीचे वेळीं आपले दहापंधरा स्वार नि दोन दासी बरोबर घेऊन राणीने शत्रूचें कडें फोडून पलीकडच्या बाजूच्या आपल्या देशबांधवांना जाऊन मिळण्याकरिता भरधाव घोडा फेकला. हुझ्झार Hussars च्या फिरंगी घोडेस्वारांनी – ज्यांना आतापर्यंत राणी कोठे आहे याचा पत्ता नव्हता – राणीवर एकामागून एक गोळ्या सोडल्या नि शिकारी कुत्र्यांप्रमाणे त्यांनी तिचा पाठलाग आरंभिला. परंतु अद्वितीय अशा धाडसाने राणीने आपल्या तलवारीने रस्ता मोकळा करीत करीत आपली सुटका करून घेतली नि ती पुढे दौडत चालली. इतक्यांत एक किंकाळी आली, 'बाईसाहेब, मेले हो मेले.' देवा, देवा, कुणाची ही किंकाळी? लक्ष्मी वळून जो पाहते आहे तो तिला आपलीच दासी एका गोऱ्या सोल्जराच्या

गोळीला बळी पडून ठार झालेली दिसली. क्रोधाने देहभान विसरून तिने त्या फिरंग्यावर असा प्रखर प्रहार केला की, क्षणार्धांत तो जागच्या जागीं ठार होऊन पडला ! आपल्या सुकुमार मंदारचा तिने सूड उगविला ! ती पुढे दौडते आहे तो वाटेमध्ये एक ओहोळ आडवा आला. आता एकच उड्डाण की राणी फिरंग्याच्या तावडींतून निसटून जाणार होती. परंतु घोडा, उड्डाण घेईच ना ! या वेळीं जर तिचा तो पूर्वीचा घोडा असता तर – ! जादुगाराचा मायावी अग्नीच त्याचेभोवती पसरल्याप्रमाणें तो आपल्या भोवतीच चक्राकार फिरू लागला ; पण ओहोळ ओलांडून कांही जाईना. इतक्यांत डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोच इंग्लिश घोडेस्वार तिच्या पाठीवर येऊन भिडले. तरीहि भीतीची वा शरणागतीची भाषा नव्हती ! इतक्या अनेकांच्या तलवारींविरुद्ध एकटी एक तलवार लढत होती. एकटी राणी इंग्रजांवर तुटून पडली. पण येवढ्यांत एकाने पाठीमागून तिच्या डोक्यावर प्रहार केला. या जबर वारामुळे तिच्या मस्तकाची उजवी बाजू नि तिचा उजवा डोळाहि लोंबू लागला–इतक्यांत दुसरा वार छातींत बसला. " लक्ष्मी ! लक्ष्मी ! तुझ्या शरीरांतील रक्ताचा तो शेवटचा बिंदूहि आता गळून चालला ! आणि म्हणून हे माते, शेवटचा तुझा बळी तू आतां घे !" अगदी प्राणोत्क्रमण होण्याच्या शेवटच्या क्षणालाहि तिने आपल्यावर चालून आलेल्या फिरंग्याला कापून काढले ; आणि आतां ती मृत्यूच्या घटका मोजीत विकल होऊन रणांगणावर पडली. रामचंद्रराव देशमुख नांवाचा तिचाच एक अत्यंत प्रामाणिक सेवक त्या वेळी जवळ होता. त्याने झटपट तिला शेजारच्या झोपडींत उचलून नेले. गंगादास बावाने तिला पिण्यासाठी थंड पाणी देऊन पडण्यासाठी एक शय्याहि घालून दिली. रक्ताने थबथबलेली ती रणदेवता शय्येवर पहुडली मात्र, तों तिचा आत्मा तिचें पार्थिव शरीर सोडून स्वर्गाच्या दिशेने केव्हा निघून गेला ते कोणालाच कळलें नाही. रामचंद्ररावाने तिच्या अंतिम इच्छेला अनुसरून न दिसेल अशा ठिकाणी एक गवताची चिता सिद्ध केली नी राणीचा मृत देह तीवर ठेवला. आणि पारतंत्र्याचा पापी स्पर्श तिच्या मृत शरीराला होण्यापूर्वीच त्यास अग्नि देऊन दहन करण्यांत आले.

सिंहासनावर नाही तर चितेवर तरी! पण लक्ष्मी आपल्या प्रिय स्वातंत्र्यासह – आपल्या बहुमोल स्वातंत्र्यकौस्तुभासह – तेथेहि विराजत होती! रणभूमीवर पतन पावून तिने परलोकीं गमन केलें. पाठलाग – आता तिला कांहीहि करू शकत नाही! दुष्टांना तिचा पाठलाग करायचाच असेल तर तत्पूर्वी त्यांना धडधडणाऱ्या अग्निज्वालांमधून जाणेच अवश्य आहे!

अशा रीतीने लक्ष्मी लढली. तिने आपला निश्चय पुरा केला. आपलें ध्येय गाठलें नि महत्त्वाकांक्षा सफल केली. अशा प्रकारचें हें एखादें जिणें-सुद्धा उभ्या राष्ट्राच्या जिवंतपणाची साक्ष देण्यास पुरें असतें. सर्व सद्‌गुणांची ती आटवलेली मूर्तीच होती! साधी यःकश्चित् स्त्री, वयाने बावीस-तेवीस वर्षांचीहि नसेल! पण गुलाबासारखी मृदु मोहक, चालण्यासवरण्या-तहि अतिशय गोड नि चारित्र्याने अतिशय विशुद्ध – अशा या एका अबलेने, सहसा पुरुषांमध्येहि क्वचित् दिसून येणारे संघटनाचातुर्य प्रकट करून आपल्या प्रजेचीं मनें आकर्षून घेतली. स्वदेशभक्तीची दिव्य ज्योत तर तिच्या अंतःकरणांत सदोदितच तेवत होती. स्वदेशाची प्रतिष्ठा मिरविण्यांत जशी ती अग्रेसर होती तशी रणपांडित्यातहि ती कुणाला हात धरू देणारी नव्हती! अशा तऱ्हेची ही देवतातुल्य स्त्री, कन्या नि राज्ञी म्हणून लाभण्याचें भाग्य क्वचित् एखाद्याच राष्ट्राच्या वाट्याला आलें असेल! हें भाग्य इंग्लंडलाहि अद्याप लाभलेलें नाही! इटलीच्या क्रांतींत उदात्त ध्येये नि अत्युच्च कोटीतला पराक्रम यांची अनेक उदाहरणें पाहण्यास सापडतात; परंतु तरीहि या उज्ज्वल कालांत इटली, एकाहि लक्ष्मीला जन्म देऊ शकलेली नाही!

● ● ●

९

# अंदमानांतील शेवटचे दिवस

[ ' माझी जन्मठेप ' हें सावरकरांचें आत्मचरित्र अत्यंत लोकप्रिय आहे. इंग्रज सरकारने ठोठावलेली दोन जन्मठेपेची शिक्षा भोगण्यासाठी सावरकरांना अंदमानच्या कारागृहांत अनेक वर्षें खितपत पडावें लागलें. त्या ठिकाणीं त्यांनी ज्या धैर्याने व झुंजारवृत्तीने हालअपेष्टा भोगल्या त्यांचें रोमांचकरी वर्णन या पुस्तकांत वाचावयास मिळतें. कठोर शिक्षा भोगत असताहि सावरकरांनी तिथे राष्ट्रजागृतीचें नि समाजसंघटनेचें कार्य केलें आणि सरस असें काव्य रचलें. १९२० सालीं सावरकरबंधूंची अंदमानांतून अनपेक्षितपणें मुक्तता झाली. या मुक्तीची उदासरम्य हकीकत प्रस्तुत उताऱ्यांत आहे. ]

याच संधीस माझे कनिष्ठ बन्धु मला आणखी एकदा भेटावयास आले. माझ्या सुटकेची कांहीएक म्हणण्यासारखी आशा नव्हती. माझ्या ज्येष्ठ बंधूंची प्रकृति अगदी थकत आली होती. अशा वेळीं अशी भेट होताच पहिला विचार जो चित्तांत उभा राही तो हा कीं, ही भेट आता बहुधा शेवटचीच होणार ! आणखी एका वर्षाने जेव्हा भेटीस पुन्हा परवानगी मिळेल तोपर्यंत एक वर्ष जायचें. कारागारांत त्या झिजून झिजून क्षीण झालेल्या देहास एकेक दिवस काढणें दुष्कर झालेलें होतें. म्हणून बंधूस धीर करून स्पष्टच कळविलें कीं “ बाळ, सत्य कितीहि निष्ठुर असलें तरी सत्यास तोंड देण्यास भिण्याइतका किंवा कचरण्याइतका तुझा धीर दुर्बळ नाहीं ही माझी निश्चिति असल्यानें तुझ्यापासून वस्तुस्थिति लपवून ठेवण्याचें

मला कारण दिसत नाही. उलट हळूहळू आणि कळत कळत चालून येणाऱ्या दुःखाचा धक्का एकाएकीं येऊन कोसळणाऱ्या दुःखाच्या संघर्षापेक्षा अधिक सुसह असतो. म्हणून सांगतों कीं आता तूं आमच्या दोघांच्या जीवनांतील शेवटली बातमी ऐकण्यास सिद्ध होऊन रहा. आता फार दिवस निघतील असें दिसत नाही. तरीदेखील असंभवनीय गोष्टीहि घडतात हेंहि विसरू नकोस. क्वचित् यांतूनहि जगूं. पण आता तो संभव अगदी अलग! बहुधा ही शेवटची भेट ! ! !"

शब्दागणिक हृदयांत धक्के बसत होते. बाळाची मुद्रा अर्थातच एकाएकीं काळवंडली, पण ते निष्ठुर शब्द केवळ सत्याचेच पडसाद आहेत हें त्यासहि दिसत असल्याने विवेकाने ते बोलून टाकले, त्याने ऐकून घेतले !

आम्हांस दहा वर्षें झालीं म्हणून आम्हांस "तिकिट" मिळावें म्हणून आम्ही आवेदन केलें होतें. त्याचें उत्तर आलें की तुम्हांला ( आणि आमच्या ज्येष्ठ बंधूंना ) कारागारांतच "तिकिट" दिलें आहे ! ! तिकिटाचा अर्थच असा होता कीं त्या मनुष्यास स्वतंत्रपणें धंदा करता यावा आणि वसाहतींत स्वतःचें घर करून आणि बायकामुलेंदेखील निवसता यावें ; तें तिकिट इतरांस तीन वर्षांत देऊ म्हणून जेव्हा आज्ञा सुटली होती तेव्हा आम्हांस दहा वर्षांनी मिळालें ; कुठे ? कारागारांत ! म्हणजे कारागृहांतून आम्हांस बाहेर सोडलें नाही, स्वतंत्र वसाहत व घराचे नांवच नको आणि मिळालें तिकिट ! हा केवळ उपहास होता, दुःखावर ह्या केवळ डागण्या होत्या. अंदमानच्या निर्बंधाचे आणि त्यांतील बंदीवानांच्यासाठी लाभकारक व्हावे म्हणून घातलेल्या प्रत्येक शब्दाचे आम्ही एक मूर्तिमंत अपवाद होतों.

अशा रीतीने चहूंबाजूंनी कोंडमारा झाल्यामुळे केव्हा केव्हा आम्हांस आणि इतर कांही राजबंदिवानांस जीवन दुःसह होई. तेव्हा त्यांस आणि स्वतःस निरर्थक आत्मघातापासून बचाविण्यासाठी आम्ही आमच्या राजबंदिवानांतील अत्यंत जिव्हाळ्याच्या आणि विश्वासू साथीदारांसह एक निर्वाणीचा म्हणून भयंकर कट करून ठेवलेला होता. त्यांत आमच्या राजकीयव्यतिरिक्त साध्या बंदिवानांतीलहि कांही मंडळी घेतलेली होती,

अगदीं जेव्हा असें वाटेल कीं आता राजकीय बंदिवानांपैकी अमुक अमुक जणांस सुटण्याची अशी आशा उरली नाही तेव्हा त्या अगदी न सोडण्यासाठी म्हणून निवडून काढलेल्या सर्व बंदिवानांनी एकसहा………

एक दिवस एकदाचा रखडत गेला आणि संध्याकाळची घंटा झाली कीं वाटे सुटलों ! आता केवळ झोप ! गाढ सुख ! एक दुःखाचा दिवस संपला, सुटका एक दिवसाने जवळ आली ! – पण लगेच वाटावें ; होय, सुटका एक दिवसाने जवळ आली आणि मृत्यूही ! जो दिवस संपे तो शिक्षेंतून जसा उणा होई तसाच जीवनाच्या नियतकालांतूनही वजा जाई !

अशीच एका दिवसाची संध्याकाळची घंटा होऊन आम्ही तेलगोदामाला कुलुप लावलें, किल्ली मोठ्या जमादाराचे हातीं परत देऊन आपल्या खोलींत बंद होण्यास चाललों, कारण आम्हास "तिकिट" मिळालें तरी जसें कारागृहाच्या भिंतीच्या आंतच आम्हास दिवसा रहावें लागे, तसेंच रात्रीं कोणत्याही बिनतिकिटी बंद्याप्रमाणे खोलींत बंद होऊनच एकांतवासांत आणि अंधकारांत पडावें लागे. आम्ही किल्ली देऊन परतलों तो एका बाहेरून परत आलेल्या वार्डरने हातांत गुपचुप चिठ्ठी दिली. आणि मोठ्या आनंदाने हसून "चांगली बातमी आहे" असें म्हणत तो चटकन् निघून गेला. आम्ही चिठ्ठी उघडून पाहिली. त्यांत बातमी दिलेली होती कीं आज कमिशनरच्या मुख्य कार्यालयांत ( Head Office ) हिंदुस्थान सरकारची आज्ञा आली आहे कीं सावरकर बंधूंना हिंदुस्थानांत परत धाडा. मुंबईसरकारने त्यांस परत बोलावलें आहे ! !

मागे अशा बातम्या पन्नासदा उठल्या आणि मिटल्या, पण आम्ही अंदमानांतच उरलों. आमचा मुळीच विश्वास अशा बातम्यांवर नसे. हें आमच्या मित्रांस माहीत. म्हणून त्यांनी चिठ्ठीत लिहिलें होते "ही बातमी नक्की, आज्ञा प्रत्यक्ष पाहिली !"

असेल ! आता ही बातमी खरीहि असेल. कारण जिथें बंदीवानांना तीन वर्षांचे आंत बायकामुलें आणावयास परवानगी मिळू लागली तिथें आम्हांस दहा वर्षांनंतरहि "कारागृहांत तिकिट" ह्या विलक्षण आणि असंभाव्य निमित्ताने अधिक काळ कोंबण्याचा निर्लज्जपणा केव्हांहि फार

दिवस टिकणार नव्हता. एक तर आम्हांस अंदमानच्या वसाहतींत सहकुटुंब राहू द्यावें आणि पुष्कळ स्वतंत्रपणे वावरू द्यावें – नाही तर त्या वेळच्या बंदिवान हिंदुस्थानांत परत पाठविण्याच्या नवीन हुलीचा लाभ घेऊन हिंदुस्थानच्या कारागारांत पुन्हा सडत ठेवावें हेच दोन अर्थ होते. त्यांत अर्थातच आम्हांस अंदमानांत मोकळे सोडण्यापेक्षा हिंदुस्थानच्या कारागृहांत बंद ठेवण्याचा मार्गच अधिकाऱ्यास अधिक इष्ट होणारा होता. मागे जी गोष्ट आम्हांस मागून मिळाली नाही ती आता त्यांनी होऊन दिली. कारण त्यामुळे अंदमानच्या नाही तर हिंदुस्थानच्या ……… पण कारागृहाच्या भितींत आम्हांस कोंडून ठेवणें दहा वर्षांनंतरहि त्यांस शक्य होणारें होतें; आणि तेंहि दयेच्या नांवावर ! कारण हिंदुस्थानांतील लोकांस आम्हांस परत हिंदुस्थानांत आणलें ही, ह्या प्रश्नाची दुसरी बाजू माहीत नसल्याने, दयाच वाटणारी होती !

असे विचार रात्रभर मनांत येत होते. सकाळीं कारागृहांतील अधिकाऱ्यांनींहि बोलावून " तुमचीं पुस्तकें वगैरे सामान बांधून ठेवा " असें सांगितलें. तेव्हा आता बहुशः आमची हिंदुस्थानांत पाठवणी होणार हें निश्चित दिसू लागलें.

परंतु हिंदुस्थानांत पाठवणी होणार म्हणजे हिंदुस्थानांतील कारागृहांत बंद करण्यासाठी होय हें त्यांतील रहस्य ध्यानात न आल्याने अंदमानभर " सावरकर सुटणार " अशीच बातमी पसरली. जनतेने आपल्या आमच्या सुटकेविषयींच्या उत्कट आणि कळकळीच्या इच्छेलाच वास्तविक घटना समजून आम्हांस निक्षून सांगण्यास आरंभ केला कीं " छे ! छे ! बाबूजी, आता कारागृहांत तुम्हांस कोण कोंडतो ! तुम्हांला हिंदुस्थानांत जाताच सोडून देण्यात येणार हेंच निश्चित ! " त्यांच्या इच्छेलाच तिची पूर्ति समजून त्या प्रेमळ लोकांनी आमच्यावर अभिनंदनाचा पाऊस पाडण्यास आरंभ केला.

पण आम्हांस मात्र मनांत उद्विग्नता वाटू लागली. अंदमानच्या कारागृहांत निदान एक तरी सुख होतें कीं आमच्या ज्येष्ठ बंधूसह एकत्र राहता येई. आता हिंदुस्थानच्या कारागृहांत त्यांस बहुधा निराळें करण्यांत येऊन भिन्न-भिन्न प्रांतांत धाडण्यांत येईल ! दुसरें असें की अंदमानांत दहा वर्षें ज्यांच्या

सान्निध्यांत काढलीं त्या वसाहतींतील लोकांत आमचे अनेक इष्टमित्र झालेले होते. त्यांच्यांत "तिकिट" मिळून स्वतंत्रपणे सहकुटुंब रहाता येण्याची संधि जवळ आलेली असताना आता पुन्हा हिंदी बंदीगृहांत डांबून पडावयाचें. त्या अंदमानी इष्टमित्रांस अंतरावयाचें – आणि हिंदी इष्टमित्रांस तर पूर्वीप्रमाणेच जाताना जसें जन्मठेपीचें दुःख मनाला उद्विग्न करीत होतें, तसेंच आता अशा स्थितींत अंदमानांतून परत हिंदुस्थानांत येताना इष्टमित्रांच्या विरहाचें दुःख आम्हांस व्यथित करूं लागलें. ही जन्मठेपीची दुसरी शिक्षाच होते आहे असें वाटूं लागलें.

आम्ही पुस्तकांची बांधाबांध केली. त्यांतील बरीच पुस्तकें त्या तत्रस्थ ग्रंथालयास दिलीं. पुष्कळशी तेथल्या बंदिवानांत आणि स्वतंत्रांत वाटून दिलीं. शेवटच्या दिवशीं बाहेरची मंडळी या नाही त्या निमित्ताने सारखी भेटावयास येऊन जात होती. क्षणोक्षणीं मला भीति वाटे कीं, या दाटीचा खरा अर्थ समजून अधिकारी एखाददुसऱ्यास जर धरतील तर या बिचाऱ्यांच्या पोटावर आपल्यासाठी पाय पडेल, पण त्या दिवशीं जवळजवळ कोणी कोणास विचारीनासे झाले. त्या दिवसापुरती बंदीवानांनी अधिकाऱ्यांची भीति जवळजवळ धाब्यावर बसविली. अधिकाऱ्यांनीहि अतिप्रसंग केला नाही. आम्ही नको नको म्हणता आणि आम्ही प्रत्यक्ष भेटणें ज्यांस अशक्य होत होतें त्यांनीदेखील भेट म्हणून फळें, फुलें, मिठाई, सोड्याच्या बाटल्या, बिस्कुटांचे डबे इत्यादि वस्तु कारागृहाच्या फाटकांत पोचविण्याचा धडाका चालविला. दीन दरिद्री ते बंदिवान आणि स्वतंत्र लोक! काय जे दहा पांच रुपये महिन्याचे मिळतील त्यांत संसार! पण भक्ति केवढी! न पुसता, विचारता आणि सरकारी निर्बंधास न जुमानता एखादें केळें, एखादें कलिंगड, एखादें फूल पण त्या दिवशीं कारागृहाचे दाराशीं ठेवून जात! दुपारीं मी अंतःस्थपणे दारावर गेलों तेव्हा त्या जमलेल्या डब्यांतील, फळांतील आणि इतर पेयादिकांच्या बाटल्यांच्या ढिगांतील वस्तु तिथेंच वाटून दिल्या. अगदी कोणी ऐकेना तेव्हा कांही जवळ घेण्यास ठेवल्या. नंतर जे एक दोन होतकरू इष्टमित्र शांतपणे भेटावयास आले होते त्यांपैकीं एकास तेथील संस्थेची शपथ दिली.

" एक देव एक देश एक आशा
एक जाति एक जीव एक भाषा "

ह्या तेथें प्रचलित केलेल्या मंत्राचा अर्थ त्यास समजाविला. ह्या " एक आशे "च्या पूर्ततेसाठीं अशा " एक जीव " झालेल्या हिंदुमात्राने प्रसंगी प्राणहि अर्पण करून काय केलें पाहिजे तें सांगितलें – आणि त्या ध्येयाच्या सिद्धीसाठीं तसला महान् स्वार्थत्याग करण्याची शक्ति येईतों आणि यावी म्हणूनच सद्य:परिस्थितींत त्या त्या व्यक्तींचीं अंदमानांतील कोणतीं कर्तव्यें आहेत तीं रीतीप्रमाणे कथन केलीं.

इतक्यांत पहारेकऱ्याने कळविलें " साहेब आता है. आपको ले जानेवाली शिपाईओंकी तुकडी भी आती है. "

आम्ही उठलों. मनास एक प्रकारचें पवित्र समाधान वाटू लागलें कीं, दहा वर्षे अंदमानाच्या या कारागृहांत आशेच्या थडग्यांत पुरलेले राहूनहि ज्या दिवशीं तें कारागृहाचें दार आता दहाबारा वर्षांनी पुन्हा उघडणार तेव्हा त्या शेवटच्या दिवशीचें आमचें शेवटचें कृत्यहि तेंच होतें कीं जें करण्याचें व्रत वयाच्या अकराव्या वर्षीं अंगिकारलें होतें. हिंदी तरुणास जी दीक्षा देण्यासाठी त्या कारागृहाचे दाराआंत पाय टाकावा लागला त्या कारागृहाचे दाराबाहेर आज दहा वर्षांनी पाय पडत असता हिंदी तरुणांस तीच दीक्षा देताना उच्चारले जाणारे " एक देव एक देश एक आशा, एक जाति एक जीव एक भाषा " तेच ते शब्द आमच्या ओंठावर होते !

आम्हांस आणि आमच्या बंधूस फाटकांत उभें करण्यांत आलें. बंदिपालाने आम्हांस हिंदुस्थानांत नेण्यासाठी शिपायांच्या पहाऱ्यांत दिलें. " बेडी घालण्याची आवश्यकता नाहीं. " असें त्या उदार बंदिपालाने बजावल्याने आम्हांस तसेंच पुढे चालविलें गेलें आणि एकदांचे तें त्या अंदमानाच्या भयंकर बंदिगृहाचें दार आमच्यासाठी उघडलें !

१९०९ व्या सनांत तें असेंच एकदा उघडलें आणि आमच्या बंधूस आंत गिळून बंद झालें. १९११ सनीं पुन्हा तो विक्राळ जबडा उघडला आणि आम्हांस गटकावून बंद झाला ! तेव्हा पुन्हा कांही जिवंतपणीं बाहेर

पडण्याची आशा कोणास निश्चितपणे वाटत नव्हती. तें १९११ च्या वर्षी बंद झालेलें तें त्या कारागृहाचें दार आज १९२० च्या वर्षी पुन्हा करकरलें, त्या जबड्याचें तें तोंड पुन्हा उघडलें — आणि आम्ही दोघेहि बंधु जिवंतपणीं आंतून बाहेर पडलों !

त्या लोखंडी फाटकाचा तो एवढासा लोखंडी 'उंबरा' वलांडताना आम्हांस स्पष्ट कल्पना येऊन गेली कीं आम्हीं जिवंतपणी अंदमानहून सुटत आहोंत. बाबांस म्हटलें, " बाबा, हा एवढासा उंबरा जीवनमरणांच्या सीमेची रेषा आहे. ओलांडला ! मरणाच्या सीमेंतून जीवनाच्या सीमेंत हा वीतीएवढा उंबरा ओलांडून आपण पुन्हा एकदा पाय टाकला ! ! आता पुढचे पुढें ! ! ! "

आम्हांस निरोप देण्यासाठी आणि ज्या अनेक दूरवरच्या लोकांनी आम्हांस पाहिलें नव्हतें ते पहाण्यासाठी येऊन कारागृहाच्या बाहेर दाटी होईल ती होऊ नये म्हणून साहजिकच कडक बंदोबस्त ठेवण्यांत आला होता. ठिकठिकाणचे बंदिवान आपआपल्या कामावर गुंतविले गेले होतेच. तरीहि शक्य त्या त्या निमित्ताने लोक दूरवर दबून दबून बसलेले होते. आम्ही शिपायांच्या पहाऱ्यांत समुद्राकडे थोडेसे वाट चालू लागतों तोंच एक बंदी अधिकारी जमादारीचे कामावर असलेला आणि थोडेच दिवसांत " तिकिटा " वर सुटण्याचा अधिकार ज्यास मिळू शकता तो एकाएकीं पुढे झाला ; आणि आम्हांस पहाऱ्यांत घालविताच शिपायादिकांस न जुमानता एका चांफ्याच्या फुलांच्या केलेल्या साध्या फुलमाळेस त्या सर्व बंदिवानांचे वतीने आमच्या गळ्यांत घालता झाला. ते पहाऱ्याचे शिपाई आरडाओरड करतात तों आमच्या पायावर डोकें ठेवून जयजयकार करीत तो निघूनहि गेला होता. अशा निर्बंधाविरुद्ध कृत्याने त्याची जमादारी जाऊन उलट त्यास शिक्षाहि होती. पण त्याने त्याची चिंता केली नाही.

एका बाजूस तो भाविक बंदिवान जमादार सर्व बंद्यांचे वतीने म्हणून ती चाफ्याची साधी माळ गळ्यांत घालीत आहे, आणि दुसऱ्या बाजूस त्या गडबडीने घाबरलेला शिपायांचा अधिकारी आम्हास ओढाताण करीत हातांत हातकडी घालू पहात आहे हें आमच्या स्वतःचें त्या वेळचें दृश्य अजून डोळ्या-

समोर दिसत आहे. शक्य तोंवर लोकांमध्ये आमची स्मृतिदेखील उरू नये, आमच्या छायाचित्रास, पुस्तकास, आमच्या आठवणीसहि घरांत वा जनांत बाळगण्यास लोकांनी धजू नये, एतदर्थ तशा कृत्यास अपराधाप्रमाणे दंडनीय करून टाकणाऱ्या सरकारच्या वीस वर्षांच्या अव्याहत प्रयत्नांचा तो हातकडी घालण्यास ओढाताण करणारा सरकारी अधिकारी एक प्रतीक होतें, आणि तरीहि आमच्या आठवणीस भक्तीने न विसरणाऱ्या आमच्या देशबांधवांच्या आम्हांस यावज्जीवन लाभलेल्या प्रेमळ आदराचें तो चांफ्याची माळ घालणारा बंदिवान-अधिकारी हा दुसरें प्रतीक होतें ! ज्या दोन शक्तींच्या परस्परविरुद्ध आघातप्रत्याघातांचें हें आमचें जीवन प्रथमपासूनच एक रणक्षेत्र झालेलें आहे, त्यांचें तें दृश्य म्हणजे एक लाक्षणिक रेखाचित्रच होतें. हा विचार बाबास बोलून दाखविल्यावाचून आम्हांस रहावेना.

अंदमानांत दहाबारा वर्षे आम्हीं दोघांनी केलेल्या त्या वसाहतीच्या उन्नत्यर्थ प्रयत्नांचा, ती चाफ्यांच्या फुलांची चोरून गुंफलेली साधी माळ, हा खरोखर बहुमूल्य पुरस्कार होता ! त्या प्रयत्नांचे श्रम हरण झाल्यासारखे वाटलें. रत्नांच्या मालेहून त्या रानचाफ्याच्या फुलांची ती माळ अधिक प्रिय वाटली. ती गळयांत पडतांच दुरून उठलेल्या दबत्या टाळयांचा गजर तिच्यामध्यें किती प्रेमळ कृतज्ञता गुंफलेली होती तें प्रदर्शवीत होता. मजविषयीं लोकांत अप्रीति आणि भय उत्पन्न करण्याच्या सरकारी आटोकाट प्रयत्नास ती चांफ्याच्या फुलांची साधी माळ हें अखंडनीय उत्तर होतें !

• • •

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३६२२५ वि: निबंध
क्रमांक ९१४१६८ नोंद दि: ९६-३

१०

# माझी मालती कुठे आहे हो?

[ ' काळें पाणी ' ही सावरकराची एकमेव यशस्वी कादंबरी. अंदमानी जीवनाचें रम्यभीषण दर्शन घडविणारी आणि समाजांतील ढोंगी बुवाबाजीचा दंभस्फोट करणारी. अशी उत्कंठापूर्ण, रोमहर्षक व गतिमान कादंबरी मराठींत क्वचितच आढळेल. वत्सल, करुण, रौद्र आणि भयानक रसांनी रसरसलेल्या या कादंबरींतील मायलेकींच्या ताटातुटीचा प्रसंग पुढे दिला आहे. सावरकरांच्या कोमल, मधुर आणि स्निग्ध लेखणींतून उतरलेला हा प्रसंग भावना हलवून सोडणारा आहे.]

" आई, म्हण ना, एक ओवी तरी तू. जा! आम्हीं तेवढ्या तुला ओव्या म्हणाव्या गोड गोड, पण तू तेवढी मला एकदेखील ओवी म्हणू नये अं! " मालतीनें झोपाळ्यावर आणखी एक उंच झोका घेत घेत लाडिकपणे रमाबाईंना म्हटले.

" एक ग कां बाळ? एक लाख ओवी म्हणेन बरं बाळे तुला, पण आता तुझ्या आईचा स्वर तुझ्यासारखा मंजुळ राहिला नाही. केळीच्या सोलपटाच्या धाग्यांत झेंडूची फुलं ओवता आली, तरी जुईच्या फुलांची माळ ओवायची तर मऊ मऊ रेशमाचं कोवळं सूतच हवं. नाही तर माळेचीं फुलं मात्र नासून जायची. प्रेमळ ओव्या तुझ्या गोड सुरामध्ये असतात, त्याहून लडिवाळ लागतात. म्हणून अशा लडिवाळ ओव्या तुम्हीं मुलींनी म्हणायच्या नि आम्हीं आयांनी ऐकायच्या. मीं ओवी म्हटली तर चीर गेलेल्या सतारी

सारखं गाण्यांतलं गोडपण गळून जाऊन माझ्या चिरकल्या आवाजाचं मात्र तुला हसू येईल."

" येऊदे हसू आलं तर ! हसू तरी गंमत वाटल्याचंच ना ? माझी गमतीची करमणूक करायला तरी म्हटल्याच पाहिजेत दोन-चार ओव्या तुला ! देवाच्या ओव्या नि स्तोत्रं ग कशी तास तास म्हणतेस ? तेव्हा नाही वाटतं आवाज चिरकत ? पण माझ्यावरच्या चार-दोन ओव्या म्हणायच्या तर लगेच सतारी चिरकतात ! आयांनी मुलींच्या ओव्या नुसत्या ऐकायच्या असल्या तर आयांनी म्हणायच्या कितीतरी मायाळू ओव्या रचलेल्या असतात. मलादेखील कांही येताहेत बरं का !"

" मग तूं आई झालीस ना म्हणजे म्हण बरं तुझ्या बाळाला !" रमाबाई मनापासून हसल्या.

लाजेने ओशाळल्या स्वरांत मालती रुसून म्हणाली, " मी आपली म्हणेन नाही तर न म्हणेन जा ! तूं नाही ना म्हणत मला एखादी गोड ओवी ?"

आणि लगेच आईला लगटून आणि तिच्या हनुवटीशी आपली चिमुरड्या ओठांची जिवणी लावून ती किशोरी आर्जवू लागली.

" हें ग काय असं ? तूं माझी आई ना ? मग तूं नाही तर कोण ग म्हणेल मला आईच्या लाडांची ओवी ?"

" तूं माझी आई ना ?" हें तिच्या एकुलत्या एका मुलीचे लडिवाळ शब्द ऐकताच रमाबाईंच्या हृदयांत वात्सल्याचें इतकें भरतें आलें कीं, एखाद्या पित्या लेकरासारखें त्या तिच्या लेकराचें तें सुरेख मुख आपल्या छातीशी लावावेसें तिला वाटलें. आणि मालतीचे मटामट मुके घेण्यासाठी रमाबाईंचे ओठ फुरफुरले. पण आईचें प्रेम जितकें उत्कट असतें तितकेंच वयांत येऊं लागलेल्या मुलीशी वागताना ते संकोची असतें.

मालतीच्या गालाला अगदी लागत आलेलें आपलें तोंड मागे घेऊन तिच्या आईने त्या वयांत येऊ लागलेल्या लेकीच्या वदनाला दोन्ही हातांत क्षणभर दाबून तेवढे धरलें आणि हळूच मागे सारीत मालतीला अश्वासिलें.

" म्हणतें बरं बाळ तुला ओव्या ! दोन- तीनच अं पण !"

"हं, आता खरी गंमत!" असें उल्हासून मालतीनें झोपाळ्याला भुईकडून चवड्यांच्या नेटानें रेटून झोक्यामागून झोके दिले. "हें काय? म्हण ना. एखाद्या अंगचुकार गवयासारखी तालसूर लावण्यांतच अर्धी रात्र काय घालवतेस?" असें मालतीनें पुन्हा एकदा कोपरानें डिवचताच रमाबाईंच्या तोंडाशी जी ओवी आली ती त्या म्हणू लागल्या.

अगे रत्नांचिया खाणी । नको मिरवू ऐट मोठी ।
बघ माझ्याही ये पोटीं । रत्न 'माला'।। १ ।।
जाता येता राजकुंवरा । नको पाहू लोभूनिया ।
दृष्ट पडेल माझीया । मालतीला ।। २ ।।
देतें माझं पुण्य सारं । सात जन्मवेरी ।
माझ्या रक्षावे श्रीहरी । लेकुरा या ।। ३ ।।
पुरोनि उरू द्यावी । जन्मभरी नारायणा ।
कन्या माझी सुलक्षणा । एकूलती ।। ४ ।।

'एकुलती' हा शब्द गाण्याच्या नादांत उच्चारला जाताच एकदम जसा विंचू डसावा तशी कोण्या तीव्र दुःखाची आठवण होऊन रमाबाईंचें मन व्याकुळ झाले. आपल्या मुलीला अशा आनंदाच्या भरांत तें शल्य बोचू देऊन व्याकळवू नये म्हणून रमाबाईनी तोंडावर जरी खिन्नतेची छाया उमटू दिली नाही तरी तें गाणें मात्र त्यांच्या तोंडाबाहेर निघण्याचे अकस्मात् बंद झालें. मालतीला वाटलें कीं, ओव्या म्हणताना आईला दम लागला ह्यामुळें ती सहसा चूप बसली असावी. आईला विसावा द्यावा आणि गाण्याची गोड लहर तिला आलेली होती तीहि उठू नये म्हणून आपली पाळी आली असें समजत ती स्वतःच पुढच्या ओव्या म्हणू लागली. तिच्या आईने तिला ज्या ममतेनें रसरसलेल्या ओव्या म्हटल्या होत्या, त्यांच्या त्या गोड शब्दाशब्दागणिक तिच्या हृदयाला आनंदाच्या गुदगुल्या झाल्या होत्या. प्रियकराच्या प्रेमळ आराधना ऐकण्याची ओढ लागण्याच्या आधी मुलींना आईच्या लडिवाळ कौतुकासारखी गोडी दुसऱ्या कशांत बहुधा वाटत नाही.

संध्याकाळच्या वेळीं पश्चिमेकडची समोरची बाजू उघडी असलेल्या आपल्या ओटीवरच्या झोपाळ्यावर बसलेली ती सुरेख सडपातळ बांध्याची किशोरी आपल्या सुस्वर गाण्याची माधुरी आपणच उपभोगीत उंच उंच झोके घेऊ लागली. झोपाळा एका बाजूच्या उंचीवरून उतरत असता वाऱ्याने तिच्या पाठीवरचा पदर फडफड करीत जेव्हा उडे, तेव्हा वाटे कीं संध्याकाळी दूरवरच्या घरट्यांकडे उडत जाणाऱ्या कोणा सुंदर पक्ष्यांच्या थव्यांतील मागे राहिलेलें हें पाखरूहि असे पंख उभारून लकेरीमागून लकेर घेत घेत उल्हासाच्या आकाशांत आता उडून जातें की काय कोण जाणे !

माउलीची माया । न ये आणिकाला ।
पोवळ्या माणिकाला । रंग चढे ॥ १ ॥

नये आणिकाला । माया ही माऊलीची ।
छाया देवाच्या दयेची । भूमिवरी ॥ २ ॥

माऊलीची माया । कन्यापुत्रांत वाटली ।
वाट्या प्रत्येकाच्या तरी । सारीची ये ॥ ३ ॥

जीवाला देते जीव । जीव देईन आपुला ।
चाफा कशाने सूकला । भाईराजा ॥ ४ ॥

माझं ग आयुष्य । कमी करोनी मारुती ।
घाल शंभर पूरती । भाईराजाला ॥ ५ ॥

गाण्याच्या ओघांत मालती आता जी ओवी तोंडी येईल ती गात चालली होती. पहिल्या ओव्या तिच्या मनाच्या बोलींत रचलेल्या होत्या. तिच्या आईवर जी तिची लडिवाळ ममता होती, तीच त्या ओव्या निवडून निवडून मालतीच्या कंठाच्या सनईतून गात होती. परंतु पुढच्या ओव्या अर्थासाठी निवडून म्हटल्या नव्हत्या; तर त्या मराठी गवई हिंदी पदांचा अर्थ तितकासा न बघता जसा त्या गाण्यांतील चालींच्याच हौसेसाठी काय तो तीं पदें गातो, अशी ती गात गेली. पण तिच्या आईचें लक्ष त्या ओव्यांतील अर्थाकडेहि वेधलेलें असल्यामुळे मालती तिच्या भाईराजाला लागू असलेल्या ओव्या गाण्याच्या भरांत जेव्हा गात चालली, तेव्हा तिच्या

आईचें ऊर दुःखानें दाटत येऊन आता रडूच कोसळतें की काय अशी तिला भीति पडली. तिच्या त्या दुःखाची छाया मालतीच्या त्या हसत्याखेळत्या आनंदावर पडून तो काळवंडून जाऊ नये म्हणून रमाबाईनी तिला असह्य होत चाललेल्या ह्या मालतीच्या ओव्या बंद पडाव्या ह्यासाठी मालतीला मध्येच हटकलें.

"माले, बाळ थांब गडे. भोवळ येऊ लागली बघ मला. किती मेले उंच झोके घेतेस हे!"

असें निमित्त काढून भुईला आपल्या पायांचा दट्टया देत आईने झोपाळा थांबवला. त्यासरशी मालतीच काय ती त्या झोपाळ्यावरून खाली उतरली नाही, तर उंच लकेऱ्यांच्या झोक्यांत बेभान झालेलें तिचें मनहि गाण्याच्या खालीं झोपाळ्यावरून उतरलें आणि भानावर आलें.

पाहाते तो आईचे डोळे पाण्याने डवरलेले! तोंड दुःखाच्या तीव्र स्मृतीने गोरेमोरें झालेलें! मालतीच्या तत्काळ ध्यानांत आलें कीं, होय ना होय, आपल्या वारलेल्या वडील भावाची आईला आठवण झाली असावी आणि आपल्या तोंडांतून सहजी बाहेर पडलेल्या भावावरील ओव्यांनीच तिचें मन भडभडून आलें असावें! तिच्या आईला तिच्या नाहीशा झालेल्या वडील पुत्राची आठवण त्या प्रसंगाला इतकीं वर्षें लोटलीं तरी अधूनमधून असें कांही विशेष निमित्त घडले कीं अगदी एखाद्या ताज्या दुःखासारखी असह्य होत असे, आणि ती ममताळू आई ढसढसा रडत असे. मालतीला त्या त्या वेळीं आईची समजूत कशी काढायची, आईच्या त्या दुःखावेगाला टाळणारा, नसा बधिरविणारा उतारा कोणता तोहि मालतीला ठाऊक होता.

तिने पटकन् आईच्या मांडीवर डोकें टेकलें, त्यासरशीं तिचें तोंड गोरेंमोरें आपण होऊनच झालें; तिच्या डोळ्यांतहि पाणी आपण होऊनच टचकन् आलें आणि मग तिच्या सवयीप्रमाणे तशा आपल्या मुखाला आईच्या हनुवटीपर्यंत उचलून मालती काकुळतीने बोलली.

"असं काय बरं आई? मी तुझ्या मनाला आनंदविण्यासाठी ओव्या म्हणू लागलें तों चुकून तुझ्या दुःखाची खपलीच अशी उचटून बसलें! कशा मेल्या मला सुचल्या त्या ओव्या काय की!"

मालतीच्या मनाला ती चुकी इतकी बोचलेली दिसली की, तिच्या आईला स्वतःच्या मागच्या दुःखापेक्षा त्या स्फुंदूं लागलेल्या लेकीचें चालू दुःखच साहवेनासें झालें आणि रमाबाई झटकन् रडे गिळून मालतीचेंच समाधान करूं लागल्या.

" वेडी कुठली ! अग, तुझ्या ओव्यांनी नव्हे बरं ! मींच ओवी म्हणता म्हणता तुला माझं एकुलतं लेकरू असं म्हणून गेलें ना, त्याचं मला वाईट वाटलं बरं एवढं ! देवानं मला दोन लेकरं दिलीं असतां माझ्या दैवानें एक हिसडून नेऊन एकच तेवढं उरूं दिलं तें शल्य मला सहसा बोचलं ! उगी बाळ ! तूं नाही बरं माझ्या दुःखाची खपली उचटलीस. उलट त्या दुःखाला किंचित् तरी हलकं करणारं जर कांही रसायन असेल तर तें तुझ्या ह्या आनंदी मुखावरील सुखाचं हसूच काय तें होय ! झालं तें कांही परत का येतं ? तुझ्या भावाची तुझ्यावर इतकी ममता असे की, तुला मीं त्याच्या वियोगाच्या दुःखानंसुद्धा रडवलं तर तो माझ्यावर रागावेल; त्याचा आत्मा जिथं असेल तिथं तळमळेल ! तूं त्याच्याच ठिकाणीं आहेस ना मला ! मग तुझ्यांतच माझीं दोन्हीं लेकरं सामावलेलीं आहेत, नाही का ? उगी ! अग हो, आज त्या नव्या आलेल्या साधूच्या भजनाला रात्रीं जायचं आहे ना ? चल तर उठ. आता पेटत घालतें मी, तूं झाडलोट–पाटपाणी कर. आपलीं जेवणं उरकतात तो नायडूबाई येतीलच बोलवायला ! "

त्या मायलेकी घरांत गेल्या. हें एक लहानसें टुमदार घर रमाबाईंनी गेल्या महिन्यांतच मथुरेला क्षेत्रनिवासासाठी येऊन स्वतंत्रपणें भाड्यानें घेतलें होतें.

रमाबाईंचे भ्रतार त्यांना दोन मुलें झाल्यावर एकाएकी वारले. रमाबाईंचा चरितार्थ सुखवस्तूपणें चालू शकेल इतका पैसा आणि कांही दागिने त्यांच्या भ्रताराने मागे ठेवले होते. त्यावर रमाबाईंनी आपल्या दोन्ही मुलांची जोपासना कांही वर्षें नागपूरकडच्या त्यांच्या मूळच्या गांवींच केली. पुढे त्यांच्या पुत्राला सैन्यामध्ये नोकरी लागली. तो तिकडं गेला तेव्हा त्यांची कन्या मालतीच काय ती रमाबाईंपाशी उरली. दोन चार वर्षांतच

हिंदुस्थानबाहेरील इंग्रजांशी चाललेल्या कोण्या लढाईवर हिंदी सैन्य धाडण्यांत आलें, त्यांत रमाबाईंच्या पुत्रालाहि जावें लागलें, परंतु तिकडे गेल्यावर तो जवळजवळ बेपत्ताच झाला. मोठ्या खटपटीनंतर रमाबाईंना एकदांचे अधिकाऱ्यांकडून कळलें की, तो सैनिक कांही कारणाने अधिकाऱ्यांशी भांडून फरारी झाला असून बहुधा शत्रुपक्षाकडून मारला गेला असावा !

त्या गोष्टीला पांचसहा वर्षें उलटून गेलीं होतीं. रमाबाईंचा पुत्र सैन्यांत गेला तो तिकडेच वारला, ही गोष्ट रमाबाईंच्या गांवी लोकांना इतकी पटली होती कीं, आता तिचा सगळ्यांना विसरहि पडला होता. पण रमाबाईंना त्याचा पूर्ण विसर कसा पडेल? त्यांना आपल्या पुत्राचा विसर पडला नव्हता ; इतकेंच नव्हे, तर तो पुत्र मारला गेला आणि आता ह्या लोकीं पुन्हा कधीच भेटणार नाही, हेंहि त्यांना केव्हा केव्हा खरें वाटत नसे. लढाईत मारल्या गेलेल्या सैनिकांच्या अगदी प्रेमातल्या नातलगांमध्ये ही मनोवृत्ति बहुधा अशीच आढळून येते. अजूनहि रमाबाईंना तो त्यांचा पुत्र मारला गेला हें केव्हा केव्हा खरें वाटेनासें होई. कोणतीहि आशा उरली नव्हती तरी शंका कांही फिटेना. त्यांचा पुत्र दूरदेशीं लढाईवर जाऊन मेला हे शब्ददेखील उच्चारणें त्यांच्या जिवावर येऊन त्या म्हणायचेंच भाग पडलें तर इतकेंच म्हणत की, माझा वडील मुलगा तिकडे लढाईत नाहीसा झाला.

पुत्राच्या मृत्यूचें वर्तमान कळल्यानंतर दुःखाने खचलेल्या त्या बाईचा जीव तिच्या उरलेल्या एकुलत्या एका मुलीच्या मायेवरच काय तो जगत होता. मालतीचें कोडकौतुक करण्यांत त्यांनी कांही कमी करू नये. ती जी वाढू लागली तीहि चंद्रकलेसारखीच अधिकाधिक शोभिवंत दिसू लागली. तिच्या त्या लडिवाळ, चपल पण सुशील चालण्याबोलण्यामध्ये असा कांही मोहकपणा असे कीं, तिच्या आईच्याच नव्हे, तर जो जो तिला पाही त्याच्या त्याच्या नयनाला आणि मनाला ती चतुर्थीची चंद्रकला पाहिल्यासारखाच आनंद होई. सुरेख मोती पाहिलें की, ते कोण्यातरी शोभिवंत अलंकाराचीच सामग्री आहे, हें जसे सहजी वाटतें, तसे कोण्यातरी मोहक, मंगल आणि सुखकारक जीवनासाठीच हिला निर्मिली असावी, असें त्या किशोरीला

पाहताच वाटू लागे. तिला आता चौदावें वर्ष उलटून गेलें होतें आणि तिच्या आईच्या मनांत तिच्या भवितव्याविषयी सोनेरी आशांचें आणि आकांक्षांचें एक उद्यानचे उद्यान बहरू लागलें होतें.

रमाबाईंची फार दिवसांची मैत्रीण म्हणजे सूतिका अन्नपूर्णाबाई नायडू ह्या होत. त्या आजकाल मथुरेला नोकरीवर होत्या. त्यांच्या आग्रहाने आणि तीर्थयात्रा करण्याची रमाबाईंच्या देवलसी मनाला आवड असल्यामुळे, त्या मालतीसह महिना पंधरा दिवसांसाठी मथुरेला आल्या होत्या. मथुरेची प्रख्यात स्थळें, मंदिरें, आणि साधुसंत ह्यांचीं दर्शनें घेण्यांत त्यांचा मुख्य पुरोहित आणि वाटाड्याहि ह्या नायडूबाईच असत. त्यांनाहि साधुसंतांची मोठी आवड असे. कोणताहि नवा साधु मथुरेला प्रख्यातीला आला की त्याचा उपदेश ऐकायला आणि प्रसंगीं यथाशक्ति सेवाहि करायला अन्नपूर्णाबाई नायडू सहसा चुकत नसत.

त्यांच्या घराशेजारच्या घाटावरच गेल्या महिन्यांत जो एक योगानंद नांवाचा साधु आपल्या शिष्यांसह येऊन उतरला होता, त्याच्याकडे सध्या अन्नपूर्णाबाई नायडू भजन–पूजन–दर्शनार्थ जाऊ येऊ लागल्या होत्या. त्या योगानंद स्वामींना भूतभविष्यवर्तमान जाणण्याची दैविक शक्ति आहे असा जिकडे तिकडे गाजावाजा होत चालला. रात्रीं त्या साधूच्या मठींत भजनाचा गजर भरांत आला कीं, त्या नामसंकीर्तनाच्या रंगांत शतावधि लोक रंगून जाऊन भक्तिभराने नाचू लागत. नायडूबाईंच्या तोंडून योगानंदस्वामींना रमाबाईंची माहिती कळली तेव्हा, त्यांनीं देवाचा प्रसाद स्वतःच्या हस्ते, त्यांच्या विशेष कृपेचें निदर्शक म्हणून, रमाबाईंना धाडला. रमाबाई मालतीसह त्या भजनोत्सवालाहि गेल्या दोन-तीन रात्रीं जात असत. स्वतः योगानंदांनीहि एकदा दोनदा थोडीफार विचारपूस करण्याची कृपा रमाबाईंवर केली होती.

योगानंदांविषयी गांवांतील कुटाळ टोळींतहि कांही टवाळकी होऊ नये इतकें त्यांचें वर्तन देवलसी, निर्लोभ, सरळ आणि साधें असे. भजनांत ते रंगले म्हणजे त्या सत्पुरुषाचे, जगाचें वा देहाचें भानच सुटे असें दिसे. त्यांची मुख्य साधना भजन हेंच असे. बाकी कोणताहि ढोंग-धतुरा त्यांच्या

मठांत दिसत नव्हता. शिष्यसंप्रदाय मात्र भरपूर, त्या साधूच्या मागे मागे शिस्तीने चालताना, मठांत शिस्तीनें वागताना, नेहमी आढळे. मथुरेंतून त्यांचा तळ आता लवकरच हलणार होता. त्यासाठी ह्या शेवटच्या सप्ताहांत भजनाची धुमश्चक्री चालू होती. शेकडो लोक रात्रीं तेथें दाटत असत.

रमाबाई मालतीला घेऊन आजच्या रात्रीच्या भजनमहोत्सवाला तेथेंच जाणार होत्या. त्या मायलेकींनी रात्रीचें जेवण आटोपलें न आटोपलें तोंच नायडूबाईंची थाप दारावर पडली. लगेच त्या तिघीजणी घाटावरील स्वामीजींच्या मठाकडे जाण्यासाठी लगबगीने निघाल्या.

रमाबाई मालतीसह जों भजनाच्या ठिकाणीं पोचतात तों भजन अगदी भर रंगांत आलेलें दिसलें. त्या घाटावर जिकडे तिकडे दूरवर लोकांची दाटी झालेली ! हिंदी भजनाप्रमाणे मोठमोठ्या झांजा घेऊन पन्नास-पाऊणशें गोसावी साधुसंत योगानंदांच्याभोवती घेर धरून नामसंकीर्तनाचा गजर चालू आहे; मुख्य दहा-वीस शिष्य ते पखवाज, मृदंग, वीणा, झांज प्रभृति वाद्यें ताल-सूर-ठेका ठाकठीकपणे धरून योगानंद महंतांच्या अगदी सन्निध सज्ज आहेत; आणि मध्यभागीं कधी बसून तर कधी भक्तीच्या आवेशांत उठून योगानंदजी उंच, खड्या आणि तन्मय स्वरांत भजनें म्हणत आहेत ! त्या दूरवरच्या दाटींतून आंत जायची सोयच नव्हती. पण नायडूबाईंच्या वशिल्याने आधीच त्यांना महंताच्या मंदिरांतील राखीव जागीं नेऊन बसवण्यासाठी एक शिष्य ठेवलेला होता. त्याने त्या मंडळींना वाटेने पाहताच योगानंदजींच्या आज्ञेप्रमाणे त्या तिघींनाहि नेऊन बसवलें.

इकडे भजनाचा रंग भरांत आला होता. श्रीमत् साधु तुलसीदासजींच्या एका पदाचें तें तें चरण त्या शंभर भजनिकांच्या शंभर कंठांनी परिपुष्ट अशा स्वरांत उंच उंच चढून दुमदुमत राहिलें--

तुलसी मगन । हरिगुणगानोंमें ।।
मगन भये । हरिगुणगानोंमें ।। ध्रु ।।

कोई चढे हाथी । घोडा पालखी सजाके ।।
साधु चले पैया पैया चिंटिया बचाके ।।
मगन भये । हरिगुणगानोंमें ।। तुलसी. ।।

झांजांचा झणझणाट रक्ताचा बिंदु न् बिंदु थरथरवू लागला. भक्ति-रसाच्या डोहांत सारा समाज जणू डुंबत होता! हरिनामावाचून इतर कोणत्याहि मनोवृत्तीचा ध्वनि ऐकू येईनासा झाला; पण तो एकाचा दुसऱ्याला तेवढा ऐकू येईनासा झाला कीं ज्याचा त्यालादेखील ऐकू येत नव्हता, तें कोणी सांगावें ?

इतक्यांत त्या उंच चढलेल्या शतकंठनिवादी सुराला उतरवीत पदांची चरणें योगानंदजी एकटेच इतक्या तल्लीनपणे म्हणू लागले कीं, शिष्यादिक भजनिकांनी झांजांची गोंगाटी साथ बंद करून चिपळ्यांची साथ धरली. " तुलसी मगन भये । हरिगुणगानोंमें ॥ हें चरण गोड उलटापालटीने हळुवार सुरांत गात गात योगानंद उभे राहिले.

त्या पदाचा अर्थ कांही योगानंद सांगत नव्हते ; पण ज्यांना कळे त्यांना त्या भजनांत अर्थाचे ग्रंथ ऐकू येत. ह्या जीवनाची साधना जो तो आपल्या आवडीप्रमाणे आचरीत आहे; आनंदाच्या मागे जो तो लागला आहे; कोणी भोगांतून तर कोणी योगांतून; जशी ज्याची आणि जितकी ज्याची मनाची उन्नति तशी त्याची आवड; 'स्वभावो मूर्ध्नि तिष्ठते !' तेव्हां बाह्य साधनाचा वाद हवा कशाला ? तुम्हांला आनंद होईल त्यांत तुम्ही रमा, त्यांना आनंद होईल त्यांत ते रमोत. माझ्यापुरते विचाराल तर " तुलसी मगन भये । हरिगुणगानोंमें । हरिगुणगानोंमें । हरिगुणगानोंमें ॥ "

कोणी उंच चंदनी पलंगावर गाद्या-गिरद्यांत लोळण्यासाठी खटपटत आहेत; त्यांना त्यांत आनंद वाटतो. पण कोणी असलेल्या पलंगांनाच नव्हे, तर कामुक पत्नींनाहि सोडून देऊन एखाद्या बुद्धासारखे बोधिवटाखाली, उघडयावाघडया स्थळीं, नुसत्या भुईवर पडून झोपत आहेत; त्यांना खरी गाढ अशी झोप तिथें लागते. गाढ झोप लागावी हें जर उद्दिष्ट, तर ज्याला ती जिथे लागेल तिथेच त्याने निजणें इष्ट. माझंच साधन तुला केलं पाहिजे हा वाद कशाला ?

कोणी हत्तीवर तर कोणी घोडयावर तर कोणी पालखींत मोठया डौलांत चालत आहेत; त्यांना त्यांतच आनंद वाटत आहे. त्यांचा तोच स्वभाव. पण हा साधु पाहा. त्याला हत्तीवर चढणें फाशीवर चढण्याइतकेंच दुःखद.

पालखींत आपण बसून ती दुसऱ्यांनी वाहावी, ह्या अरेरावीची त्याला इतकी लाज वाटते, कीं पालखीचा स्पर्श होतांच त्याच्या मनाला विस्तवाचा चटका बसल्यासारखें दुःख होतें. म्हणून तो साधु पायी चालतो आणि पायी चालतो तेव्हादेखील त्याला कीडमुंगीसुद्धा आपल्या पायांखाली मरेल कीं काय, ह्या भीतीने त्यांची कींव येऊन कीड-मुंगी वाचवण्यासाठी पाहून पाहून पाय टाकीत चालतो. त्याला त्यांतच खरा आनंद.

कोई चढे हाथी घोडा पालखी सजाके ।।
साधु चले पैया पैया चिंटियां बचाके ।।
पैया पैया । चिंटियां बचाके ।।
पैया पैया । चिंटियां बचाके ।।

हे चरण अगदी मंद, शांत सुरामध्ये घोळीत घोळीत योगानंदस्वामी आपलीं पावलेंहि एकेक मोजून संथपणे टाकीत वीण्याच्या सुरावर पुनः-पुन्हा गाऊ लागले,

" पैया पैया चिंटियां बचाके ।। साधु चले पैया पैया चिंटिया बचाके ।। "

त्या वेळीं तुलसीदासजींच्या पदांत उल्लेखिलेला साधु तो हाच कीं काय, असेंच ज्याला त्याला भासलें. कारण कीं, योगानंदांची ही एक विशेष संवय असे कीं, वाटेनें, घाटानें, हाटांत कोठेंहि ते चालत असले तरी पाहून पाहून एकेक पाऊल किंचित् उचलून टाकीत जात.

त्यांच्या स्वतःचेंच साधुत्व, ह्या तुलसीदासजींच्या पदांतील चरणांमुळें लोकांच्या मनावर बिंबवायच्या कामीं उपयोगी पडावें म्हणूनच जरी तें भजन इतकें रसाळ तत्मयतेनें ते गात नसले, तरीहि त्याचा परिणाम मात्र तोच झाला. तुलसीदासजींच्या कसोटीलाहि योगानंदजींचें साधुत्व पुरेपूर उतरतें, हें ज्याला त्याला न सांगता समजून आलें.

अशा भजनोत्सवांत मध्यरात्र उलटून गेली. आरतीच्या वेळीं स्वामींचे चरण शिवण्यासाठी लोकांची मोठी दाटी उडाली आणि त्या गडबडींतच जेव्हा तो समुदाय परत घरीं जाण्यासाठी बाहेर पडू लागला, तेव्हा एकच रेटारेटी चालू झाली. इतक्यांत नायडूबाई, रमाबाई आणि मालती जेथून

बाहेर पडत होत्या तेथे कोणातरी दहा-पांच जणांची अकस्मात् भांडाभांड जुंपून मोठा गोंधळ माजला. तो मोडण्यासाठी म्हणून स्वामीजींचे दहा-पांच शिष्य छड्या घेऊन आंत घुसले. जो जिकडे फुटला तो माणूस तिकडेच रेटीत नेला गेला. मध्ये तुंबळ दाटी घुसत चालली. त्या फाटाफुटींत रमाबाई कोठे, नायडूबाई कोठे, तर मालती कोठे पांगली, त्याचा एकमेकींना पत्ता नाहीसा झाला. पण इतक्यांत अगदीं गोंधळून चेंगरत आलेल्या रमाबाईंचा हात स्वामींच्या एका शिष्याने धरून त्यांना दाटीबाहेर काढलें आणि सांगितलें कीं, " स्वामीजींच्या आज्ञेने स्त्रियांना विशेष तत्परतेने पोचवायसाठी आम्हांला धाडलं आहे. आपण आपल्या घरीं चला."

" पण माझी मालती कुठे आहे ? मालती ?" गांगरून, घाबरून रमाबाई विचारते तोंच त्याने झटपट त्यांना पुढे पुढे नेतच सांगितलें, " सगळ्यांना घरोघर पोचविलं आहे, तुम्ही चला पुढे. बस्स !"

अर्धी वाट दाटीने खेचाखेचलेली. तींतून शिष्याने रमाबाईंना जवळजवळ ओढीतच आणलें. " जा, आता तडक घरीं जा. तिथे उरलेल्या माताजींना आधीच नेऊन पोचविलं आहे." असें आश्वासून उत्तर ऐकण्यात वेळ न दवडता तो शिष्य इतर कोणी स्त्रीमाणूस दाटींत सापडलें असल्यास त्याला बचावून घरीं पोचवण्यासाठी निघून गेला, दाटींत मिसळला.

रमाबाई धडधडल्या हृदयाने आणि झपाझप पावलांनी घरीं चालल्या. स्वामीजींनी एवढ्या दंगलींत आपणा सर्वांची इतकी विशेष काळजी घेऊन घरोघर पोचवावे, हे उपकार एकीकडे आठवीत आणि दुसरीकडे मालती दाराशीच आपली वाट पाहात किती घाबरलेली असेल तें चिंतीत त्या घराशी आल्या. अंधारांतून त्यांनी ओटीकडे पाहिलें, पण मालतीची वा कोणाचीच चाहूल लागेना. कंदील लावून पाहिलें, दाराला कुलूप जसेंच्या तसेंच ! मालती पुढे आल्याचा कांहीच सुगावा नाही. भजनाच्या शेवटीं जी रेटारेटी झाली, त्यांत चेंगरलेली मालती ओक्साबोक्शी रडते आहे, असा भास त्यांना होऊं लागला.

" मालती, ए मालती !"

रमाबाईनीं दोन हाका कशाबशा आणि कशासाठी काय कीं त्या ओसाड अंधारालाच मारल्या आणि तिसरी हाक तशी उगीचच्या उगीच देऊन जातात तोंच त्यांचा कंठ भरून येऊन, रडे कोसळून, त्या मटकन् खाली बसल्या. तेथे नसलेल्या कोणाला आपण विचारीत आहोंत हें ध्यानांत असताहि त्या स्फुंदत स्फुंदत मोठ्याने पुसून गेल्या, "माझी मालती कुठे आहे हो? माझी मालती आली का हो?"

• • •

११

# तोडून टाका ह्या–सात स्वदेशी बेड्या

[ सावरकर हे केवळ जहाल देशभक्तच नव्हेत, तर समाजसुधारकहि आहेत. जातिभेद नाहीसे होऊन हिंदुसमाज संघटित व प्रबळ व्हावा यासाठी त्यांनी लेखणी-वाणीच्या द्वारे वर्षानुवर्षे प्रचार केला. समाजसुधारणेच्या हेतूने त्यांनी लिहिलेले लेख म्हणजे मराठी निबंधवाङ्मयाचा अमोल ठेवा आहे! सावरकरांचें पांडित्य, तळमळ, युक्तिवाद, तार्किक विचारसरणी, तेजस्वी पण कांहीशी खडबडीत गद्यशैली इत्यादि गुण त्यांच्या निबंधांत प्रकर्षानें आढळून येतात. प्रस्तुतचा त्यांचा जातिभेदोच्छेदक निबंध या दृष्टीने महत्त्वाचा आहे.]

नव्या जुन्या मताच्या अनेक लोकांकडून वारंवार असें विचारण्यांत येतें की, अहो ह्या तुमच्या जन्मजात जातिभेदोच्छेदक आंदोलनाचे घटक तरी कोणते, काय करायचें तरी काय काय ह्या जाती मोडायला, जाति मोडणें म्हणजे तरी नक्की काय मोडणें नि काय ठेवणें, सूत्र काय, कार्यक्रम काय ?

अशा अगदी योग्य, सहज नि अपरिहार्य शंकांचे वा आक्षेपांचे समाधानार्थ ह्या लेखांत आम्ही आज आपल्या हिंदुराष्ट्रास छिन्नविछिन्न करून टाकण्यास कारणीभूत झालेल्या आणि होणाऱ्या या आजच्या पोथीजात जातिभेदास उच्छेदिण्यास्तव आपण हिंदूंनी जें आंदोलन केलें पाहिजे, जी एक सामाजिक क्रांति घडवून आणली पाहिजे, तिचीं मुख्य सूत्रें नि कार्यक्रम यांची केवळ रूपरेखा ‘ निर्भीडच्या ’ वाचकवृंदासाठी देत आहों.

(अ) आज आपल्या हिंदूंत जो जन्मजात म्हणविला जातो तो जातिभेद निव्वळ पोथीजात आहे. मद्रासी ब्राह्मणापेक्षा महाराष्ट्रीय चांभार गोरे असतात. महारांत चोखामेळ्यासारखे संत नि डॉ. आंबेडकरांसारखे विद्वान् निपजतात, तर उत्तर हिंदुस्थानांतील शेकडो ब्राह्मण पिढीजाद शेतकीचा धंदा करता करता निरक्षरचे निरक्षर राहतात. ब्राह्मण शिंप्यांची, सोनारांची, कातड्याचे बूट विकण्याचीं दुकानें चालवितात तर शिंपी, सोनार, वाण्यांत आय्. सी. एस्. एम्. ए. पदवीधर होतात. जाट लोकांस ते रजपूत असूनहि इतकें हीनजाति मानतात कीं जाटाने क्षत्रियाच्या घोड्यावर बसण्याचा हक्क छिनावल्यास जातिबहिष्कार्य पाप समजून हाणमार होते; पण त्याच जाटांची शेंकडा पन्नासवर भरती होऊन जो शीख समाज बनला तो आज क्षत्रियांतील तिखट क्षत्रिय म्हणून गाजत आहे; पठाणासारख्यांची रग रजपुतांनी कधीहि जिरविली नाही अशी जिरवून काश्मीर काबूलपर्यंत राज्यें तो चालवून राहिला आहे. जाटच नव्हेत तर पंजाबांतील अनेक खालच्या शूद्रवर्गीय जातींतूनही हजारों लोक शीख समाजांत शिरले आणि सिंग -- 'सिंह' -- झाले! शीख समाजांत निदान तत्त्वतः तरी जातपात नाही. तरीहि आमच्या 'छापा' च्या क्षत्रियांहून त्यांचें बळ, तेज नि पराक्रम कमी नाही. कायस्थ 'शूद्र,' पण बंगाल्यांतील विवेकानंद अरविंद—सारे पाल, घोष, बोस, कायस्थ, बुद्धींत, विद्येंत, बंगाली ब्राह्मणांच्या रेसभर पुढेच! पानपतचा सेनानी भाऊ ब्राह्मण! 'यातिशूद्र – वंश' तुकाराम परम संत. या सर्व प्रतिपदींच्या अखंडित पुराव्यावरून हें सिद्ध होत आहे कीं, पूर्वी पांच हजार वर्षांचे आधीं काय होतें नि नव्हतें, तें असो वा नसो, आज ज्या जाति विभिन्न म्हणून मानल्या जातात त्यांत वर्ण वा गुण वा कर्म ह्यांच्या कसोटींत संघशः असा कोणचाही ठाम 'जन्मजात' भेद आढळत नाही. त्या जाति 'जन्मजात' नसून आज निव्वळ 'पोथीजात' काय त्या झालेल्या आहेत. कोणतीहि जन्म-जात खरीखरी अशी विशिष्ट उच्चता अंगी नसतांहि, पोथीने 'उच्च जात' म्हणून एक जुनाट पाटी ठोकलेल्या घरांत जन्मला म्हणून हा ब्राह्मण, हा क्षत्रिय! ही वस्तुस्थिति यथार्थपणे व्यक्तविण्यास्तव आम्ही 'पोथीजात' हा

शब्द बनविला. आजचा जातिभेद हा जन्मजात म्हणविला जात असला तरी तो जन्मजात नसून आहे निव्वळ पोथीजात ! – निव्वळ मानीव ! खोटा !

( आ ) यास्तवच कोणतीहि जात वा व्यक्ति केवळ अमक्या पोथीजात गटांत गणली वा जन्मली एवढ्याचसाठी उच्च वा नीच मानली जाऊ नये. ज्याची त्याची योग्यता त्याच्या त्याच्या प्रकट गुणावरूनच काय ती ठरविली जावी. आणि त्या स्वभावाचा गुणविकास होण्याची नि करण्याची संधि सर्वांस समतेने दिली जावी. गुणविकासाचा आनुवंश ( Heredity) हा एकच घटक नसून परिस्थिति (Environments) हाहि एक महत्त्वाचा घटक आहे. अमक्याचा पडपणजा बुद्धिमान् व शूद्र होता म्हणूनच केवळ त्याचा पडपणतु, प्रत्यक्षपणे मूर्ख वा भ्याड असतांहि, तो बुद्धिमान् वा शूर असलाच पाहिजे असें गृहीत धरून, त्यास पंतप्रधान वा सरसेनापति नेमीत ( रहाणारे ) रहाणारें राष्ट्र धुळीस मिळालेंच पाहिजे. मोटारींत बसायचें तर त्या मोटारहाक्यास मोटारीचें प्रमाणपत्र मिळाले आहे कां हेंच विचारलें पाहिजे. त्याच्या पणजाला मोटार हांकता येत होती म्हणूनच केवळ, आनुवंशाने मोटारहाक्या असलाच पाहिजे असें गृहीत धरून नि त्या मनुष्यास मोटार हाकण्याची कला स्वतः प्रत्यक्षपणे येत नसताहि त्याला मोटारीवर हाकण्यास बसवून तींत प्रवासास निघणें हा जसा आत्मघातक मूर्खपणा आहे, तसाच अमक्या पोथीजात जातींत जन्मला म्हणूनच अमूक उच्च नीच मानणें आणि त्याला त्याला ते ते जन्मजात विशिष्टाधिकार देणें हाहि राष्ट्रघातक मूर्खपणा आहे. प्रकट गुणावरून आनुवंश अनुमानला जावा. केवळ मानीव आनुवंशावरूनच गुण गृहीत धरला जाऊ नये.

(इ) मनुष्यकृत, परिवर्तनीय, नि प्रसंगीं परस्परविरोधी ग्रंथांत काय सांगितलें त्यावरूनच काय ती कोणतीहि सुधारणा योग्य की अयोग्य हें ठरवीत न बसता " ती विशिष्ट सुधारणा त्या विशिष्ट परिस्थितींत राष्ट्रधारणास हितकर आहे की नाही " हें प्रत्यक्ष प्रमाणच काय तें विचारांत घेतलें जावें. आणि परिस्थिति बदलेल तसें निर्बंधहि ( कायदेहि ) बेधडक बदलीत जावें.

(उ) ह्या जुन्या धर्मग्रंथांतील कांही किंवा सारे निर्बंध वा विचार आजच्या परिस्थितींत जरी त्याज्य वाटले तरी देखील मागच्या त्या त्या परिस्थितींत राष्ट्रधारणाचे उपयुक्त कार्य करण्यास त्यापैकी कित्येक आचार नि विचार कारणीभूत झाले असल्यामुळे, ती राष्ट्रीय ग्रंथसंपत्ति आम्ही ऐतिहासिक कृतज्ञतेने नि साभिमान ममत्वाने आदरणीय नि संरक्षणीय मानली पाहिजे. इतकेंच नव्हे, तर जगांतील त्या काळच्या राष्ट्राशी तुलना केली असता आमच्या राष्ट्राने संपत्तीचें, सामर्थ्याचें नि संस्कृतीचें अत्युच्च शिखर जें गाठलें त्या आमच्या राष्ट्रीय पराक्रमाचें नि यशाचें हे श्रुतिस्मृति-पुराणेतिहास प्रभृति प्रचंड संस्कृत वाङमय एखाद्या हिमालयासारखें मूर्तिमंत स्मारकच असल्याने त्यास त्या दृष्टीने आम्हीं पूज्य नि पवित्रहि मानिलें पाहिजे.

(ए) एतदर्थ आपल्या श्रुतिस्मृतिप्रभृति मागील सर्व शास्त्रांचा अगाध अनुभव नि विविध प्रयोग यांचे तात्पर्य जमेस धरून, परंतु त्यांच्या बेड्या पायांत ठोकून न घेता या पोथीजात जातीभेदास तोडण्यासाठी आजच्या परिस्थितीच्या विज्ञानाच्या कसोटीस उतरतील त्या त्या समाजसुधारणा आपण तत्काळ घडवून आणल्या पाहिजेत. अमक्या सुधारणेस ‘ शास्त्राधार ’ आहे का ? हा प्रश्न दुय्यम. आपल्या हिंदुराष्ट्राच्या संघटनास नि अभ्युदयास अमकी सुधारणा आजच्या परिस्थितींत अवश्य आहे ना ?–हा प्रश्न मुख्य; मग त्यास शास्त्राधार असो वा नसो. मागील भूतकालचा राष्ट्रीय अनुभव ध्यानीं घेता नि शक्य तो भविष्यकालाच्या क्षितिजाची छाननी करता, आजच्या परिस्थितींत ज्या अर्थी ह्या पोथीजात जातिभेदाने आपल्या हिंदु-राष्ट्राची हानीच हानि होत आहे, ज्या अर्थी या पोथीजात जातिभेदाने मंदिरांतून, मार्गांतून, घरांतून, दारांतून, नोकऱ्यांतून, ग्रामसंस्थांतून, नगर-संस्थांतून, विधिमंडळांतून, विधिसमितींतून (कौन्सिलांतून, असेंब्लींतून), हिंदुजातीचीं शकलें शकलें उडवून, आपसांत कलहच कलह माजवून अहिंदु आक्रमणांस तोंड देण्याची संघटित शक्ति हिंदुराष्ट्रांत उत्पन्न होणेंच दुर्घट करून सोडलें आहे; आणि ज्याअर्थीं ह्या कुजलेल्या पोथीजात जातिभेदापासून जे कोणते तथाकथित लाभ आजहि होत आहेतसे वाटतें ते त्यापासून

होणाऱ्या अमर्यादित-राष्ट्रीय प्रगतीच्या मानाने अगदी तुच्छ आहेत, त्याअर्थी हा पोथीजात जातिभेद आमूलाग्र उच्छेदिणें हेंच आजच्या आपल्या खऱ्या हिंदुराष्ट्राच्या उद्धाराचें एक अपरिहार्य साधन होऊन बसलेलें आहे. सारा युरोप, सारी अमेरिका या पोथीजात जातिभेदाच्या व्याधीपासून मुक्त असताहि, किंवा मुक्त आहे म्हणूनच, एकसारखी समर्थ, स्वतंत्र, सबल अशी भरभराट पावत आहे. आणि आम्ही त्यास कवटाळून बसलों असताहि; किंबहुना कवटाळून बसलों आहोंत म्हणूनच, एकसारखे विघटित, परतंत्र, दुर्बल होत चाललों आहोंत ! यावरूनहि राष्ट्रीय बलसंवर्धनांस नि अभ्युदयास त्या व्याधीची अपरिहार्य आवश्यकता नसून उलट आडकाठीच येते हें उघड आहे. यास्तव मागचे शास्त्राधार असोत वा नसोत-आजची आवश्यकता म्हणूनच हा पोथीजात जातिभेद अजिबात उच्चाटिलाच पाहिजे.

'सात स्वदेशी शृंखला'

तो उच्चाटिण्यास्तव आपणांस सात बेड्या तोडल्या पाहिजेत. आपल्या राष्ट्राच्या पायांत ज्या बाह्य स्वदेशी आपत्तींच्या बेड्या आहेत त्या तोडण्याचें सामर्थ्य, ह्या आपल्या पायांत आपणच हौशीने, धर्म म्हणून ठोकून घेतलेल्या 'स्वदेशी' बेड्या तोडल्याने अधिकच संचरणारें आहे. त्यांतहि ह्या सात स्वदेशी बेड्या तोडणें हें सर्वस्वी आपल्या स्वतःच्याच हातीं आहे. 'तूट' म्हटलें कीं त्या तुटणाऱ्या आहेत. ह्या पायांत आहेत तोंवर आपणांस चालता चढता ठोकरी मागून ठोकरी खाण्यास विपक्षास लावता येते. पण आपण त्या तोडून टाकू निघालों तर त्या बळेच आपल्या पायांत डांबून टाकण्याचें सामर्थ्य मात्र विपक्षांत नाही. अस्पृश्यता आम्ही ठेवीत आहोंत तोंवर आमच्या हिंदुराष्ट्रांत स्पृश्य नि अस्पृश्य हे भेद विकोपास नेऊन जातवार प्रतिनिधित्व देऊन परस्पर कलह पेटवून राष्ट्रशक्तीचीं छकलें विपक्षीय उडविणारच. पण जर आम्ही, जें बोट कुत्र्यास विटाळ न मानता लावतों तेंच आपल्या स्वतःच्या बीजाच्या, धर्माच्या, राष्ट्राच्या सहोदरांस, त्या अस्पृश्यांना लावून ह्या अत्यंत सोप्या युक्तीने ती अस्पृश्यताच काढून टाकली नि स्पर्शबंदीची बेडी तोडून टाकली, तर ते तीन चार कोटि धर्मबंधु आपणापासून कोणता विपक्षीय बिलगवू शकेल ? स्पृश्य-अस्पृश्य हा एक विघटक

विभाग तरी चुटकीसारखा बोट लागताच नामशेष होऊ शकेल. तीच गोष्ट इतर विघटक व्यादींची होय !

जातिभेद मोडण्यासाठी दुसरें कांही करावयास नको. ह्या सात बेड्या तोडल्या पाहिजेत–एक त्या बेड्या आपल्या आपणच आपल्या पायांत ठोकून घेत आलों–कोण्या विदेशीय शक्तीने ठोकलेल्या नाहीत. तसें असतें तर त्या तोडणें कठीण गेले असते. पण त्या आपणच केवळ हौशीने पायांत वागवीत आहोंत, म्हणून तर त्यांस ‘ स्वदेशी बेड्या ’ म्हणावयाचे. ती हौस आपण सोडली कीं त्या तुटल्याच. ज्याने त्याने आपापल्यापुरता तरी “ मी खालील सात बेड्या माझ्या राष्ट्राच्या पायांतून तोडून टाकीन.” इतका निर्धार केला आणि त्या निर्धाराप्रमाणे आपापल्या व्यवहारांत या सात बेड्या जुमानल्या नाहीत की झालें ! पोथीजात जातिभेद एक मनाचा रोग आहे. मनाने तो मानला नाही कीं झटकन बरा होतो. ज्या सात स्वदेशी बेड्या तोडताच ह्या पोथीजात जातिभेदाच्या व्यादीपासून, भूतबाधेपासून, हें हिंदुराष्ट्र मुक्त होऊ शकतें त्या सात बेड्या अशा :—

(१) **वेदोक्तबंदी**—ही पहिली बेडी तोडली पाहिजे. सर्व हिंदुमात्रांस वेदादिक यच्चयावत् धर्मग्रंथांवर समान हक्क असला पाहिजे. वेदांचे अध्ययन वा वेदोक्त संस्कार ज्यास इच्छा होईल त्यास करता आले पाहिजेत. म्लेंछ लोक जर वेद वाचतात तर स्वतःच्या क्षत्रियादिक धर्मबंधूंनासुद्धा वेदोक्ताचा अधिकार नाही असें म्हणणारी भटबाजी यापुढे चालता कामा नये; तशीच क्षत्रियादिक ‘ स्पृश्यांची ’ ‘ अस्पृश्या ’ वर चाललेली दंडेबाजी बंद झाली पाहिजे. उलट वेदादि ग्रंथ मनुष्यमात्राला उघडे करून आध्रुवध्रुव वैदिक अध्ययन चालू करण्यांतच “ वैदिक ” धर्माचा धार्मिक दृष्टीनेदेखील, खरा विजय आहे !

(२) **व्यवसायबंदी**—ही दुसरी बेडी तोडली पाहिजे ! ज्या व्यक्तीस जो व्यवसाय करण्याची धमक नि इच्छा असेल त्यास तो करता आला पाहिजे. अमक्या पोथीजात जातींत जन्मला म्हणून त्याने अमका धंदा केलाच पाहिजे, नाही तर तें जातिबहिष्कार्य पाप होय अशी सक्ति चालता कामा नये. चढाओढीची भीति नसली कीं जन्मानेच पटकावले जाणारे राखीव

धंदे नि कार्यें ते ते वर्ग योग्य दक्षतेने पार पाडीनसे होतात. जसें भट, पुजारी, भंगी, राजेप्रभृति. यापुढें पुरोहितहि, पौरोहित्यास योग्य ती विद्या नि परीक्षा पारंगतेल तर, वाटेल त्या जातीचा असला तरी चालला पाहिजे. जो भट-कामाची परीक्षा उतरेल तो भट, जो भंगीकामाची उतरेल तो भंगी. समाजोपयोगी सारे धंदे निर्दोष आहेत. आज व्यवसायबंदी तुटलेलीच आहे. केवळ भट नि भंगी हे मात्र मुख्यत्वें जातिबद्ध धंदे आहेत. तीहि बंदी तुटली पाहिजे. व्यवसाय हे जातीच्या मानीव योग्यतेवर न ठेवता, त्या त्या व्यक्तीच्या प्रकट गुणावर सोपविले म्हणजे योग्य मनुष्य योग्य कामीं लागून राष्ट्रकार्यें अधिक दक्षतेने पार पडण्याचा अधिक संभव असतो. डॉ. आंबेड-कर महार म्हणून जर त्यांना महाराचें ढोरें ओढण्याचेंच काम करणें भाग पाडलें असतें तर आपलें राष्ट्र एका उत्कृष्ट निर्बंध–पंडिताला नि राजकारण धुरंधराला आंचवलें असतें. उलटपक्षी ज्या भटाची वा मराठ्यादिक स्पृश्याची योग्यता ढोरें ओढण्याचीच, त्याला पुरोहित वा सैनिक नेमणें म्हणजे त्या कार्याची धुळधाण उडविणें होतें. राष्ट्रीय शक्तीचा मितव्यय नि क्षमता वाढविण्याचें उत्कृष्ट साधन म्हणजे ज्याच्या त्याच्या प्रकट गुणानुरूप ज्याचे त्याचेकडे तें काम सोपविणें हेंच होय. आजच्या चांभाराचा मुलगा गुणोत्कर्षानें उद्या मुख्य प्रधान होऊ शकेल; जसा स्टॅलिन रशियाचा झाला. उलट आजच्या मुख्य प्रधानाचा मुलगा उद्यां चामड्याचा मोठा कारखाना चालवू शकेल–चांभार होईल.

(३) **स्पर्शबंदी**––ही तिसरी बेडी तोडून जन्मजात अस्पृश्यतेचें समूळ उच्चाटन झालें पाहिजे. विटाळ केवळ त्याच स्पर्शाचा मानला जावा की ज्यायोगे आरोग्यास हानि पोचते. सोवळें तें की जें वैद्यकाच्या प्रत्यक्ष नि प्रयोगसिद्ध पुराव्याने आरोग्यासाठी अवश्य आहे. नुसतें अमक्या पोथींत अमूक शिवू नये, अमक्याचा विटाळ मानावा असें सांगितलें आहे म्हणूनच काय तें, वैज्ञानिक पुरावा त्यास समर्थित नसताहि, विटाळ विटाळ म्हणून प्रतिपदी ओरडणाऱ्या धार्मिक कोलाहलास जुमानू नये; अस्पृश्य जातीची अस्पृश्यता ही तर निव्वळ मानीव, पोथीजात, माणुसकीचा कलंक. ती तर तत्काळ नष्ट झाली पाहिजे. ह्या एका सुधारणेसरशी कोटिकोटी हिंदुबांधव

आपल्या राष्ट्रांत एकजीव होऊन सामावले जातील. आपल्या गोटांत इतके एकनिष्ठ सैनिक वाढून हिंदुराष्ट्राच्या चढाईत नि लढाईत झुंजू लागतील.

(४) **सिंधुबंदी** :--ही चवथी बेडी तोडून परदेशगमनाची अटक साफ काढून टाकावी. परदेशगमन जातिबहिष्कार्य पाप ठरविण्याची अवदसा ज्या दिवशीं वा कालीं आम्हांस आठवली त्याच कालीं आमचें हिंदुराष्ट्र मेक्सिको-पासून मिसरपर्यंत पसरलेल्या आपल्या जागतिक हिंदुसाम्राज्यास आंचवलें. परदेशीय व्यापार ठार बुडाला, नाविक बळ बुडालें, परदेशीय विद्यांचें संजीवनीहरण दुर्घट झालें. आजहि जे लक्षावधि हिंदु लोक देशोदेशीं वसाहत करून आहेत, त्यांच्याशी संबंध अभंग न ठेवला तर हिंदु संस्कृति नि हिंदु धर्म यांची बळकट बंधनें तुटून तेहि आपणांस अंतरतील नि अहिंदूच्या पोटांत गडप होऊन विपक्षाचें बळ वाढवितील. हजारो धर्मोपदेशक, हिंदु-संघटक, हिंदु व्यापारी, योद्धे, विद्यार्थी यांचे तांडेच्या तांडे परदेशांत आले गेले वसले पाहिजेत.

(५) **शुद्धिबंदी** :--ही पांचवी बेडी तोडून पूर्वी परधर्मांत गेलेल्या किंवा जन्मतःच परधर्मी असलेल्या अहिंदूंना हिंदुधर्मांत घेता आलें पाहिजे. इतकेच नव्हे तर त्यांस हिंदुराष्ट्रांत ममतेने नि समानतेने संव्यवहार्य करून आत्मसात करून सोडलें पाहिजे. मुसलमान ख्रिश्चनांत हिंदु स्त्रीपुरुष बाटून जाताच जसा पाण्यासारखा मिसळून जातो तसें आपण शुद्धिकृतांना समाजांत आत्म-सात करून सोडू तर एका दहा वीस वर्षांचे आंत एक कोटी अहिंदु लोक तरी शुद्ध होऊन हिंदुधर्मांत येऊ शकतील. ही गोष्ट, वसई, राजपुताना, आसाम, कान्हदेश, बंगाल प्रभृति ठिकाणी शुद्धिकार्य करणाऱ्या थोर थोर कार्यकर्त्यांनी वारंवार सांगितलेली आहे. मंदिरबंदी, रोटीबंदी, बेटीबंदीच्या अडसरामुळेच त्या परधर्मांत अडकलेल्या हिंदूच्या मनांत असताही अहिंदूंच्या गोटांतून फुटून एवढें मोठें संख्याबळ आपल्या शिबिरांत येऊ शकत नाही.

(६) **रोटीबंदी** :--यासाठीच रोटीबंदीची सहावी बेडीहि तत्काळ तोडली पाहिजे. किंबहुना ही एक बेडी तोडली, खाण्याने जातच जाते, धर्मच बुडतो, ही अत्यंत खुळचट, राष्ट्रघातक नि मळमळी भावना सोडून दिली, म्हणजे बाकीच्या वरील सर्व बेड्या एकदमच तुटल्या जातात. कारण

ह्या रोटीबंदीच्या पायींच कोटयवधि हिंदु लोकांना, दुष्काळांत मिशनऱ्यांच्या हातांनी खाल्लें म्हणून, घरावर गोमांसाचा तुकडा फेकला म्हणून, मुसलमानांनी बळेच दंग्यांत, शेंकडो लोकांच्या तोंडांत अन्न कोंबलें म्हणून जो तो हिंदु, बाटले! बाटले! म्हणून बहिष्कारता झाला–वंशपरंपरा हिंदुत्वास ते कोटी कोटी लोक मुकले!! शुद्धिबंदी, सिंधुबंदी, हीं या रोटीबंदीचींच राक्षसी अपत्यें होत! अशी ही रोटीबंदीची ब्याद सहभोजनाच्या टोल्यासरशी हाणून पाडलीच पाहिजे. खाणेंपिणें हा वैद्यशास्त्राचा प्रश्न. वैद्यकदृष्टीने जें आरोग्य देतें तें तें, वैद्यकदृष्टीने भोज्यान्न अशा कोणत्याहि मनुष्याबरोबर खाण्यास व पिण्यास हरकत नाही, त्याने जात जात नाही–धर्म बुडत नाही. जात ही रक्तबीजांत असते, भाताच्या पातेल्यांत नव्हे! धर्माचें स्थान हृदय, पोट नव्हे!! जें रुचेल नि पचेल तें जगांत कोणतेंहि कुठेंहि नि कोणाबरोबरहि खुशाल खा. मुसलमानांबरोबर हिंदु जेवल्याने हिंदूचाच मुसलमान कां व्हावा? मुसलमानाचा हिंदु कां होऊ नये? साऱ्या जगाने हिंदूचें अन्न खाऊन टाकलें. ते 'बाटले' नाहीत, हिंदु होत नाहीत!! म्हणून आता यापुढे तरी त्याच न्याये हिंदूंनो, आपलें अन्न वाचवा! आता पराक्रमें जिंकून जगाचें अन्नहि खा नि हिंदूचे हिंदूहि रहा!! तर आता जगाल!!!

(७) **बेटीबंदी** :––हिंदुराष्ट्राचीं शकलें शकलें पाडण्यास कारण झालेली ही सातवी स्वदेशी बेडी आहे. ही बेटीबंदीहि तोडून टाकली पाहिजे. प्रत्येक ब्राह्मण–मराठ्याच्या वधूने वा वराने महार-मांग वराशी वा वधूशीच लग्न केलें पाहिजे; किंवा महार मांग वधूने वा वराने भंगी वराशी वा वधूशीच लग्न केलेंच पाहिजे असा ह्याचा विपर्यस्त अर्थ नव्हे; तर गुण, शील, प्रीति ह्यांही अनुरूप असेल तर नि सुजनदृष्ट्या उन्नततर संततीस बाध येत नसेल तर वाटेल त्या हिंदुजातीच्या वरवधूशी विवाहबद्ध होण्यास जन्मजात जातीची अशी कोणतीहि आडकाठी नसावी. असा विवाह बहिष्कार्य न मानता हिंदुसमाजांत तें दांपत्य पूर्णपणे संव्यवहार्य समजलें जावें. पण अहिंदूशी विवाह करणें तर मात्र, प्रस्तुत परिस्थितींत, त्या अहिंदु व्यक्तीस हिंदु करून घेतल्यानंतरच काय तो विवाह व्हावा.

ही मर्यादा मात्र हिंदुराष्ट्राचें हितार्थ आज अपरिहार्य आहे. जोंवर मुसलमान मुसलमानच राहू इच्छितात, ख्रिस्ती-ख्रिस्ती, पारशी पारशी, ज्यू ज्यू, तोंवर हिंदूनेहि हिंदूच राहणें भाग आहे, उचित आहे, इष्ट आहे. ज्या दिवशी ते विधर्मीय गट आपली आकुंचित कुंपणें तोडून एकाच मानवधर्मांत वा मानवराष्ट्रांत समरस होण्यास समानतेने सिद्ध होतील, त्या दिवशीं हिंदुराष्ट्रहि त्याच मानवधर्माच्या ध्वजाखाली मनुष्यमात्राशी समरस होईल; किंबहुना असा 'मानव' धर्म हीच हिंदुधर्माची परमसीमा नि परिपूर्णता मानलेली आहे.

वरील सात 'स्वदेशी' बेड्या—म्हणजे आपणच ज्या आपल्या पायांत हौशीने ठोकून घेतल्या आणि ज्या तोडणें हें आजहि आपल्याच हातीं आहे, त्या तेवढ्या तोडल्या कीं ह्या पोथीजात जातिभेदाचा विषारी दात तेवढा तरी उपटून काढला गेलाच म्हणून समजा. प्रकट गुण अंगीं नसता, केवळ जातवार जन्मावारीच काय ते, विशिष्ट अधिकार वा विशिष्ट हानि कोणाच्याहि वाट्यास आली नाही म्हणजे झालें. मग हीं जातींचीं नावें उपनांवाप्रमाणेच वा गोत्राप्रमाणे आपापल्या घरकुल्यांतून आणखी कांही काल चालत राहिलीं, तरी राहोत !

ह्या पोथीजात जातिभेदाच्या प्राणघातक विळख्यांना तोडून फाडून एकदा का आपल्या हिंदुराष्ट्राच्या संघटित सामर्थ्याचे हातपाय मोकळे झाले, म्हणजे ज्या बाह्य आपत्तीने, ज्या विदेशी बेड्यांनी, आज आपणांस चीत केलें आहे, डांबून टाकलें आहे, त्या संकटाशीहि उलट खाऊन पुन्हा एकदा टक्कर देण्यास आपलें राष्ट्र आज आहे त्याहून शतपटीने अधिक शक्त झाल्यावाचून राहणार नाही हें नक्की !

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ....३६२२५.... वि: ....१९०४५....
क्रमांक ....५१४१६४.... नों: दि: २०-८-३....

१२

# विज्ञानबळ

[ भारतराष्ट्र आणि या राष्ट्राचा प्रमुख घटक असलेला हिंदुसमाज बलवान् होण्यासाठी जातिभेद, व वेडगळ रूढी-समजुती नष्ट झाल्या पाहिजेत ही गोष्ट सावरकरांनी अनेक निबंधांतून कळकळीने मांडली आहे. तथापि एवढ्यावरच ते थांबले नाहीत, तर आजच्या प्रगत राष्ट्रांत दिसून येणाऱ्या विज्ञानबळाकडेहि त्यांनी आपल्या समाज-बांधवांचें लक्ष वेधलें. धर्मवेडाची नांगी ठेचणाऱ्या विज्ञानाचें बळ तितक्याच बलशाली शैलींत विशद करणारा हा निबंध सावरकरांच्या व्यवहारी राजकारणावरहि प्रकाश टाकतो. ]

कोणत्याहि एका तत्त्वाचा सर्वसामान्य खल करणें हें प्रसारास जसें आवश्यक असतें, त्याचप्रमाणे तो सर्वसाधारण खल चालू असता विशेष व्यक्तींच्या विशेष शंकांचेंहि समाधान करणें कांही प्रकरणीं तरी, तें सर्वसामान्य तत्त्व बहुसंख्याकांना व्यक्तिशः पटवून देण्यासाठी फार उपयोगी पडतें.

आपल्या हिंदु राष्ट्राची दृष्टि पोथिनिष्ठ न राहता विज्ञाननिष्ठ व्हावी, पुराणप्रवृत्ति, सनातनप्रवृत्ति सुटून त्यांची अद्यतन प्रवृत्ति असावी, या तत्त्वाचा ऊहापोह आम्हीं आजवर जो किर्लोस्करादि मासिकांतून केला त्यांतला पुष्कळसा भाग ज्यांना पटला आहे, परंतु तो सर्वस्वीं मान्य करण्यास, ज्यांना प्रामाणिकपणे कोणाला कांही तर कोणाला कांही अशा तुरळक व्यक्तिविशिष्ट

शंका उरल्यामुळे ते ते अद्याप अनमान करीत आहेत; अशा व्यक्तींच्या त्या त्या शंका जर पृथक्पणे चर्चून निवारता आल्या तर तितकी मंडळी तरी त्यांना बहुधा पटत आलेलें तें तत्त्व मनमोकळेपणे सर्वस्वी उचलून धरतील असा संभव दिसत असल्यामुळे, तशा वैयक्तिक शंकांपैकी कांहींचा पृथक् विचार करणें हेंहि या विचाराच्या दृष्टीने कर्तव्यच आहे. आमच्या आजवरच्या लेखांतून त्या शंकांचें वा भीतीचें निराकरण करणारीं कारणेंहि प्रसंगोपात्त उल्लेखिलेलीं आहेत. परंतु प्रत्येक व्यक्ति प्रत्येक लेखांतील प्रत्येक वाक्य सारखेंच लक्ष देऊन वाचू शकत नाही; आणि तुरळक उल्लेखाने शंकासमाधानहि व्हावें तसें होत नाही हेंहि खरेंच. यास्तव अशा दोन प्रमुख शंकांना त्या अनेक विचारी नि प्रामाणिक—व्यक्तींनी विचारलेल्या असल्यामुळे या लेखांत चर्चिणार आहोंत, त्या योगे त्याविषयी आमचें मत काय आहे हें तरी त्यांना सविस्तरपणे समजेल—मग तें त्यांना क्वचित् पटलें वा न पटलें तरीहि सांगायचें तें आम्हीं तरी सांगून टाकल्याचें समाधान आम्हांस मानता येईल. त्या शंकांपैकी अनेकांनी विचारलेली एक प्रमुख शंका अशी कीं,

आम्हीहि मुसलमानांसारखेच कट्टर पोथीनिष्ठ झालें पाहिजे !

" ते मुसलमान पहा, दाढी तर दाढीच ठेवतील; बुरखा त्रासदायक असला तरी समाजाचें विशिष्ट चिन्ह म्हणून तीच रूढि पाळतील; मशिदीवरून वाद्यें वाजलीं रे वाजलीं कीं, चवताळून उठतील ! कुराण ईशप्रेषित धर्मग्रंथ म्हणून सारेच सारे सन्मानून राहतील; त्या नांवासरशी सगळे एक होतील; डुकराचें मांस नाही तर नाहीच खाणार ! कुराणांतील प्रत्येक आचार कितीहि जुनाट असो वा त्रासाचा असो, सामाजिक धार्मिक बंधन म्हणून पाळीत राहतील. पाचदा तर पाचदा प्रत्येकजण निमाज पढतील, रोजा तर रोज सारा समाज रोजा राखील ! इत्यादि रूढीहि काय तर्काला धरून आहेत ? धर्मभोळ्या नाहीत ? पण तरीहि त्यांच्यामुळेच त्या समाजांत एकजीवपणा, एकजूटपणा नि बळकटी आलेली आहे.

" आम्ही हिंदूंनीहि तेवढ्यासाठी ज्या आमच्या प्राचीन रूढी नि धर्मसमजुती आहेत त्या धर्मभोळ्या नि इतर दृष्टीने हास्यास्पद असल्या तरी समाजांत मुसलमानाप्रमाणे धर्मकडवेपणा संचारविण्यासाठी पाळल्या पाहिजेत ! "

धर्मभोळेपणापायी किंवा पोथीनिष्ठतेपायी मुसलमानांचीहि दुर्दशाच होत आहे ! पोथीनिष्ठपणामुळेच मुसलमानी समाज एकवटलेला प्रबळ नि प्रगत होत आहे; आणि यास्तव आपण त्यांच्याहीपेक्षा अधिक पोथीनिष्ठ झालें म्हणजे अधिक प्रबळ नि प्रगत होऊ अशी समज आजच्या अनेक कळकळीच्या हिंदुसंघटकांमध्यें जी वावरत आहे ती मुळांतच दुहेरी चुकलेली आहे. पोथीनिष्ठपणामुळे मुसलमानांची कोणती प्रगति झाली आहे ? आज हिंदुस्थानांतहि ते विद्येंत मागासलेले आहेत; अज्ञान, दारिद्रय नि कूपमंडूकता यांहि हिंदूपेक्षाहि ते अधिक ग्रासलेले आहेत. साहित्यांत हिंदूच श्रेष्ठ आहेत. बहुतेक मोठमोठ्या संस्था हिंदूनीच काढलेल्या नि चालविलेल्या आहेत. सारें भारतीय मुद्रालय हिंदूंच्या हातीं आहे, मोठमोठे कवि, संशोधक, उद्‌भावक, प्रकल्पक (Inventers) संपादक, विद्वान्, प्राध्यापक, सुधारक, वक्ते, कर्ते जे कांही गेल्या शतकात नावाजण्यासारखे म्हणून हिंदुस्थानांत निघाले ते शेकडा पंचाण्णव तरी हिंदूच आहेत. ऑक्सफर्ड, केंब्रिज, पॅरिस, बर्लिन प्रभृति युरोपीय विद्यापीठांतून भारतीय बुद्धीची जी कांही छाप पडली आहे ती मुख्यतः हिंदूंनीच पाडली आहे. रँग्लर्स, आय. सी. एस्., नोबेल प्राइझमन, वैज्ञानिक, संशोधक यांच्या युरोपीय पटांत जे कोणी भारतीय झळकले ते बहुतांशीं हिंदूच हिंदु. राजकारणाची जी कांही उठावणी नि जी कांही झुंज होत आली ती गेली शंभर वर्षें सारीची सारीं हिंदूनीच केली, हिंदूंनी घेतली. टिळक, लजपतराय, गोखले, बानर्जी, पाल, गांधीजी, मालवीय, अय्यर प्रभृति झटकन् सांगता येण्यासारखे नि इथे सांगता न आले तरी प्रमुखत्वाने अग्रस्मरणीय असे शतावधि राष्ट्रवीर आजकाल जे होऊन गेले, ते हिंदूच होते. जर्मन महायुद्धासारख्या सैनिकशौर्य प्रकटविणाऱ्या ज्या कांही बऱ्यावाईट संधि मिळाल्या, त्यामध्यें शीख, गुरखा प्रभृति हिंदु सैनिकांनी आपलें क्षात्रतेजहि प्रकटविण्यास सोडलें नाही. तीच स्थिति औद्योगिक क्षेत्रांत. विमा मंडळ्या, गिरण्या, बँका, पतपेढ्या समाईक कारखाने यांसारख्या ज्या कांही मोठमोठ्या औद्योगिक संस्थांचा प्रपंच आज वाढीस लागलेला दिसत आहे. तो बहुतांशी हिंदूंच्याच कर्तृत्वाचें, नेतृत्वाचें फळ आहे.

जी गोष्ट वर्तमानकाळी, तीच भूतकाळाची. पोथीनिष्ठतेमुळे, देवभोळे-

पणामुळे, धर्मवेडेपणामुळेच मुसलमान शूर नि विजयी झाले असें कित्येक मुसलमान वारंवार बोलून दाखवितात. आमचे हितशत्रूहि तेंच सांगतात. पण तें अर्धसत्य आहे. जे समाज त्यांच्याहून असंघटित नि धर्मभोळे होते, त्यांच्यावर मुसलमानांच्या धर्मवेडाने विजय मिळविले. पण जेव्हा त्यांच्याहून ऐहिकदृष्टया अधिक संघटित समाजाशी त्यांची गाठ पडली तेव्हा मुसलमानांची पारलौकिक पोथिनिष्ठा त्यांना मुळीच उपयोगी पडली नाही. ह्याचा निरुत्तर पुरावा हिंदुपुरता तरी हवा असेल तर महाराष्ट्राचा इतिहास पहा! पोथिनिष्ठ औरंगजेबाची मराठयांनी केलेली कुतरओढ आठवा. फार काय, १६०० पासून १८०० पर्यंत जेथे जेथें हिंदु सैन्याशी मुस्लीम सैन्याची गाठ पडली; त्या उण्यापुऱ्या पाचशे लढायांत मुसलमान असा जिंकूच शकला नाही. हिंदु असा हरलाच नाही. रोहिलखंड ते द्वारका, अटक ते रामेश्वर चारी सीमांपर्यंत मुस्लीमांची सत्ता ती ती हिंदूंनी पादाक्रांत केली. त्या वेळीं काय मुसलमान पाच वेळा निमाज पडत नव्हते ? रोजे राखीत नव्हते ? कलमा म्हणत नव्हते ? दाढी ठेवीत नव्हते ? तेव्हा काय त्यांचें कुराणशरीफ हें एकच धर्मपुस्तक नव्हतें ?

विज्ञानबळापुढे धर्मवेडाची नांगी आणि पोथीनिष्ठतेचा दंश कसा ढिला पडतो तें युरोपमध्यें पहा ! तीनशें वर्षांपूर्वी युरोपहि ख्रिस्ती पोथिनिष्ठतेने नि देवभोळेपणाने पोखरून टाकलेलें होतें. त्यांतहि ती पोथीनिष्ठता हिंदूंच्या पोथीनिष्ठतेप्रमाणे सोसाळू होती. त्यायोगे मुसलमानांच्या ठोसाळू पोथीनिष्ठतेने तिची दाणादाण उडवून दिली. पुर्तुगाल, स्पेन जिंकून ते पारिसच्या तटापर्यंत नि दुसऱ्या बाजूस हंगेरींत उतरले ! पण पुढे जेव्हा युरोपांत विज्ञाननिष्ठा अवतरली, वाफ, वीज नी विमानाचें युग आलें, तेव्हा त्याच युरोपने त्याच मुसलमानांची कोण दुर्दशा केली आहे तें काय सांगावयास पाहिजे ! ज्या मूरांनी स्पेन जिंकले, त्याचे लचके आज स्पेन नी फ्रान्सने तोडले आहेत. देवभोळेपणाचें नी पोथीनिष्ठतेचें आगर असलेला अबिसीनिया विज्ञानबळशाली इटलीने पंजाच्या एका फटकऱ्यासरशी होता का नव्हतासा केला ! सैबेरियांतील पोथिनिष्ठ नि कडव्या मुसलमानांच्या लक्षावधि लोकांवर निरीश्वर नि निधर्मी रशिया राज्य करीत आहे ! इराकच्या,

इजिप्तच्या आणि दिल्लीच्या खलिफांची, खेदिवांची नि बादशहांची पोथीनिष्ठ तक्तें आज विज्ञाननिष्ठ इंग्लंडच्या प्रदर्शनांतून मांडलेली आहेत !

मुसलमानांच्या या जगभर झालेल्या दुर्दशेस सांगण्यासारखा अपवाद एक तुर्कस्तान ! पण तो अपवादच आम्ही सांगत आहोंत त्या नियमाचा निरुत्तर पुरावा देणारा ! कारण तुर्कस्थान तेवढा जो टिकला तो ज्या प्रमाणांत त्याने पोथीनिष्ठता नि देवभोळेपणा सोडून विज्ञानबळाची उपासना केली, त्याच मानाने नि त्याचमुळे काय तो टिकला. जी समजूत आजच्या विज्ञानाने खोटी पाडली नि जी जी रूढि आजच्या परिस्थितींत घातक वाटली, ती ती जुन्या छप्पन धर्मग्रंथांत असली तरी ती केमालच्या तुर्कींनी झुगारून दिली. कुराणांत बुरखा आहे, बहुपत्नीत्व आहे. केमालने तें तें निषिद्ध ठरविलें. सारे पौरविधान (Civil law) दंडविधान (Criminal law) नि सैनिक-विधान तुर्कींनी स्वित्झर्लंड, जर्मनी प्रभृति देशांतून आणून त्याचा धर्माशी संबंध तोडून त्या विषयींचे कुराणांतील विधिनिषेध विरुद्ध होते ते रद्द केले. अरबी धर्मभाषा पण बहिष्कारली, अरबी लिपी मुद्रणास अडगळ म्हणून बंद केली नि रोमन चालविली. मुस्लीम धर्मपीठ जें खिलाफत तेंच मुळांत उखडून टाकलें. तुर्कस्थान युरोपइतकाच अद्यतन बनला, प्रयोगक्षम भौतिक विज्ञानाचा उपासक बनला म्हणून बचावला.

आमची मनापासून अशी इच्छा आहे कीं, हिंदी मुसलमानांनीहि पोथीनिष्ठ प्रवृत्ति सोडून विज्ञाननिष्ठ बनावें; देवभोळेपणा नि धर्मवेड यांच्या खोड्यांतून त्यांची बुद्धि मोकळी व्हावी आणि त्यांचा समाजहि शिक्षित, प्रगत नि अभ्युन्नत व्हावा. त्यांच्या जर हें ध्यानांत येईल, कीं विज्ञानबळापुढे अज्ञानी धर्मवेडाचा टिकाव केव्हाहि लागणार नाही, तर तेहि तुर्कींचा मार्ग स्वीकार-तील आणि आज युरोपियन शक्तीपुढे जी त्यांची धूळधाण उडत आहे, ती थांबेल. मुसलमान जर विज्ञाननिष्ठ नि प्रगत झाले तर त्यांत हिंदूंचेंहि कल्याणच आहे, हिंदी मुसलमानांचें तर कोटकल्याणच आहे.

परंतु इतक्यावर जर मुसलमानांना त्यांची पोथीनिष्ठ प्रवृत्तीच हितकारक वाटली, परवडली, तर ते ती सुखेनैव आचरोत, परंतु आम्हीं ही खूणगाठ बांधून ठेवली पाहिजे की, युरोपच्या विज्ञानबळापुढे ज्या अर्थी त्यांच्या

धर्मवेडाचें कांहीएक चालत नाही, ज्या अर्थीं बुद्धिनिष्ठ प्रगतीस पारखे झाल्यामुळे त्यांचा समाज आज आमच्या हिंदुसमाजापेक्षाहि अज्ञान, दारिद्र्य नि अवनति ह्यांच्या तावडींत सापडलेला आहे, आणि ज्या अर्थीं आम्हांस आज जें तोंड द्यावयाचें आहे, तें विज्ञानयुगास नि युरोपीय विज्ञानबळासच द्यावयाचें आहे, त्या अर्थीं मुसलमान एक पोथीनिष्ठ आहेत म्हणून आम्ही सवाई पोथीनिष्ठ, देवभोळे नि धर्मवेडे होणें हा कांही आमच्या अभ्युन्नतीचा उपाय नव्हे. अनुकरण जर करावयाचें तर आज मुसलमानांनाहि जें पुरून उरले आहे त्या युरोपच्या विज्ञाननिष्ठतेचें होय. जें संपादावयाचें तें धर्म-भेदाची नांगी ज्यापुढे ढिली पडते तें विज्ञानबळ होय ! देवभोळेपणाचे सारे ताईत–ताबीज, शिव्याशाप ज्या कवचावर चालूच शकत नाहीत, हें आज इंग्लंड, रशिया, जर्मनींत धडधडीत प्रत्ययास येत आहे, तें विज्ञानकवचच आम्हीं धारण केलें पाहिजे.

अगदी ताजीं एक दोन उदाहरणें. वरील विधेयें स्पष्टपणे ध्यानांत यावी म्हणून अगदी गेल्या महिन्यांतीलच एक उदाहरण घेऊ. पंजाबमध्यें विधि-मंडळांत एक मुसलमान महिला प्रतिनिधि म्हणून निवडून आल्या. विधि-मंडळाच्या शपथविधीच्या वेळीं त्या जेव्हा सभागृहांत आल्या, तेव्हा तिकडील मुस्लिम शिष्टाचाराप्रमाणें बुरख्यांत आल्या,स्वतंत्र स्थळीं एका बाजूस बसल्या. त्यांचें मुखदर्शन तर अवगुंठनामुळे अशक्य होतेंच; पण सभापती प्रमाणे सर्व प्रतिनिधींनी जें हस्तांदोलन करावयाचें तेव्हाहि मोठा पेच पडला ! कुराणांत बुरखा राखावा असे उल्लेख आहेत हें अगदी खरें आणि त्या माननीय महिलेच्या त्या पोथीनिष्ठ भावनेला तिच्यापुरतें सन्मानिलेंहि पाहिजे. पण म्हणून, ‘ मुस्लीम स्त्रिया पहा कशा स्वधर्माभिमानी असतात त्या !’ असें त्या उदाहरणाचें मोठें कौतुक का करायचें ? आणि तिच्यापेक्षा हिंदु स्त्रियांनी सवाई स्वधर्मनिष्ठ झाले पाहिजे, अशा हेव्याने बंगाल प्रभृति उत्तरेकडे ज्या हिंदूंत बुरख्याची बुरसटलेली चाल आहे त्यांनी बुरखा सोडूच नये म्हणून का आम्हीं सांगायचे ? दक्षिणेंतील विधिमंडळांतूनहि हिंदु महिलांनी डोक्यापासून पायांपर्यंत शिवलेल्या एका पिशवींत घुसून वावरत जावें नि सभागृहांत एका कोपऱ्यांत सोवळ्याने बसावें असा उपदेश का द्यायचा ?

बुरख्याची चाल ही एक अत्यंत अडाणी, अडगळीची, विद्रूप रूढि आहे. ती मागच्या छपन्न पोथ्यांतून असली तरी आज टाकली पाहिजे हें हिंदी मुस्लीमांच्या ध्यानांत आलें नसलें, तरी जगांतील प्रगत मुस्लीमांच्या ध्यानांत आलेलें आहे. ज्या महिन्यांत लाहोरच्या विधिमंडळांतील मुस्लीम स्त्री प्रतिनिधि सभागृहांतहि बुरख्यांतच बसतात हें वरील वृत्त मुस्लीमपत्रें मुस्लीम समाजाच्या स्वाभिमानाचें एक प्रशंसार्ह उदाहरण म्हणून छापीत होतीं, त्याच गेल्या महिन्यांत हीहि बातमी छापून आली कीं, अल्बेनियाच्या राजानें ( बाल्कनकडील ) आपल्या मुस्लीम प्रजेला सक्त आज्ञा सोडली कीं, जी स्त्री बुरखा घेऊन बाहेर हिंडेल तिचा तो एक दंडनीय अपराध समजला जाईल. तुर्कांनी त्यांच्या राज्यांतून बुरख्याला कधीच चाट दिली. इराणनेहि अलीकडेच बुरखा निषेधिला आहे.

त्याचीं कारणेंहि ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत. पैकी एक कारण असें: तुर्कांच्या विधिमंडळांत महिलांना प्रतिनिधि म्हणून बसण्याचा अधिकार मिळाला ते दिवस राज्यक्रांतीचे होते. विरुद्ध पक्ष केव्हा घातपात करील ह्याचा केमाल पक्षाला विश्वास नसे. आता विधिमंडळांत जर बुरखा घेऊन पांच पन्नास स्त्रीप्रतिनिधी घेऊन येण्याची अडाणी नि अवखळ चाल पाडली तर त्या बुरख्यांत खरोखरी ती स्त्रीप्रतिनिधीच आहे, तोतया नाही, हें तरी कसें कळणार? एखादा मारेकरीहि त्या बुरख्यांत स्त्रीप्रतिनिधि म्हणून आंत घुसू शकेल. केमालवर मारेकरी घातलेहि गेले आहेत. अशा स्थितींत अशा पोथीनिष्ठ धर्मवेडाच्या आहारीं जाण्याइतके तरुण तुर्क दुधखुळे नव्हते! ज्या स्त्रीला इतका पोथीनिष्ठेचा टेंभा मिरवावयाचा आहे तिने आपलें अंतःपुर सोडून बाहेर पडावेंच कां मुळी? हाटाच्या (बाजाराच्या) भर दाटींत घुसावयाचें नि मग लोक शिवतात म्हणून चिडावयाचें हा खुळेपणा तरी होय, नाहीतर खोडसाळपणा तरी! तरुण तुर्कांसारख्या मुस्लीम राष्ट्रांनीहि जी त्यांची रुढि अडाणी म्हणून त्यागिली, ती जर हिंदी मुस्लीम मोठें भूषण म्हणून मिरवीत राहिले तर त्यांच्याच पायावर धोंडा पाडून घेतील! अशा स्वधर्माभिमानाचें अनुकरण हिंदूंनीहि करणें म्हणजे वेड्याच्या नादी लागून आपणहि वेडे बनणें आहे.

ते युरोपियन पहा ! बायबलांत स्त्रिया नि दास हे केवळ आश्रित, दयेचे विषय–समानतेचे नव्हेत ! पण आजच्या व्यवहारांत ती पोथी गुंडाळून ठेवून त्यांनी आज राष्ट्रधारणास अवश्य त्या प्रकारे स्त्रीसमानतेचे, स्वातंत्र्याचे नवे नवे निर्बंध पटापट घडविले. समरांगणांतहि स्त्रियांचीं सैन्यें झुंजताहेत ! दासप्रथा तर स्वतःच्या लोकांपुरती तरी निषिद्ध नि दंडच ठरविली ! आम्ही करावयाचें तर त्यांचें अनुकरण उपयुक्त त्या प्रमाणांत करावें. मनुस्मृतींत ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ' हें वचन आहे; तसेंच ' यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ! हेंहि वचन आहे ! पहिल्या वचनासाठीच मनूच्या नावे रडत बसण्यांत काय अर्थ ? त्याचें दुसरें वचनहि आमचें ब्रीदवाक्य नि त्या स्मृतिकारांचा गौरव कां ठरू नये ?

दुसरें उदाहरण, राष्ट्रसभाप्रभृति अधिवेशनांच्या प्रसंगीं निमाजाच्या वेळा येताच हिंदी मुसलमान त्या अधिवेशनांचें काम स्थगित करावें असा जो एक बूट काढतात, त्याचें पहा. ही त्यांची पोथीनिष्ठ प्रवृत्ति त्यांनाच नडेल. उद्या त्यांची जर रशियाशी लढाई जुंपली आणि सकाळीं नऊ वाजता, दुपारीं बारा वाजता, संध्याकाळीं पांच वाजता तें सारें मुसलमानी सैन्य लढाई सोडून निमाज पढू लागलें, तर काय रशियन सैन्य निमाज सरेतो दारूंत पाणी ओतून ठेवील ? ते निर्देव बोलशेव्हिक उलट त्याच संधीस अशी निकराची चढाई नि आगीचा मारा करतील, कीं निमाज आटोपण्याच्या आंत लढाईच आटोपून जावी. जो निमाजाला बसला तो पुन्हा उठूच नये ! मास्कोच्या विधिमंडळांतील मुस्लीम सभासद जर निमाजाच्या वेळीं दिवसरात्रींतून पाचदा उठून गेले तर सोव्हिएट सभासद मुस्लीमांना अहितकारक असे पंचवीस निर्बंध तीच संधि साधून पटापट संमतून टाकतील ! मागे गायी मारणें पाप म्हणून गायींच्या गोलामागे येणाऱ्यावर परशत्रूंनाहि आम्ही ज्या आत्मघातक पोथीनिष्ठेने मारलें नाही, नि स्वतःच मेलों, त्या आमच्या हिंदुधर्मभोळेपणाची ही मुसलमानी आवृत्ति होय !

आणि मुसलमानांच्या अशा धर्मनिष्ठतेंत त्यांच्याहून वरचढ होण्यासाठी त्यांच्या नियमाप्रमाणेच आमच्या संध्येचेंहि का आत्मघात स्तोम माजवावयाचें ? निमाजाच्या वेळीं विधिमंडळें, राष्ट्रसभा, लढायासुद्धा बंद पाडा

म्हणून मुस्लीम मौलवी म्हणतात, यास्तव संध्येच्या वेळीं पण त्या बंद ठेवण्याचा आमच्या पंडितांनीहि आग्रह धरायचा कीं काय ? टोल्यास टोला म्हणून एखादे वेळीं तें शोभेल; पण आम्हीहि तशा पोथीनिष्ठपणें जर संध्येचें तसें स्तोम मनापासूनच माजवू लागलों, तर एक नसती ब्याद स्वतःच्या गळ्यांत बांधून घेतल्यासारखेंच होणार नाहीं कां तें ? विधिमंडळांत त्यांच्या नऊ वाजताच्या निमाजाची सुटी संपते न संपते तो आमच्या माध्यान्हसंध्येची सुटी येणार ! त्यांच्या पाच वाजताच्या निमाजाची सुटी संपते न संपते तो आमच्या सायंसंध्येची घंटा होणार ! अशा पोथीनिष्ठ प्रतिनिधींच्या निमाजसंध्यांच्या जोड पुण्याईने त्या राष्ट्रीय विधिमंडळाचा मात्र कपाळमोक्ष होण्यास विलंब लागणार नाही !

तेव्हा अशा प्रकारांनी मुसलमानांसारखे पोथीनिष्ठ होणें ही तोडीस तोड देण्याची रीत नसून युरोपियनांप्रमाणे विज्ञाननिष्ठ, प्रत्यक्षनिष्ठ, भौतिक, उपयुक्ततानिष्ठ होणें हीच त्यावरची खरी तोड आहे. मुसलमानाना हवें तर ते निमाजाच्या वेळीं उठून जातील, पण तेवढ्यासाठी राष्ट्रसभा बंद ठेवण्याचें आम्ही काय म्हणून मानावें ? राष्ट्रीय कार्य अविरत करणें हीहि ईश्वराची प्रार्थनाच आहे; संध्याच आहे; निमाजच आहे. जी प्रत्यक्ष राष्ट्रघातास कारण होते ती प्रार्थना नसून पाप आहे !

तिसरें उदाहरण मांसाहाराचें घ्या. अगदी मागे सांगितलें होते, कीं मांस खाणें वा न खाणें हा निव्वळ वैद्यकीय प्रश्न. त्याचा पारलौकिक पुण्यपापाशी कांही एक संबंध नाही. मनु कांदा खाणें नरकगामी नि डुकराचेंसुद्धा मांस खाणें महत्पुण्य समजतात. इतर स्मृतींत याच्या अगदी उलट ! त्याचप्रमाणे गोमांसाची गोष्ट–तो वैद्यक, आर्थिक नि अंशतः ममताळूपणाचा प्रश्न. दुधाळू पशु, त्यांतहि गाय वा म्हैस मारू नये ही आर्थिक बाजू. माणसाळू नि लोभाळू प्राणी गाय, कुत्रा, घोडा, पोपट, गाढव शक्य तो जोपासनीय, ही ममताळुपणाची बाजू म्हणून मनुष्याच्याच जिवावर जर बेतत असेल वा राष्ट्रीयदृष्टचा अपरिहार्य असेल, तर गोमांस खाण्यांत कांही पारलौकिक 'पाप' आहे असें मनांतसुद्धा आणण्याचें कारण नाही. परराष्ट्राच्या गायीविषयी तर आर्थिक बाजूहि विचारांत घेण्याचें कारण नाही. अमेरिका

जर स्वतःच गोमांसखाऊ आहे, तर तेथील गायींचें मांस त्यांनीच शिजवलेलें त्यांच्यासह खाण्यांत आम्हांस कां मळमळून यावें? हें आमचें बोलणें आमच्या कित्येक निष्ठावंत ज्ञातिबंधूंना वाईट लागलें नि रागांत ते चार शब्द आम्हांस बोलून गेले, तें अगदी स्वाभाविक होतें. आम्हीं तें सोसलें पाहिजे. कर्तव्य म्हणून ज्या सुधारकांना समाजाच्या भावना दुखवाव्या लागतात, त्यांनी समाजाचा रागहि कांही काळ सोसणें कर्तव्यच आहे. पण आमच्या चुका दाखविताना त्यांनी जो कोटिक्रम पुढे केला तो मात्र राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने घातक आहे. ते म्हणाले, 'पहा, आमचे हिंदु सुधारक किती स्वाभिमानशून्य आहेत ते! मुसलमानी धर्मांत डुक्कर खाणें हराम म्हणून मुसलमान जीव गेला तरी डुक्कर खात नाहीत. पण हे हिंदु म्हणवितात आणि लढाईंत वा इंग्लंडांत का होईना, पण गोमांस खावें म्हणतात! आमच्यांत मुसलमानांसारखा कट्टर धर्माभिमान नाही, म्हणूनच आमची दुर्गति होत आहे!'

हें विधान विपर्यस्त आहे. त्यांची कट्टर पोथीनिष्ठता ह्या प्रकरणींहि मुसलमानांनाच नडणारी आहे. सेनापति हरिसिंग नलव्याचीच गोष्ट घ्या. सरसीमेवरील पठाणांवर काबूल नदीपर्यंत तो विजय मिळवीत गेल्यानंतर सैन्याचा पठाणांनी कोंडमारा करून धान्य बंद केलें. गावोगाव जी धान्याची पेवें होतीं, तीं शीख लुटीत म्हणून पठाणांनी त्यांवर गायींचें रक्त शिंपडलें; त्यामुळे शीख ते धान्य खाईनात. तेव्हा हरिसिंगाने रानडुकरें मारून त्यांचें रक्त धान्याच्या पेवावर शिंपडविलें नि त्यांना शुद्ध केलें! त्यासरशी मुसलमान पठाणांत एकच आकांत झाला! आता त्यांचीं पेवें तेच खाईनासे झाले आणि पठाणांची उपासमार होऊ लागली! बरे, हरिसिंगाने डुकरांचें रक्त शिंपडून 'इमानदारांचीं पेवें बाटविलीं म्हणून कांही मुसलमानांचा पक्ष देवाने घेतला, देवदूत त्याच्या साहाय्यास धाडले नि हरिसिंग 'काफराचा' धुव्वा उडविला म्हणावे तर तसें कांही घडले नाही! हरिसिंगाचा–' काफराचा 'च त्या युद्धांत शेवटी कचकचीत विजय झाला!

उद्या हिंदी मुसलमानांची रशियाशी लढाई जुंपली नि दाणा बंद होऊन ते वेढयांत अडकले तर त्या रानांत शेकडो रानडुकरें असलीं तरी

मुसलमानांना उपाशी मरावें लागेल, आणि रशियन लोक त्याच डुकरांच्या मांसावर गलेलठ्ठ होऊन पडतील !

अर्थात् गोमांसविषयक हिंदूंच्या पोथीनीष्ठतेइतकीच मुसलमानांची वराहमांसविषयक पोथीनीष्ठाहि राष्ट्रीयदृष्टचा घातकच आहे ! पुन्हा पारलौकिकदृष्टचा एकाच देवाच्या त्या परस्परविरुद्ध दोन्ही आज्ञा त्या विरोधामुळेच निव्वळ भाकडपणाच्या आहेत हेंच स्पष्ट दिसतें. देवाच्या नावे झालेला तो माणसांचा मतिभ्रम होय ! ह्या खाण्यापिण्याच्या प्रकरणीं विज्ञाननिष्ठ युरोपियनांचाच सिद्धान्त प्रत्यक्ष अनुभवी, हितकर ठरला आहे. तो आम्ही अनुसरला पाहिजे. खाणेंपिणें हा वैद्यकीय प्रश्न, धार्मिक नव्हे. जें ज्या परिस्थितींत रुचेल नि पचेल तें खावें, प्यावें. यामुळेच युरोपियन लोक उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंत कुठेहि गेले तरी अन्न असून निव्वळ पोथीवारी उपाशी मरत नाहीत ! कांदा खाऊ, कीं लसूण, कीं दोडका, कीं कोंबडी, कीं डुकर, कीं मासे, जुन्या करारांतील छप्पन अखाद्यें वा कुराणांतील पाऊणशें अखाद्यें, पुराणांतील पांचशे वर्ज्य पदार्थ-तें सारें जंजाळ नि ती सारी काथ्याकूट त्यांनी ब्रिटिश म्युझियममधल्या कपाटांतून बंद करून टाकलेली आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत एक अद्ययावत् वैद्यक तेवढें हातीं घेऊन ते जेवायला बसतात. रुचेल तें नि पचेल तें, रुचेल नि पचेल त्याच्या हातचें, रुचेल नि पचेल त्या स्थळीं ते खाऊन पिऊन मोकळे होतात. त्यांना महार, मुसलमान, बुशिटो, ब्राह्मण, एस्किमो, इराणी, वाटेल तो सैपाकी चालतो. सैपाक चांगला करता आला कीं आटोपलें. त्यांना रोजा आडवा येत नाही कीं एकादशी ! भूक खमखमीत लागेल ती द्वादशी, अजीर्ण होईल ती एकादशी ! रोग झाला कीं रोजा ! उपास नि पारणें प्रत्यक्षनिष्ठ वैद्यकाचा विषय–पोथीनिष्ठ भाकडकथांचा नव्हे. पोथीनिष्ठ आंधळेपणाची बेडी त्यांनी अशी तोडली म्हणूनच जगभर अप्रतिहत संचार करीत आहेत. रोजांच्या दिवसांत लढाई जुंपली, तर काय महिनाभर उपाशी सैन्यें लढवायचीं ? एकादशी पडली, तर मुसलमान रोजा राखतात म्हणून हिंदूंनीहि काय लढाई सोडून एकादशण्या करीत बसावयाचें ?

एकच धर्मग्रंथ ठरविणेंहि व्यर्थ ! पुष्कळ हितचिंतकांना असें वाटतें,

कीं, मुसलमानांचा जसा एकच धर्मग्रंथ कुराण हा आहे, वा ख्रिस्त्यांचा बायबल हा आहे, तसा हिंदूंचाहि कोणता तरी एकच धर्मग्रंथ ठरवावा, म्हणजे सारा मुसलमान जसा कुराण म्हणताच एकवटतो तसा हिंदूहि एकवटेल. परंतु ही आशाहि एक दुहेरी चूक आहे. कुराण हा एकच धर्मग्रंथ असल्यामुळे मुसलमानांच्या संघटनेच्या दृष्टीने फार लाभ होत आहे, ते प्रबळ बनत आहेत, ही मूळ गोष्टच वरवर भासते तितकी खरी नाही ! कुराणाच्या एका एका वाक्यापायी मतभेद होऊन मुसलमानांनी मुसलमानांच्या कत्तली केल्या आहेत, खलिफांचे शिरच्छेद झाले आहेत, बगदाद, दमास्कस, मक्का, मदीना हीं मुसलमानांचीं राजनगरें नि धर्मक्षेत्रें मुसलमानी पक्षविपक्षांनीच वारंवार विध्वंसिलीं आहेत, उपमर्दिलीं आहेत. आपल्या हिंदूंना तो इतिहास फारसा ठाऊक नसतो म्हणून त्यांची फसगत होते. वहाबींची नि सुन्नींची आजहि अरबस्थानांत गाजलेली तेढ, कादियानी नी अहर्रर यांचें आज कलम १४४ अनेच काय तें थोपवून धरलेलें पंजाबांतील युयुत्सु हाडवैर किंवा शियासुन्नींची लखनौस चाललेली यादवी पहा ! केवळ पोथीनिष्ठतेची दुर्घटना ! जर एकच धर्मग्रंथ असणें ही मुस्लीम समाजाची आजच्या युगांतहि टिकाऊ अशी बळकटी असती तर आज युरोपियनांनी साऱ्या पृथ्वीवर मुसलमानांची जी ससेहोलपट चालविली आहे, ती ते कशी चालवू शकते ? युरोपियनांना असे प्रबळ करणारा एकच ग्रंथ कोणता ? बायबल नव्हे ! त्याच्या अगदी उलट, त्यांनी बायबल मिटलें नि त्यांचे डोळे उघडले ! रशियाने तर बायबल फाडूनच टाकलें ! एकच धर्मग्रंथ असणाऱ्या लक्षावधि मुसलमानांवर कोणताहि धर्मग्रंथ नसलेला रशिया राज्य करीत आहे; ते मागासलेले, तो प्रगत; ते दुबळे, तो प्रबळ; हें कां ? कारण कीं रशियाने आपल्या समाजसंस्थेचा पाया कोणत्याहि धर्मग्रंथावर न रचता विज्ञानग्रंथावर रचला म्हणून !

म्हणून आपण मुसलमानांच्या पोथीनिष्ठेचें अनुकरण न करता हिंदूंनी त्या विज्ञाननिष्ठतेचेंच केलें पाहिजे ! ज्या समाजाने ज्या धर्मग्रंथास जखडून घेतलें तो धर्मग्रंथ जितक्या सहस्रावधि वर्षांनी जुना तितक्या सहस्रावधि वर्षांनी तो समाज मागासलेला राहिलाच पाहिजे ! धर्मग्रंथावर

समाजसंस्था उभारण्याचे दिवस गेले ! सुदैवाने आपल्या हिंदुदर्शनांत कोणत्याहि एका धर्मग्रंथाच्या पिंजऱ्यांत न अडकणारी तत्त्वज्ञानबुद्धीची जी स्वतंत्र भरारी आढळून येते तेंच आपलें भूषण आहे ! वेदगीतोपनिषदादि ग्रंथ पूज्य आहेत, आदरणीय आहेत, तेवढेच पुरे. ते परमप्रमाण नसावेतच.

या विज्ञानयुगांत समाजसंस्थेची जी संघटना करावयाची ती प्रत्यक्ष ऐहिक नि विज्ञाननिष्ठ अशाच तत्त्वांवर केली पाहिजे. ती वाट चोखाळता इंग्लंड, रशिया, जपान हीं राष्ट्रें बलवान् झालीं तसेंच हें आपलें हिंदु राष्ट्रहि झाल्यावाचून रहाणार नाही !

• • •

१३

# यंत्राने का बेकारी वाढते ?

[ समाजसुधारक आणि विज्ञाननिष्ठ सावरकरांनी यंत्रयुगाचें स्वागत करावें हें साहजिकच आहे. यंत्रयुगामुळे, विशेषतः यंत्रामुळे मनुष्यजातीची प्रगतीच होत आहे. पण असें असूनहि अज्ञानामुळे यंत्रसामर्थ्यावर आक्षेप घेतले गेले व यंत्रयुगाला तमोयुग ठरविण्यांत आलें. सावरकरांनी हे सारे आक्षेप व समजुती जोरकस प्रतिपादन आणि युक्तिवादाच्या जोरावर प्रस्तुत निबंधांत खोडून काढल्या आहेत.]

यंत्र हें मनुष्यास मिळालेला शाप नसून वरदान होय. मंत्रबळाने सृष्टिशक्ति मनुष्यास ‘ पावत ’ नसून त्या यंत्रबळानेच मनुष्यास येतात तितक्या तरी राबवितां आल्या आहेत. प्राणिसृष्टींत सर्वांस दुबळा नी अक्षरशः गायीहून गाय असलेला मनुष्यप्राणी हा आज जो सर्व प्राणी-सृष्टीचा शास्ता नी सर्व प्राण्यांत सबळ होऊन बसला आहे, तो हत्यार–कळ–यंत्र यांच्याच प्रादुर्भावामुळे होय. आणि यासाठी आता आम्ही भारतीयांनी ह्या यंत्रयुगाचें मनःपूर्वक स्वागतच केलें पाहिजे. अशा आमच्या प्रतिपादनाविषयी आपल्या शंका विचारण्यासाठी एक प्रामाणिक पण या प्रकरणीं अपक्व विचारांचे ‘ ग्रामसेवक ’ आम्हांस भेटून गेले. त्यांनी काढलेल्या शंका आजच्या ‘ ग्रामोद्धाराच्या ’ कांही अंशी उपयुक्त असणाऱ्या कार्यीं खपत असलेली किती तरी माणसें व्याख्यानांतून नी लेखांतून काढीत असतात. आणि यंत्राच्या पाठीमागे लागाल तर दुर्बळ व्हाल, बेकार व्हाल,

ती पाश्चिमात्यांची राजसी ब्याद आपल्या सात्विक पौर्वात्य संस्कृतीच्या साधेपणाचा नाश करील, इत्यादि विधानें सिद्धान्त म्हणून गांवोगांव पसरवीत जातात. आम्हास भेटलेल्या या गृहस्थांच्या शंका अशाच सांच्याच्या होत्या. हे गृहस्थ ' डबल ग्रॅज्युएट ' होते. अर्थात् त्यांच्या शंका मूलतः कितीहि अतथ्य असल्या तरीहि विद्वानांनासुद्धा सहजी भुरळ पाडण्याइतक्या लाघवी असू शकतात हें उघड आहे. युरोपमध्यें यंत्रयुगाच्या आरंभीं त्याच प्रकारच्या शंकांनी आणि आक्षेपांनी मरेतो विरोध केला. आजहि मधून-मधून त्यांचीं भुतें यत्र तत्र उठतांना युरोपमध्येंहि आढळत नाहीतच असें नाहीं. मग आपल्या अजूनहि देवलसी भावडेपणाच्या युगांतच खितपणाऱ्या लोकांत लाखो माणसे त्या वरवर पहाणारास सहज सुचणाऱ्या नी सहज पटणाऱ्या आक्षेपांना बळी पडतात यांत कांही आश्चर्य नाही. पण म्हणूनच त्या आक्षेपांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. ते कितीहि मूलतः विसंगत असले तरी त्यांची ती विसंगति उघड करून सांगण्याचें काम तुच्छ समजता कामा नये. कारण त्यांस उत्तर दिलें जात नाही. म्हणूनच ते निरुत्तर आहेत असें सामान्य जनतेला वाटू लागतें आणि यंत्राविरुद्ध असणारे लोक-मत बळावत जातें.

हे वरवर सहजी सुचणारे आक्षेप वास्तविक पाहता किती भोळसर असतात ! तें दाखविण्यासाठी वरील गृहस्थांनी बराच वेळ समर्थिलेला खालील एक आक्षेप देऊ. ते म्हणाले, ' यंत्रें हीं तुम्ही म्हणता तशी मनुष्याची शतपटीने स्वकार्यक्षम अशी बहिश्चर इंद्रियेच आहेत हें जरी खरे धरले, तरीहि मनुष्याची मूळची इंद्रियें नी यांच्या अंगची कष्टसहिष्णुता यंत्राच्या उपयोगाची कुबडी वापरीत राहिल्यामुळे पंगु होत जाते ही गोष्ट स्वतःसिद्धच नाही काय ? उपनेत्र (Spectacles) लावल्याने डोळे अधु होतात; मोटारी, आगगाड्या इत्यादि वाहनांची भरमसाठ वाढ झाल्याने स्वतःच्या पायाने लांबलांब पल्ले गांठण्याची शक्ति नाहीशी झाली. उठता बसता गाडी अशीच लागू लागली तर माणसाची साधी चालण्याची शक्तीसुद्धा पांगुळेल की काय अशी भीति वाटते ! यांत्रिक घणाचीं कामें

चालल्यामुळे लोहारांचे कठीण दंड पिसपिशीत होत जाणार; यांत्रिक करवती, यांत्रिक शिलाई, यांत्रिक विणाई यांच्यामुळे हस्तबळ, हस्तलाघव नी तें तें आनुवंशिक हस्तकौशल्य नष्टणार. यांत्रिक शेतीमुळे हातांनी नांगर हाकण्याची, वाखण्याची, कापाईची, पेरणीची, विनण्याची, सगळी सवय मोडणार. टंकण-मुद्रणामुळे हस्ताक्षरें बिघडलीं, हातीव नी रेखीव पोथ्यापुस्तकें लिहिण्याची कला नामशेष झाली. अशा प्रकारे इंद्रियें नी अंगें स्वत: अक्षम, निष्क्रिय आणि यंत्रविवश झाल्यामुळे जर क्वचित् मनुष्याला पुन्हा यंत्रावाचून राहाण्याचा प्रसंग आला, तर त्या सुधारलेल्या म्हणून म्हणविणाऱ्या माणसांचीं इंद्रियें नी अंगें मूळच्या यंत्रहीन रानटी माणसाहून कितीतरी दुबळीं झालेलीं दिसतील ! कुठे तो कडेपठार भरमध्यान्ही चढून जाणारा पोलादी देहाचा रानटी भिल्ल नी कुठे हीं मोटारींत बसल्याबसल्याच थकून जाणारीं मुर्दाड माणसें !'

यंत्राच्या नित्य उपयोगामुळे मनुष्याच्या अंगची काटकता नी इंद्रियशक्ति पांगुळते या आक्षेपाचा वरील उलगडा वरवर ऐकणारास जितका मार्मिक वाटतो, तितकाच याची मार्मिकपणे छाननी करू जाताच भाबडा ठरतो ! डोळा चांगला असता त्यास ज्या अंतरावर नीट दिसतें त्याकरिता उगीच उपनेत्र लावणारा मूर्खच म्हटला पाहिजे. अशांची दृष्टि न जुळत्या उपनेत्राने उलट मंदावते किंवा चालता येत असताहि कुबडी घेऊन फिरणाराची गति पांगुळते, हा त्या कुबडीचा नी उपनेत्रांचा दोष नसून त्या साधनांचा दुरुपयोग करणाऱ्या खुळ्या अडाणीपणाचा आहे! नेत्राच्या मूळच्या दृष्टीला साहाय्य होतील तेच उपनेत्र, जे डोळयाला दुरून दिसत नाही तें लक्षलक्ष मैलांवरील दृश्य दाखविते तीच दुर्बीण ! तिचा उपयोग त्या कार्यीं ती लावा. बाकीच्या वेळी डोळयाची मूळची दृष्टि अक्षुण्ण ठेवून अधिक तेजस्वी व्हावी म्हणून जे जे नेत्रव्यायाम करावयाचे ते करा. नुसत्या नेत्राने वाचा, उपनेत्र तसे करू नका म्हणत नाहीत. दुर्बीण एकदा लावली कीं, डोळयास पापण्यासारखी नित्याची लगटून राहात नाही. तीच स्थिति मोटार-आगगाडयांची. पूर्वीचे सहस्रावधि संतमहंत ऋद्धिसिद्धिबळे-सुद्धा हरिद्वारास जितक्या त्वरेने कधीहि सदेह जाऊ शकले नाहीत, तितक्या

त्वरेने चार रुपड्या फेकताच वाटेल त्या साध्या माणसाला, देवाला तो पापी की पुण्यवान् हें नांवापुरतेंसुद्धा न विचारता ही मोटार, ही आगगाडी, हरिद्वारला नेऊन पोचविते. अशा प्रकरणीं तिचा योग्य तो उपयोग करून घ्या. मोटार कांही लोहचुंबक नव्हे, तुम्ही कांही लोखंडाचा तुकडा नव्हे, की एकदा मोटारीत बसलें कीं पुन्हा कांही तींतून तुम्हांस उठवताच येऊ नये, सुटताच येऊ नये ! मग तुम्ही तिचा योग्य तो उपयोग संपताच आपल्या पायांची मुळची गति नी काटकपणा वाढावा, यासाठी प्रत्यही पायीं फेरफटका पण कां करीत नाही ? दऱ्याखोऱ्यांतून कडेपठारावर चढउतार स्वतःच्या पायावर करूच नका, अशी का मोटार व आगगाडी चालवितांना तुम्हांस शपथ घ्यावी लागते ? मुद्रणाने हाती पोथ्या लिहिण्याची शक्ति म्हणे नष्ट झाली ! पण पोथी छापली म्हणजे हाती प्रती करणे हा दंड्य अपराध कांही ठरत नाही. व्यासांनी सांगता सांगता गणेशजींनी महाभारत लिहिलें, पण एकच प्रत. तें कृत्य दैवी ठरलें. पण ह्या मुद्रणाच्या सिद्धीसरशी कोणतेहि मूठभर साधे जुळारी प्रत्येक सकाळीं एकेका वृत्तपत्राच्या लाख लाख नव्या प्रती ताज्या ताज्या छापून फेकीत आहेत ! अशीही सवाई दैवी सिद्धि प्रत्येक माणसाच्या हाती आली असता जर कोणास जुना बोरू घेऊन जुन्नरी कागदावर सळईसूचि घेऊन ताडपत्रावर हाती वृत्तपत्र काढावेंसेच वाटलें, किंवा ज्या वेळांत बाष्पमुद्रणामध्यें एक लाख महाभारताच्या एकटाकी सुंदर प्रती छापून टाकता येतात, त्याच वेळांत महाभारतीय एक अर्धी काय ती प्रत हातीं लिहून काढण्याचीच हुक्की आली तर त्याचाहि हात कोणी धरला आहे थोडाच ? छंद म्हणून ज्याला हवें त्यानें हातींच पोथ्या सुखेनैव लिहाव्या ! उन्हातान्हांतून नी पाण्यापावसापासून सुरक्षित रहाता यावें म्हणून मोठमोठे वाडे मनुष्य बांधतो, पण जर कोणी म्हटलें कीं, उन्हवारापाणी सहण्याची जी गृहहीन भटक्या अंदमानी प्रभृति रानटी अंगांत शक्ति असते ती ह्या गृहवासी लोकांत रहात नाही. म्हणून हे सारे घरें-वाडे-बंगले पाडून टाकले पाहिजेत, ते शाप आहेत वरदान नव्हे !' तर तें त्याचें म्हणणे जितकें खुळेपणाचें तितकेंच यंत्रावरील हे आक्षेपहि खुळे आहेत !

The machine rides man ! असें म्हणून जें यंत्राचा अरेरावीपण

दाखवू जातात, त्यांच्या हें ध्यानांत येत नाही की त्या आक्षेपानें यंत्रांचा अरेरावीपणा व्यक्त न होता माणसाचा अडाणीपणा काय तो वेशीवर टांगला जातो ! उद्या कोणी रडतराऊत जर माणसांना सांगू लागला कीं, ' अहो ' घोडा हा पशु अगदी भयंकर निरुपयोगी आहे, त्याला कोणी पाळू नये ! कारण मी त्याच्यावर स्वारी करावयास गेलों कीं तो घोडाच मजवर स्वारी भरतो !' तर त्या रडतराऊताच्या त्या आक्रोशानें जसा तो स्वतःच एक अडाणी, भेकड नी मांडीचा कच्चा ठरतो, घोडा हा पशु एकंदरीत निरुपयोगी ठरत नाहीं, तशीच ह्या अर्थशास्त्रीय रडतराऊतांची गोष्ट आहे ! मनुष्याच्या इच्छेबाहेर अशी यंत्राला कांही स्वतंत्र स्वतःची इच्छाशक्ति आहे कीं काय, की त्याच्या मनांत येताच त्याने मनुष्याविरुद्ध बंड करून उठावें ! एक वेळ घोडा भडकेल, स्वतः चिडून मनुष्यास लहरीवारी लाथाडील, पण बिचारे यंत्र ! माणसाची इच्छा तीच त्याची इच्छा. त्याला माणूस करील तें प्रमाण, बनवील तसें होईल, चालवील तसें चालेल ! जर यंत्र कधीं माणसावरच स्वार होत असेल, जर खरोखरच कुठे The machine rides man असा उत्पात घडत असेल तर ते यंत्र माणसाच्या बोकांडी आपण होऊन बसतें म्हणून नव्हे, तर मनुष्य केव्हा त्यास डोक्यावर बसवून घेतो म्हणूनच होय! आगगाडीच्या डब्यांत बसण्याचें सोडून कोणी गांवढळ जर तिच्या बंबांत जाऊन बसला नी जळाला तर तो आगगाडीचा आगलावेपणा म्हणायचा काय ? यंत्रावरील सारे आक्षेप हे मनुष्य करीत असलेल्या यंत्राच्या दुरुपयोगावरील असतात. चुलींत नीट पेटविलेला अग्नि सैपाक्यासारखा आपल्या कह्यांत राहतो; पण कोण्या मूर्खाने त्यास घरावर ठेवलें तर घर जळतें ! हा अग्नीचा दोष नसून योजकाचा आहे. मोठमोठे पर्वत फोडून आपणांस वाट मोकळी करून देणारे बोगदे पाडण्याचें, खाणीच्या भुयारी रत्नभांडारांतील रत्नांची रास आपल्या हाताशीं आणून देण्याचे, ती वृत्रासुराने लपविलेली जले शोधून काढून खडकाळ भूप्रदेशांत पाण्याचे गोड प्रवाह आपल्या वापीकूपांच्या हौदांत तुडुंब भरून देण्याचें अत्यंत उपयुक्त कार्य करणारी सुरुंगाची माळ जर कोणीं आपल्याच पायाखाली पुरून नी पेटवून घेतली तर

त्याच्या चिंधड्या उडविण्याचा दोष त्या सुरुंगाच्या युक्तीवर कांही लादता येणार नाही ! तीच गोष्ट यंत्राची.

आमच्याशी संभाषण करीत असणाऱ्या सद्‌गृहस्थांनी प्रत्युत्तर केलें, 'हें आपले म्हणणें आम्ही पुष्कळ अंशी यथार्थ समजतो, परंतु यंत्राने मनुष्य-मात्राची जी खरी हानि होणारी आहे, ती तर यंत्रें तुम्हीं म्हणता तशी अगदी सदुपयोजिली जाऊन जेव्हा सुरळीत चालू होती तेव्हाच अत्यंत तीव्रतेनें जाणवू लागणारी आहे ! समजा, यंत्राचा सदुपयोग होऊ लागला, तीं यंत्रें आपली कामें राक्षसी प्रमाणावर भराभर करू लागलीं आणि मनुष्य स्वतःच्या श्रमाने करू शकतो त्याहून सहस्रपटीनें अधिक परिमाणात त्या त्या वस्तु यंत्रे निपजवू लागलीं कीं त्या त्या वस्तु निर्मिणारे नि कामें करणारे सारे हस्तश्रम निरुपयोगी ठरतील, त्या त्या धंद्यांतील कामगार नी मोलकरी बेकार होऊन पडतील ! आगगाड्यांनी जशा बैलगाड्या मारल्या नी बैलगाडीवाले बेकार झाले, गिरण्यांनी एका दिवसांत इतका कपडा विणला कीं, चरख्या मागांवर तो विणण्यास एक वर्ष लागावें आणि त्यायोगे चरख्यामागांवर पोट भरणारे लक्षावधि लोक पोटापाण्याच्या धंद्यास मुकून जसे बेकार झाले तशीच स्थिति यच्चयावत् धंद्यांची होऊन सारी मनुष्यजाति काम नी कष्ट करण्याचें क्षेत्रच न उरल्यानें बेकार होणार ! शेतकऱ्यांचीच गोष्ट घ्या. आज कोट्यवधि लोक गांवागांवातून आपापले नांगर बैल घेऊन सबंध वर्ष शेतांत राबत आहेत; पोटापाण्यास कांहीतरी मिळवून बेका-रीच्या भुतापासून स्वतःस कसेंबसें बचावत आहेत; पण समजा, उद्या प्रचंड यांत्रिक नांगर नी सामुदायिक शेती देशभर चालू झाली, तुमच्या त्या यंत्रांचा अगदी सशास्त्र सदुपयोग करण्यास मनुष्य शिकला आणि त्या यंत्राच्या साहाय्ये त्या सामुदायिक शेतीस एका खेडेगावांत एका दिवसांत नांगरून पोखरून पेरून तीं यंत्रें संध्याकाळला मोकळीं झाली, तर तेवढ्याच शेतीस नांगरण्या-पोखरण्या-पेरण्यासाठी दोन दोन महिने जे शेकडो खेडवळ शेतकरी पूर्वी राबत असत ते बेकार होऊन नुसते हात हालवीत बसणार नाहीत काय ? कामच करावयास न उरल्य मुळे त्यांचें जीवन किती रद्द, निष्क्रिय नी नीरस होईल बरें ! पोटाला अन्न नी अंगभर कपडा मिळ-

विण्यास नी हस्तश्रम करण्यास आज जे लक्षावधि शेतकरी गांवकरी आपल्या नांगरावर नी मागांवर मधमाशाप्रमाणें जीवनाचें संगीत गुणगुणत वर्षाचे बारा महिने गुंगून नी गुंतून राहिलेले असतात त्यांचा तो भरदार आयुष्यक्रम एकदम ह्या यंत्रांच्या दास्यांनी पोखरला जाऊन बेकारीचा तो एकेक दिवस त्यांना एकेका वर्षासारखा जड जाणार नाही का? त्यांत ही यंत्रें ज्या भांडवलदारांची असतील त्यांच्या हातीं सर्व उत्पादन जाऊन हे शेतकरी, हे विणकरी, हे सोनार, हे लोहार, हे शिंपी, हे न्हावी, हे बैल-गाडीवाले, घोडेवाले, परीट, मोलकरी, भारेवाले, सुतार ज्या ज्या धंद्यांना यांत्रिक शक्ति नी यांत्रिक युक्ति प्रमाणावर करू लागेल, ते ते सारेचे सारे कोटयवधि लोक धंदा बसल्याने बेकार नी उपाशी नी कष्टहीन आळशी स्थितींत सडत पडतील! ‘यंत्रयुग–यंत्रयुग’ म्हणून ज्यांचें तुम्ही असें स्तोम माजविता, तें जर तुमच्या अपेक्षेप्रमाणें खरोखरच कधी भरभराटीस आलें तर तें सार्वत्रिक बेकारीचेंच युग असणार!

काम, काबाडकष्ट नी बेकारी ह्या तीन शब्दांची फोड.

यंत्राचो वाढ म्हणजेच बेकारीची वाढ, ह्या आक्षेपाची वरील ओरड किती निरर्थक आहे हें स्पष्टविण्यासाठी आपण प्रथम काम, काबाडकष्ट नी बेकारी हे जे तीन महत्त्वाचे शब्द त्या आक्षेपांत यंत्रविरोधक मंडळी वारंव.र त्यांच्या उलटसुलट अर्थाची अगदी एकच गल्लत करून उपयोजीत असतात, त्यांची ती गुंतागुंत सोडवून ह्या तीन शब्दांचे तीन निश्चित अर्थ आपल्या या सध्यांच्या लेखापुरते तरी प्रथमच ठरवून टाकूं, म्हणजे आमचा युक्तिवाद एकमेकांस पूर्णपणें पटला जरी नाही तरी निदान परस्परांस स्पष्टपणें समजेल तरी. काम म्हणजे आपल्याला इष्ट तो आवडीचा उद्योग; काबाडकष्ट म्हणजे जे श्रम आपण आपल्या आवडीच्या उद्योगांत हौसेने करतों ते श्रम नव्हेत, तर मनास नकोसे असताहि निरुपायामुळे जे श्रम आपणांस चरितार्थार्थ वा सक्तीचे म्हणून करणें भाग पाडतात ते. आणि बेकारी म्हणजे चरितार्थार्थ किंवा अन्य कारणामुळे आवश्यक असलेली प्राप्ति कमावण्याची संधीच न मिळणें. काबाडकष्ट करावे लागले नाहीत म्हणजे मनुष्य बेकार झाला असें नव्हे, तर मनुष्याला आवश्यक त्या वस्तू

संपादिता येईनाशा झाल्या आणि त्यांना संपादिण्यासाठी जे अवश्य ते सफल कष्टहि करण्याची संधि त्याला मिळेनाशी झाली की तो मनुष्य खऱ्या अर्थी बेकार झाला.

आता वर निश्चयिलेल्या अर्थी यंत्राने बेकारी वाढते की काय तें पहाणें सोपें आहे. यंत्रामुळे उत्पादन घटतें हा कांही यंत्रविरोधकांचा यंत्रावर आक्षेप नाही; किंबहुना त्यांचा आक्षेपच मुळी हा आहे, की यंत्राने उत्पादन राक्षसी प्रमाणावर होतें. एक मनुष्य एका वर्षांत जितकें सूत वा कापड चरख्यावर वा मागावर काढीत वा विणीत नाही, त्याच्या शतपटीने गिरणी एका दिवसांत काढून, विणून, गठ्ठा बांधून फेकून देते. लाकडी हातीव नांगर जितकी शेती एका दिवसांत नांगरतो त्याच्या शतपटीने अधिक शेती यांत्रिक नांगर त्याच वेळांत नांगरू शकतो. वैज्ञानिक खतें, जलवायु प्रभृतींच्या सहाय्यें यांत्रिक नी सामुदायिक शक्तीचें पीक शंभर शंभर पटीने, खेडवळ शेतकऱ्याच्या कसणीने येणाऱ्या भुक्कड पिकापेक्षा पुष्कळ सरस नी सत्वर निघूं शकते. टोळधाडीपासून फुटकळ नी खेडवळ शेतीचें रक्षण आज करता येत नाही; पण टोळनाशक रसायनें विमानांतून मैलांमैलांच्या सलग टापूवर शिंपडून यांत्रिक शेतींत टोळधाडीस निःपातिता येतें. यांत्रिक वहातुकीच्या बळें दुष्काळग्रस्त प्रांतांत अधिक असेल तेथून धान्यादि वस्तु पोचविता येतात. एकंदरीने पहाता मनुष्यास अत्यंत अवश्य त्या अन्न नी वस्त्र आणि त्याचप्रमाणे इतर वाटेल त्या वस्तु बिनयंत्री पद्धतीपेक्षा यांत्रिक पद्धतीने लक्ष लक्षपट अधिक प्रमाणांत उत्पादिता येतात, हव्या तिथे हव्या तेथून पुरविता येतात. तेव्हा अन्नवस्त्रादिक अत्यावश्यक वस्तूंचें वा विलासीय उपभोग्य पदार्थांचे उत्पादनसामर्थ्य यंत्रशक्तीची जोड मनुष्यास मिळाल्यास पुर्वीहून सहस्रपटीने वाढतें, घटणें तर शक्यच नाही, ही गोष्ट यंत्राचे शत्रूहि मान्य करतात.

पूर्वीहून अगदी थोड्या श्रमांत मनुष्याला सहस्रपटीने अधिक अन्न-वस्त्रादि आवश्यक वस्तूंचा नी उपभोगांचा पुरवठा जीं यंत्रें करतात, तीं मनुष्याची बेकारी वाढवितात असें म्हणणें किती विपर्यस्त होय, हें आता सहज ध्यानांत येण्यासारखें नाही काय ?

समजा, एका कुटुंबांतील सहा कर्ती माणसें हस्तश्रम नी खेडवळ पद्धत याही वर्षभर सारखी खपून त्यांना तुटपुंजें अन्नवस्त्र कसेंबसें उत्पादिता येत होतें. त्यांनी उत्कृष्ट यंत्र आणून तीच शेती नव्या वैज्ञानिक पद्धतीने केली. त्यामुळे पूर्वीपेक्षा फारच थोडचा श्रमांत त्यांना पूर्वीहून दसपट धान्य नि वस्त्र उत्पादिता आलें म्हणजे पूर्वीहून तीं माणसें श्रीमंत, सुखी नी संतुष्ट होऊन त्याविना त्यांचे वर्षाकाठी कितीतरी काबाडकष्ट वाचले. आणि त्यामुळे जर बहुतेक दिवस त्यांना सुखाच्या सुट्टींत घालवितां आले, तर त्यांच्या या सुटीला 'बेकारी' का म्हणतां येईल? बेकारी म्हणजे काबाडकष्ट करूनहि पोटास न मिळणें, आवश्यक वा उपभोग्य वस्तु न मिळणें. परंतु अन्नवस्त्रादि सर्व पदार्थांचा पुरवठा काबाडकष्टावाचून यथेच्छ होत असल्यामुळे काबाडकष्टांची आवश्यकताच न उरणे म्हणजे काही 'बेकारी' नव्हे! उलटपक्षी त्या कुटुंबास काबाडकष्टांपासून सोडविणारी, सर्व उपभोग्य वस्तूंचा पुरवठा अल्पायासांत न्यूनतर व्ययांत, दसपटीने अधिक प्रमाणांत करून देणारी आणि त्यामुळे आपला बहुतेक वेळ काबाडकष्टाच्या त्रासांतून सुटल्यामुळे आनंदाच्या नी हौसेच्या इष्ट त्या त्या कामीं घालविण्यास मोकळा ठेवणारी, ही यंत्रसाह्याने प्राप्त करून दिलेली परिस्थिति म्हणजेच खरी श्रीमंती होय!

आता समजा, त्या कुटुंबाचे धनधान्यादिक उत्पन्न यंत्रबळे असें दसपटीने वाढलें असताही जर त्याचा उपयोग त्यांतील दोघेतिघे भाऊच घेऊ लागले, आणि बाकीचे भाऊ नागवले; यंत्रें चालविण्यासहि थोडेतरी मनुष्यश्रम जे लागणारच त्यांचा सारा भार त्या नागवलेल्या भावांवरच टाकला गेला; या अन्यायामुळे त्या नागवलेल्या भावांना इच्छेविरुद्ध अधिक श्रम (म्हणजे काबाडकष्ट) करावे लागून त्या मानाने भरपूर अन्नवस्त्र न मिळून त्यांची पिळणूक नी छळणूक होत राहिली–तर तो दोष त्या यंत्रबळाचा ठरेल काय? मुळीच नव्हे! तो दोष यंत्राचा नसून असमान वाटणीचा आहे. यंत्राच्या योगें उत्पादन अत्यल्प श्रमांत, न्यूनतम व्ययांत अत्यधिक प्रमाणांत वाढलें. बस्स्, येथे यंत्राचा संबंध, कार्य दायित्व (Responsibility) संपलें! त्या पूर्वीहून अत्यधिक आणि पूर्वीहून अति स्वस्त अशा अन्नवस्त्रादिक

उत्पादनाचा योग्य तो तो वाटा योग्य त्या त्या वाटेकऱ्यास जर न मिळाला तर तो दोष यंत्राचा नसून वाटणीचा होय. त्या निष्पीडित भावांनी, पिळणूक व छळणूक झालेल्यांनी, ती वाटणी सुधारावी, अधिक उत्पादनांतील आपला योग्य वाटा मिळवण्यासाठी त्या भागीदारांशीं भांडावें–यंत्राशीं नव्हे ! जी गोष्ट या कुटुंबाची तीच गोष्ट मानवी समाजाची.

बेकारी यंत्राने वाढत नाही, तर विषम वाटणीमुळे वाढते ! आणि विषम वाटणीचा दोष यंत्राचा नसून समाजरचनेचा आहे !! यंत्राने बेकारी वाढते असें म्हणणें म्हणजे पाऊस हवा तसा पडल्याने दुष्काळ पडतो किंवा जेवावयास यथेच्छ अन्न असल्यामुळे उपासमार होते, असें म्हणण्यासारखाच वदतोव्याघात होय ! सर्व जगात बेकारी आहे असे म्हणण्यांत अर्थ असा असतो, कीं मनुष्यमात्रास अन्नवस्त्रादिक आवश्यक वस्तूंचा तुटवडा पडलेला असून काबाडकष्ट करूनदेखील त्या उपार्जिता येत नाहीत. परंतु यंत्राच्या सम्यक् उपयोगाने वैज्ञानिक नी सामुदायिक कृषि केली तर अन्नवस्त्रांचे उत्पादन ' राक्षसी ' प्रमाणावर वाढू शकतें हाच तर यंत्रविरोधी लोकांचा यंत्रावरील मूळ आक्षेप आहे ! म्हणजे यंत्रामुळे मनुष्यजातीस यंत्रहीन स्थितींत होतो त्याहून ' राक्षसी ' प्रमाणात अन्नवस्त्रादिकांचा अधिक पुरवठा मनुष्यास होऊ शकणार. फार थोडया श्रमांत. काबाडकष्टांचीसुद्धा आजच्या इतकी आवश्यकता न लागता मनुष्यास भरपूर अन्नवस्त्रादि उपभोग्य पदार्थ मिळू शकणार ! अर्थात् यंत्राने काबाडकष्टाची आवश्यकताच न उरता बेकारी नाहीशी होणार ! अन्नवस्त्र मिळत नाही म्हणूनच मनुष्य काबाडकष्ट करू पहातो ; त्याला काबाडकष्टांची हौस असते म्हणून नव्हे. जर यंत्रामुळे ते अन्नवस्त्रादिक पदार्थ प्रचंड प्रमाणांत आणि आजच्याहून अगदी कमी मनुष्यश्रमाने उत्पन्न होऊ शकतात हें तुम्हीच तावातावाने प्रतिपादिता, तर यंत्रामुळे बेकारी वाढणे मूलतःच अशक्य आहे हें तुम्ही त्या म्हणण्यानेच सिद्ध करता. यंत्राने सगळीं कामें होऊ लागलीं म्हणजे कोणास नोकरीच मिळणार नाही, करावयास कामच उरणार नाही, ही भीति जी तुम्ही प्रदर्शविता ती मनुष्य हा काबाडकष्टासाठीच काय तो नोकऱ्या शोधित हिंडत फिरेल, अशी कांहीशी विक्षिप्त

समजूत पुष्कळ नकळत झालेली असते, म्हणूनच ही परस्पर विरुद्ध विधानें केलीं जातात. यंत्राने सर्व कामें होऊ लागून उत्पादन खूप वाढलें तर नोकऱ्या मिळणार नाहीत हें खरें; पण त्याचे कारण असें, कीं मनुष्याला आजच्यासारख्या काबाडकष्टांच्या नोकऱ्यांची आवश्यकताच उरणार नाही. थोडया श्रमांत, त्याला आज मिळतें त्याहून दसपट अन्नवस्त्र प्रभृति उपभोग्य वस्तु स्वस्तांत हव्या तितक्या मिळू लागल्याने काबाडकष्टांच्या नोकऱ्या करण्याची पाळीच माणसावर येणार नाही. नोकऱ्या मिळणार नाहीत म्हणजे नोकऱ्या करण्याची आवश्यकताच उरणार नाही. काबाड-कष्टावाचून आजच्यापेक्षा अधिक सुलभतेने नी स्वस्ताईने हवे ते उपभोग्य अन्नवस्त्रादि पदार्थ यंत्रबळे सामाजिक उत्पादन वाढल्याकारणाने प्रत्येकास मिळू लागतील! हवी ती वस्तु काबाडकष्टाच्या नोकरीवांचून मिळत असल्यामुळे जर कोणीच नोकरी करीनासा झाला तर त्या स्थितीस कांही 'सार्वत्रिक बेकारी' म्हणत नाहीत!!

वरच्या एका कुटुंबाप्रमाणेच एका राष्ट्राची स्थिति. त्या राष्ट्रांत यंत्र-हीन स्थितींत त्यांतील सर्व लोकांना अन्न, वस्त्र, छत्री, घरदार, गाडया, सुऱ्या, शस्त्रेंप्रभृति संसाराच्या अनेक वस्तूसाठी दिवसा दहा तास खपावें लागे असें समजू. आता त्या त्या वस्तूंना करणारी यंत्रे आणलीं, तेथील शेती, गिरण्या, कारखाने. नव्या विज्ञान पद्धतीने यांत्रीक प्रमाणावर चालू झाले, तर त्यांचें उत्पादनहि यांत्रिक प्रमाणावर वाढणार. अन्नवस्त्र, बूट, छत्रीप्रभृति त्या त्या साऱ्या वस्तु पूर्वीपेक्षा दसपटींने अधिक प्रमाणांत, दस-पटीने कमी व्यापात नी श्रमांत म्हणूनच दसपटीने स्वस्तांत मिळू लागतील. त्यांच्या आवश्यकता अशा प्रकारे भागू लागल्याने पूर्वीचे काबाडकष्टहि दशांशाने कमी होतील. त्यामुळे उरलेला वेळ आपापल्या हौसेच्या कामांत तरी जो तो स्वेच्छेने घालवील, किंवा विसाव्यांत घालवील. कांही झालें तरी त्या वाढलेल्या रिकामपणास बेकारी वाढली असे कांही कोणी म्हणणार नाही!!

नसते दोष यंत्रांवर लादता येत नाहीत! आत्ता त्या राष्ट्रांत यंत्रबळे असे दसपट अन्नवस्त्रप्रभृति पदार्थ उत्पन्न होऊनहि जर ते त्यांतील कांही

व्यक्तींना मिळाले नाहीत तर तो दोष यंत्राचा का म्हणावयाचा ? पूर्वी मिळत होतें त्यापेक्षा दसपट अन्नवस्त्र त्यापेक्षा कमी काबाडकष्टांत जर उत्पादिलें जात आहे, तर यंत्रानें त्यांतील प्रत्येक व्यक्तीस पूर्वीपेक्षा दसपटीनें सुखी केलें आहे असेंच म्हटलें पाहिजे, बेकार केलें असें नव्हे. येथे यंत्राचें कर्तव्य संपलें. दसपटीने अधिक अन्न उत्पादिलें असताहि कांही माणसें इतरांकडून नागवलीं गेलीं किंवा दसपट सुखी न होता भिकारी झाली, तर तो दोष समाजरचनेचा म्हटला पाहिजे. तीं यंत्रें समाइक ठेवा, तें यथेच्छ उत्पादिलेलें अन्नवस्त्र समान प्रमाणांत प्रत्येक व्यक्तील वाटून द्या, ते कमी लागणारे काबाडकष्ट विशिष्ट वर्गाच्याच डोक्यावर न लादता सर्वांकडून करून घेऊन सर्वांचाच भार हलका करा, पूर्वीपेक्षा रिकाम्या रहाणाऱ्या वेळात सर्वांनाच अधिक सुट्टया नी कमी श्रम भोगू द्या. काबाडकष्टावाचून वाचलेला नी सक्तीचें काम नसलेला वेळ ज्याला त्याला आपल्या लहरीप्रमाणे काव्यकला, व्यायाम, वाचन, परोपकार, इतर उद्योग शोधसंशोधन, करमणूक, कसरती, यथा इष्ट तथा घालवू द्या ! यंत्रें सारींच कामें करू लागली तर मग मनुष्याने करावयाचे तरी काय ? अशा शंकेनें घाबरलेल्यांनी हें ध्यानांत धरावें, की मनुष्य जे काबाडकष्ट करतो ते त्यास हवे म्हणून करीत नसतो. यंत्रानें काबाडकष्टांची आवश्यकता जितकी कमी होईल तितकें मनुष्यास हलकेंच वाटेल, बरेंच वाटेल. पण यंत्रांमुळें काबाडकष्ट टळतात. म्हणजे मनुष्यानें कोणतेंच आवडतें कामहि करू नये, असा कांही यंत्रशास्त्राचा निश्चय नाही ! उलट मनुष्य आपल्याला वाटेल तें काम करण्यास वा न करण्यास स्वतंत्र होईल. कारण यंत्रानें उत्पादन वाढल्यामुळे आज बळे बळे कराव्याच लागणाऱ्या काबाडकष्टांपासून मनुष्याची यंत्रामुळे झाली तर सोडवणूकच होणारी आहे. त्याचप्रमाणे ज्याला साधी रहाणी हवी असेल त्यालादेखील यंत्र कांही आडवें येत नाही. त्याला हवा तर त्यानें पंचा नेसावा, लंगोटी नेसावी. तो मुळीच कांही न नेसला तरीदेखील यंत्र त्याला बळे बळे वीतभर जरीकांठाचे धोतर कांही नेसवीत नाही ! तो मठींत लोळो, झोपडींत राहो, फळे खावो, उपास करो ! यंत्रानें साधी रहाणी नाहीशी होऊन ती महागडी होते, वा विलासी होते, हें म्हणणें

असमंजसपणाचें आहे. यंत्र बिचारें बोलून चालून जड, निर्जीव, इच्छाशून्य, परतंत्र ! तें होऊन कांही त्याने उत्पादन केलेल्या पदार्थांचा सारा गठ्ठा कोणच्यातरी एका लाडक्या वर्गास देत नाही; कोणाचा काढून घेत नाही. तेव्हा यंत्रामुळे बेकारी वाढते, साधी रहाणी बिघडते, श्रीमंत-भिकारी असा वर्गकलह पेटतो, सारीं कामें यंत्रच करू लागलें तर मनुष्य रिकामपणाने गंजून आळसाने गांजून निकम्मी होऊन पडेल, काम करण्याच्या निढळाच्या घामाने मिळविलेली भाकरी खाण्याच्या आनंदास अंतरेल ; तो इंद्रियांचा दुबळा, मनाचा अनुदार, अंगाचा जरत्कारु बनेल, आणि यंत्रांचाच दास होऊन पडेल ! इत्यादि सारी ओरड पूर्णपणें असमंजसपणाची नी भेकडपणाची असून आजच्या समाजरचनेच्या विषमतेचे हे दोष केवळ साहचर्यामुळें हें भाबडे अडाणीपण यंत्रावर लादीत असते ! घराचा आधारस्तंभ असा खांब; पण आचरटपणें किंवा आंधळेपणे डोक्यास धाडकन् लागताच, चिडखोर मूल जसें तो दोष आपल्या अवखळ वर्तनाचा नसून खांबाच्याच मारक्या स्वभावाचा आहे असें समजतें आणि खांबासच 'माझ्या डोक्यावर आपटलास काय ?' म्हणून काठीने सडकू लागतें, तसाच हा चिडखोर असमंजसपणा, यंत्राचा सदुपयोग न करतां आल्यामुळें समाजरचनेंतील विषमतेच्या दोषाने वर्गावर्गांचें चाललेलें अर्थयुद्ध, निष्पीडन (Exploitation) सत्त्वशोषण, बेकारी, श्रमिकांची पिळवणूक, दाटीची रहाणी प्रभृति माणसांच्या दोषांचे खापर त्या दोषांशी कोणाचाहि अपरिहार्य वा अंगभूत संबंध नसलेल्या यंत्राच्या डोक्यावर फोडीत असतो ! त्यांतील हेत्वाभास ध्यानीं घेऊन आपल्या राष्ट्राने लेशमात्र न बिचकता ह्या यंत्रयुगाचे मनःपूर्वक स्वागत करावें.

यंत्रापासून जो आहे तो लाभच आहे. यंत्राच्या दुरुपयोगास टाळून सामुदायिक सदुपयोग कसा करावा ह्याचा आर्थिक वस्तुपाठ रशिया आज स्वतःला नी जगाला देतच आहे. जर यंत्राने बेकारी वाढत असती नी मनुष्य दुबळावत असता. तर आज सामुदायिक यंत्रप्रयोगांत प्रचंड प्रमाणावर ज्याचें सारें राष्ट्रीय बळ एकवटलेलें आहे, भांडवल गुंतविलेलें आहे, तो रशिया, साऱ्या जगांतला भिकार, साऱ्या जगांतला बेकार, साऱ्या

जगांतील दु:खी नी दुबळा झाला असता. पण आज वीस वर्षांच्या प्रयोगानंतरहि वस्तुस्थिति अगदी उलट आहे. यंत्रशक्तीमुळेच रशिया हें आज जगांतील प्रबळांतलें प्रबळ, संपन्नांतील संपन्न, प्रत्येकजणास काम, अन्नवस्त्र नी आनंद समतेने उपभोगू देणारें राष्ट्र झालेलें आहे !

• • •

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३६२२५ वि: निबंध
क्रमांक ९४९६४ नों दि. १९८३

१४

# भाषाशुद्धीची कसोटी

[ आपल्या भाषेंतील अनावश्यक परकी शब्द काढून त्या ठिकाणीं स्वकीय शब्द योजण्याची चळवळ अलीकडच्या काळांत सावरकर आणि माधवराव पटवर्धन या दोन पंडित-कवींनी केली. या चळवळी-मागील भूमिका व तिचें यशापयश समजून घेण्याच्या दृष्टीने सावरकरांचा 'किर्लोस्कर' (जानेवारी १९३७) मधील हा लेख हेतुपूर्वक देत आहोत. सावरकरांनी निर्मिलेले नि रूढ केलेले काही प्रतिशब्दहि या लेखांत असल्यामुळे या लेखाचें महत्त्व विशेष आहे. ]

भाषाशुद्धीची तात्त्विक चर्चा, अनावश्यक त्या त्या जुन्या वा नव्या परकीय शब्दांचें स्वभाषेंतून शक्यतो उच्चाटण करावें की नाही, याची अवश्य तितकी 'भवति न भवति' आता झालेली आहे. महाराष्ट्र साहित्य संमेलनामध्यें जळगावला 'उर्दू जुने शब्द स्वभाषेंत जे घुसले ते काढूच नयेत' अशा अर्थाच्या एका ठरावांत असलेला विक्षिप्त तेवढा भाग गाळावा अशी उप-सूचना घसघशीत बहुमताने जी या वर्षी संमत झाली तीच भाषाशुद्धीच्या चळवळीच्या प्रस्तुत प्रगतीचें उत्कृष्ट मापन नी प्रबळ पुरावा होय.

सामाजिक, राजकीय वा वाङ्मयीन, कोणचीही सुधारणा म्हटली की, प्रथमतः तिचा कांही तात्त्विक खल अवश्यच असतो. परंतु तिचें खरें यश ती व्यवहारून दाखविण्यावरच अवलंबतें. ती इष्ट कीं अनिष्ट शक्य कीं

अशक्य तें नुसत्या शाब्दिक चर्चेनेच काय तें सिद्धिणें बहुधा दुर्घटच असणार. परंतु ती ज्या नेटाने आचरणांत आणून सोडली जाते त्या प्रमाणांत तिचे सुपरिणाम नी सुसाध्यता प्रत्यक्षपणेच प्रत्ययास येत चालल्यानें पूर्वीच्या विरोधकांमध्यें जे प्रामाणिक असतात तेच तिचे समर्थक होतात, आणि जे अप्रामाणिक असतात त्यांचींही तोंडें बंद पडल्यावाचून रहात नाहीत.

यास्तव आम्ही प्रथमपासून एकीकडे तात्त्विक चर्चेचा धडाका चालू ठेवत असताही तिच्यावरच न थांबता किंवा शाब्दिक संमतीच्या ठरावांची वा असंभव एकवाक्यतेची वाट पाहात न बसतां दुसरीकडे आमच्या लेखांतून, भाषणांतून नी प्रत्यहींच्या संभाषणांतून उर्दू इंग्रजी प्रभृति व जुन्या वा नव्या परशब्दांना प्रत्यक्षपणे बहिष्कारण्याचाहि शक्यतो प्रयत्न करीत चाललो, ती भाषिक सुधारणा लगोलग व्यवहारीतहि चाललों. आमच्याप्रमाणेच श्री. आठवले प्रभृति अनेक भाषाशुद्धीच्या अभिमान्यांनी ती सुधारणा आचरून दाखविण्याचा यथाशक्ति उपक्रम चालविला. त्यामुळेच ती चळवळ आज इतकी बळावलेली आहे. त्यांतहि प्राध्यापक माधवराव पटवर्धन यांनी तर आता साहित्य संमेलनाचें आपलें अध्यक्षीय भाषणहि अनावश्यक परकीय शब्दांचा स्पर्शहि न झालेल्या शुद्ध मराठीतच लिहिलें आहे! साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणामध्यें भाषाशुद्धीच्या दृष्टीनें अकलंकित अशा मराठी भाषेंतील पहिलें भाषण करण्याचा मान प्राध्यापक पटवर्धनांनीच पटकविला हें त्यांचें वैशिष्टय चिरस्मरणीय होय! भाषाशुद्धीची सुधारणा नुसत्या तात्त्विक चर्चेच्या दलदलींतच रूतत न ठेवता ती आपल्यापुरती तरी आचरणांत आणून सोडण्याच्या त्यांच्या ब्रीदाविषयी आम्ही प्राध्यापक माधवराव पटवर्धनांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. सुधारणा नुसती सुचवून दाखविणारे बहुत, ती करून दाखविणारेच अल्प! कोणतीहि सुधारणा जी यशस्वी होते ती मुख्यत्त्वें ह्या करून दाखविणाऱ्यांच्याच बळावर होय!!

ह्यासाठींच भाषाशुद्धीचा जो अनुयायी नी अभिमानी वर्ग महाराष्ट्रांत गेल्या सातआठ वर्षांच्या नेटाच्या चळवळीमुळे उत्पन्न झालेला आहे आणि सारखा वाढत आहे, त्यास आमचे असें सांगणें आहे कीं

आता त्यांनी भाषाशुद्धी करावी की न करावी याचें चर्वितचर्वण करण्यांत फारसा वेळ न दवडतां, ज्यांना ज्या प्रमाणांत ती पटली आहे, त्या प्रमाणांत ती व्यवहारून टाकण्यावरच मुख्य भर द्यावा. अनावश्यक परकी शब्द, जुने वा नवे, मी माझ्या संभाषण-भाषण-लिखाणां-तून नाही तर नाहीच वापरणार, असें बिरूद बांधून ते ते परशब्द सारखे बहिष्कारित चलावें, तदर्थक आपले जुने वा नवे शब्द सारखे उपयोजित चलावे. आपण जितक्या नेटाने ते व्यवहारीत राहू तितक्या त्वरेने ते जुने विलुप्त नी नवे उद्भावीत असे स्वकीय शब्द रूढावले जातील. आणि त्याच प्रमाणांत सध्या बोकाळलेले ते ते परशब्द भाषेंतून लोपू लागतीलच लाग-तील. नुसत्या तात्त्विक चर्चेने हें कार्य केव्हाहि साधणार नाही. यास्तवच ह्या लेखांत आम्ही भाषाशुद्धि पटलेल्यांनाच काय तें मुख्यत्वें करून संबो-धिणार आहोंत आणि त्यांच्या अडचणी कशा टाळता येतील, त्यांनी आपलें ध्येय कोणत्या निश्चित स्वरूपांत पुढे ठेवलें पाहिजे, कोणकोणते परशब्द अगदी तत्काल बहिष्कारून तदर्थी कोणत्या प्रकारे कोणत्या कसोटीने स्वकीय शब्द उपयोजिले पाहिजेत तेंच काय तें मुख्यत: दिग्दर्शिणार आहोंत.

**भाषाशुद्धीची कसोटी**

भाषाशुद्धीचें मुख्य सूत्र काय तेंच मुळी लक्षांत न घेतल्यामुळे किंवा लक्षांत न आल्यामुळे तिचे बहुतेक विरोधक उगीचच्या उगीच साप साप म्हणून भुई बडवीत सुटतात आणि भरमसाट परशब्द वापरण्याच्या स्वत:च्या गबाळपणाचा अतिरेक झाकण्यासाठी आक्रंदू लागतात, " अहो, कोणताहि परकीय शब्द असा वापरायचाच नाही असें म्हणणें हा शुद्धिवाद्यांचा निव्वळ अतिरेक आहे ! त्यायोगे छटा व्यक्तविता येत नाहीत, भाषाशब्ददारिद्रच वाढतें !" त्या शंकेने व्याकुळलेल्या मंडळीस आम्ही पुन्हा सांगतो कीं, आपण भाषा-शुद्धीची मूळ प्रतिज्ञा, मी परशब्दांना जी कसोटी लावू इच्छितों ती कसोटी आपण एकदा पाठ करून टाका, अर्थ समजून घेऊन पाठ करून टाका, म्हणजे आपल्या आक्षेपांतील शेकडा नव्वद आक्षेप आपोआप निरस्त होतील ! आपल्यांत जे प्रामाणिक आक्षेपक आहेत तेच तिचे समर्थक बनतील ! कारण स्वभाषेचा अभिमान त्यांनाहि आहेच आहे ! स्वकीय शब्द मारले जाऊन

त्यांच्या ठायी विदेशी बाजारबुणग्यांचा धुमाकूळ माजावा, अशी कांही त्यांची इच्छाच असणें शक्य नाही. त्यांच्या शंका-निरसनासाठी भाषाशुद्धीच्या प्रत्येक अभिमान्यानें भाषाशुद्धीची मुख्य प्रतिज्ञा नी कसोटी मुखोद्‌गत करून ठेवली पाहिजे. भाषाशुद्धीच्या प्रचारकांना स्वत:सहि आपल्या ध्येयाची नी धोरणाची सुस्पष्ट कल्पना येण्यासाठी ह्या प्रतिज्ञेची रूपरेखा अवगत असलीच पाहिजे. भाषाशुद्धीची ती प्रतिज्ञा नी कसोटी थोडक्यांत अशी :—

(१) आपल्या भाषेंत ज्या अर्थाचे शब्द होते, आहेत किंवा उद्‌भाविणें सुसाध्य आहे, त्या अर्थाचे जे परकीय शब्द, ते रूढावलेले असले तरीहि बहिष्कारावे आणि आपले ते तदर्थक शब्दच प्रचलवावे. जसें :— शिवाय (वाचून), हल्ली (सध्या).

(२) परंतु ज्या वस्तु आपणांत पूर्वी नव्हत्याच आणि ज्यांना आपले शब्द उद्‌भाविणें दुर्घट अशा परशब्दांना वापरण्यास हरकत नाही. जसें :—गुलाब, जिलबी, कोट, सदरा, बूट, इत्यादि.

(३) या कटाक्षाचा असाहि अर्थ नाही कीं, ह्या उर्दू, इंग्रजी प्रभृति परभाषाच शिकू नयेत वा त्यांच्यातील ग्राह्य तेंहि घेऊच नये. परभाषेंत जे जे वाक्प्रचार, वृत्त, धाटणी, विचार सुरेख किंवा आमच्याहून अधिक चांगले; ते ते आम्हीहि आत्मसात् करण्यास सोडणार नाही.

वरील कसोटी इतकी स्पष्ट आहे कीं, परकी शब्द 'अनावश्यक' कोणते ते बहुधा बिनचूकपणें भाषाशुद्धीच्या प्रचारकांना ठरविता यावे आणि 'झाडून सारे परकीय शब्द स्वभाषेतून हुसकून देण्याचा अतिरेक भाषाशुद्धीवादी करून पाहतात', असा कांगावा करण्यास कोणासहि निमित्त सापडू नये.

भाषाशुद्धीच्या अनुयायांना दुसरी अडचण जी पदोपदीं पडतेसें आमच्याकडे येणाऱ्या पत्रांवरून दिसतें, ती ही कीं, या कसोटीप्रमाणे कोणते शब्द तत्काल बहिष्कारावे त्याची एक टिपणी त्यांच्यापुढे नसते. खरें पहाता आम्हीं सहासात वर्षांपूर्वी प्रसिद्धिलेल्या 'भाषाशुद्धि' या पुस्तिकेच्या शेवटी एक चालचलाऊ टिपणी छापलेली आहे. पण तरीहि आजच्या आज जे जे परकीय शब्द आपल्या लिखाणांतून नी भाषणांतून छटेची वा अर्थाची कोणतीहि अडचण न येता सहजासहजी बहिष्कारता येतील, त्यांची दिग्दर्शनापुरती एक लहान

टिपणी खाली देत आहोंत. प्रत्येक शब्दापुढे त्याची थोडीशी विशिष्ट चर्चाहि जोडीत आहोंत.

खाली दिलेल्या टिपणींतील परशब्द तरी यापुढे आपल्या संभाषणांत, लिखाणांत मी आजपासून नाही तर नाहीच वापरणार, तदर्थक स्वकीय शब्दच वापरीन, असा अगदी निर्धार आजपासून भाषाशुद्धीच्या अभिमान्यांनी करावा. या वर्षापुरता ह्या विषयीचा हाच कार्यक्रम! आपण हे शब्द वापरणें सोडलें आणि तदर्थक शब्द पुन्हा प्रचलवीत राहिलों कीं, ते परशब्द पुष्कळ प्रमाणांत विलुप्त झालेच पाहिजेत, तदर्थक स्वकीय शब्द पुनरुज्जीवित नी पुष्कळ प्रमाणांत रूढ झालेच पाहिजेत, इतकी भाषाशुद्धिवाद्यांची संख्या आजहि वाढलेली आहे. पण त्यांनी आता नुसता तात्त्विक काथ्याकूट करीत न बसता आपल्या लिखाणांत वा भाषणांत हे इतके निवडक परशब्द तरी कधीहि न वापरण्याचें प्रत्यक्ष कार्य करू लागलें पाहिजे. भाषाशुद्धि निदान ह्या प्रमाणांत तरी व्यवहारून टाकली पाहिजे. खाली दिलेले स्वकीय प्रतिशब्द केवळ दिग्दर्शक समजावेत. कोणी दुसरे योजले तरी चालेल. स्वकीय प्रतिशब्द असावेत एवढाच आग्रह.

आजच्या आज बहिष्कारिता येण्यासारख्या अगदी अनावश्यक अशा परशब्दांची दिग्दर्शक टिपणी :

शिवाय, खेरीज : विना, वाचून, त्यांतून, त्याविना (हे दोन्ही विदेशी शब्द बायकामुलांच्या तोंडीदेखील रुळलेले. कोणतेंहि पुस्तक घ्या. पानोपानीं 'शिवाय' बोकाळलेला. रुचिपालट म्हणूनसुद्धा 'विना' इत्यादि स्वकीय पर्याय येणार नाहीत! तदर्थक स्वकीय शब्द या दोन्ही परकीय शब्दांनी ठार केले! यांत 'छटे'चाहि लवलेश प्रश्न नाही. केवळ विकृत सवय, खोड! हे दोन्ही शब्द अगदी तत्काल बहिष्कार्य).

हल्ली : सध्या, अलीकडे, आजकाल. (हा शब्दहि बायकामुलांतसुद्धा बोकाळलेला लक्षपूर्वक पहावे, ग्रंथांतहि तीच गोष्ट. स्वकीय 'सध्या' विलोपत चाललेला! यास्तव हा 'हल्ली' परकीय शब्दहि तत्काल बहिष्कार्य.)

जरूर } अवश्य, आवश्यकता इ. (वरील शब्दांविषयीचीं सर्व कारणें या
जरुरी } विदेशी शब्दांसहि लागू पडतात. यास्तव तसाच तत्काल बहिष्कार्य).

दिलगिरी } खेद, दुःखी, विषण्ण. (वर्तमानपत्रांना कोणी मेले, कांही
दिलगीर } चुकलें कीं, 'दिलगिरी' प्रदर्शविण्याची खोडच लागलेली. खेद तोटा व दुःख वाटतें, हे प्रयोग सुचतच नाहीत ! हे दोन्ही विदेशी शब्द अगदी अनावश्यक अतएव बहिष्कार्य !)

कायम : नित्याचा, स्थिर, निश्चित. (हे प्रतिशब्द योजतांना कसेंसेंच वाटलें तर खालील टीप पहावी.)

कायम निधि : स्थिरनिधि. (हा अशुद्ध धेडगुजरी शब्द सवयीने इतका रूळला आहे कीं, त्याचा स्वकीय शुद्ध पर्याय स्थिरनिधि हाच शब्द अशुद्ध नी हास्यास्पद वाटावा ! मुसलमान जसा बंगल्यांत बसला तर भटालासुद्धा विटाळ वाटत नाही, पण हिंदु महार येताच विटाळ होतो, प्रथम प्रथम सुधारकालाहि कसेसेंच वाटतें. —तसेंच हें !!)

अखेर : शेवट, अंत (हा अखेर शब्द अगदी अनावश्यक नाही बरें ?)
अव्वलपासून अखेरपर्यंत : अथपासून इतीपर्यंत, आदीपासून अंतापर्यंत. (छटेच्या लटपटीलासुद्धा ह्या परकीय प्रयोगाचें समर्थन करणें अशक्य आहे.)

अगर : अथवा, जर. (हा परशब्द पूर्वी फारच रूढ असे; सुदैवाने अलीकडे विलोपत चालला आहे. अगदी अनावश्यक, तत्काल बहिष्कार्य.)

अस्मान : आकाश, नभ. ( खालील टीप पहा.)

जमीनअस्मानाचें अंतर : आकाशपाताळाचें अंतर. (अस्मान शब्द पूर्वी फार प्रचलित असे. आता तो तुरळक येतो. त्याची आता थोडया सावधपणासरशी हकालपट्टी करता येईल.)

जमीनजुमला : शेतीवाडी. (जमीनजुमल्यांत जर कोणास छटेचा भास होईल, तर त्याने पक्कें समजावें कीं, ही रूढीची खोड. शेतीवाडी वापरा, कीं त्यांतहि छटा येईल.)

उमेदवार : इच्छुक, स्पर्धालु.

सेकण्डहँड : आडहाती, आडगिऱ्हाइकी.

जवाबदारी, जवाबदार : उत्तरदायी, उत्तरदायित्व, दायित्व. (हिंदी-बंगालींत 'उत्तरदायी' 'दायित्व', हे शब्द अगदी रूढावलेले आहेत. आम्ही तेच मराठींत आणून योजीत आलों, आणि आताशी ते बरेच रुळत चालले आहेत. आता सर्वांनी तेच वापरावे कीं, अगदी सवयीचे होतील.)

प्रुफस् : उपमुद्रितें. (आम्हीं नवीन पाडला).

कम्पॉझिटर : जुळारी. (आम्हीं योजलेला हा शब्द झपाट्याने फैलावत आहे.)

कॉलम, रकाना : स्तंभ. (हा स्वकीय शब्द आम्हीं काढल्यापासून इतक्या झटकन् रूढावत गेला कीं, मराठींतून आता हिंदी प्रभृति अनेक भाषांत तो शिरला आहे.)

Martyr, (उर्दू) शहीद : हुतात्मा. (अंदमानांत हा शब्द पुष्कळ वापरू लागलों. त्यासरशी तो मराठींतच काय पण बोलता बोलता आज हिंदी, बंगाली, पंजाबी ते तामील, तेलगूपर्यंत प्रचलला आहे!! काय सर्व हिंदी भाषासंघांत Martyr वा उर्दू शहीद ह्या विदेशी शब्दांना स्वकीय प्रतिशब्द असा नव्हताच? त्यांतहि Martyr वा उर्दू शहीद यापेक्षा हुतात्मा, हौतात्म्य या शब्दांतला ध्वनि अधिक व्यापक, सूचक नी अत्युदार आहे.)

अरब समुद्र : पश्चिम समुद्र. (हें आपलें पुरातन नांव. आपल्या भूगोलांतील मानहानिकारक परकी नांवें शक्य तों पालटून टाकण्याची प्रथा पाडली पाहिजे.)

सर्क्युलर : परिपत्र.

मराठी ग्रंथसंग्रहालय दा. क्र. ७३०८५ शाखा

सर्चलाइट : शोध-ज्योत.

फाउंटन पेन : अखंड टांक, झरणी.

मोनोटाइप } एकटंकक

लिनोटाइप } पंक्ति-टंकक } (ते दोन्ही इंग्रजी शब्द अजून लोकांत रुळले नाहीत, तोंच हे स्वकीय शब्द रुळवावे.)

टाइपरायटर : टंकलेखक.

पॅरिग्राफ : छेदक. (हा शब्दहि आम्हीं काढल्यापासून मराठीत रुळत चालला आहे.)

मुष्कील : कठीण, दुर्घट, अडचण, दुरापास्त.

मदत } सहाय्य,

मदतनीस } सहाय्यक.

(अगदी अनावश्यक असताहि अगदी घरींदारीं, तोंडीं खिळलेला हा परशब्द. बायकामुलांच्या बोलण्याकडे लक्ष देताच आढळेल कीं, 'मदत' शब्द जर शंभरदा आला, तर 'सहाय्य' एकदासुद्धा येत नाही. खेडवळांच्या तोंडीहि 'मदत' फार! 'सहाय्य' विरळा!')

रिपोर्ट } प्रतिवृत्त, प्रतिवेदक. (चाणक्याच्या अर्थशास्त्रांतहि रिपोर्टर

रिपोर्टर } ह्याला प्रतिवेदकच म्हटलेलें आहे. हे शब्द आम्हीं योजू लागल्यापासून रुळले जात आहेत.)

मेहेरबानी : कृपा. (हा परकी शब्द खेडवळांपर्यंत रुळलेला. त्याने स्वकीय 'कृपा' शब्द बोलींतून नाहीसा करीत आणला आहे! अगदी अनवश्यक, यास्तवच त्वरित बहिष्कार्य.)

मेहेरबान : महाशय, कृपावंत. (अर्जांतून हाच परशब्द नियमाने येतो. परंतु हिंदुसभेच्या वतीने होणाऱ्या आणि इतर सरकारी अर्जांतूनहि रत्नागिरीकडे 'कृपावंत' हा स्वकीय शब्दहि आताशी लिहिला जातो.)

नंबर : क्रमांक. (हा सुरेख शब्द आमच्या वडील बंधूंनी काढला, आम्ही प्रचलविला. हिंदी-पंजाबीपर्यंत आज रूढावत चालला आहे.)

खास अंक : विशेषांक. (क्रमांक जसा मराठींतून झटपट रुळावला तसाच नियतकालिकांनी हा विशेषांक शब्दहि तत्काळ रुळविला

पाहिजे. हा शब्द आधीपासूनच परिचित आहे; पण तरीहि खोड सुटत नाही ! बहुतेक संपादक 'खास अंक' म्हणतात ! किर्लोस्कर मासिकांनी 'विशेषांक' वापरण्याचा जसा निर्धार केला आहे, तसाच सारेजण करतील, तर हा एक अनावश्यक परशब्द 'खास अंक' लवकरच नाहीसा होईल. यापुढे सर्वांनी 'विशेष अंक' असेंच लिहावें, बोलावें.)

अंदाजपत्रक }
बजेट } व्ययसंकल्प , अर्थसंकल्प.

कायदेकौन्सिल }
असेंब्ली } विधिमंडळ, विधिसमिति. (हिंदी, बंगाली, 'धारासभा 'व्यवस्थापिका सभा' हे शब्द बहुतेक वृत्तपत्रें वापरतात.

आम्हीं आपल्या मराठीस अनुकूल असा विधिमंडळ शब्द काढला. तो कित्येक संपादक वापरतात. नामदार व्यंकटराव सुर्वे तोच विधिमंडळ शब्द मुंबई विधिमंडळांतहि आज सहासात वर्षें वापरीत आहेत. पण तरीहि केसरीसारखीं कांही पत्रें, 'कायदे-कौन्सिल' हा धेडगुजरी शब्दच हट्टाने कवटाळीत आहेत ! स्वकीय शब्दच वापरण्याचा अतिरेकी अभिनिवेश एक वेळ क्षम्य मानता येईल; पण परशब्द आणि तोहि 'कायदे-कौन्सिल' सारखा अगदीच ओंगळ, पण तोच वापरीन, हा दुराग्रह निव्वळ लज्जास्पद नाही का? विधिमंडळ नको असेल, तर दुसरा स्वकीय शब्द तुम्ही योजा ! हिंदींत रूढावलेला 'धारासभा' बंगालीतील 'व्यवस्थापिका परिषद्' म्हणा ! पण खरें पहाता मराठींत रुळत चाललेला विधिमंडळ, विधिसमिति हाच सुरेख ! )

लायक : योग्य, कार्यक्षम }
नालायक : अयोग्य, टाकाऊ } हे दोन्ही परशब्द अगदी अनावश्यक असताहि गांवगन्ना बोकाळलेले ! ब्राह्मण स्त्रियांच्या तोंडालाहि 'लायक' गोड लागतो ! 'योग्य' शब्दाचा घास घेतला कीं ठसकाच लागतो! ! )

सदर, सदरहू : वरील, उपर्युक्त, प्रस्तुत.

सिनेमा टॉकी : बोलपट. (चित्रपट, बोलपट हे शब्द सुदैवाने चहूकडे रूढावले आहेत. पण जर का 'टॉकी' ही वस्तु इकडे येताच आम्हीं 'बोलपट' केसरींत सुचविला नसता, आणि

पांचसहा वर्षे तशीच जातीं, तर तो 'टॉकी'च लोकांच्या तोंडीं रुळून काढता काढवला नसता; पण बोलपट लगोलग प्रचलविल्याने आता साऱ्या छटाबिटा त्याच्याच कच्छपी लागल्या आहेत ! स्वकीय शब्द वापरू लागलें कीं, छटाबिटा झटसाऱ्या त्यालाहि चिकटतात, हें आमचें म्हणणेंच या उदाहरणावरून सिद्ध होत नाही का ?)

सिनेमा-हाउस : पटगृह, चित्रपटगृह.

सिनेरिओ : पटकथा.

फिल्म : चित्रावलि.

तहहयात : आजीव, यावज्जीव, आमरण, आजन्म. (हा शब्द पूर्वी फारच बोकाळलेला असे. पण त्यावरील आमच्या सतत टीकेने तो आता मृत्युपंथास लागला आहे. वाटेल तितके स्वकीय प्रतिशब्द असताहि हा परशब्द प्रत्येक संस्थेंत शंभर वर्षे सारखा धुडगूस घालीत होता. यावरूनच भाषाशुद्धीचा सतत पहारा आपल्या वाङमयावर असणें किती आवश्यक आहे, हें दिसून येईल. !)

शिफारस : अनुरोध. (हिंदी-बंगालींत 'शिफारस' या परशब्दाला अगदी नियमाने अनुरोध हाच शब्द रूढ आहे. आपण मराठींत तोच योजावा.)

सर्टिफिकेट : प्रमाणपत्र, दाखला किंवा प्रशस्तिपत्र. (प्रमाणपत्र हा शब्द आम्हीं पाडला. दुसरे पूर्वीचेच आहेत. तिन्ही मिळून भिन्न भिन्न असे सारे अर्थ व्यक्त होतात.)

पेण्टर : रंगकार, चित्रकार. (खेड्यापाड्यांतहि 'पेंटर' घुसत आहे. त्याहून रंगकार किती सोपा, स्वकीय. पण गबाळपणामुळे हे परशब्द आम्ही नागरिक प्रथम वापरतो नी मग ते गावगन्ना निवडुंगासारखे फैलावत जातात.)

वॉचमेकर : घड्याळजी. (वरील टीप पहा. रत्नागिरीस हा स्वकीय प्रतिशब्द आता प्रचलित आहे.)

कोरम : गणसंख्या, गण. (नुसता 'गण' इतका शब्दच वापरणे पुरे. आम्ही हा शब्द 'भाषाशुद्धी'च्या पुस्तकात सुचवून वापरू लागताच मराठींत आज पुष्कळ फैलावत चालला आहे.)

ट्रस्ट : निक्षेप. (खालील टीप पहा.)

ट्रस्टी : विश्वस्त. (हे शब्दहि आम्ही काढून वापरू लागल्यापासून मराठीस चांगलेच मानवल्यासारखे दिसतात.)

ट्रस्ट-डीड : निक्षेपपत्र. (वरील टीप पहा.)

मोनापोली : एकस्व (नवीन शब्द)

पेटंट : निजस्व, रामबाण (नवीन शब्द. या शोधाचें निजस्व मीं माझ्या नांवें नोंदविलें आहे.)

फोनोग्राफ : ध्वनिलेख.

लाउड-स्पीकर : ध्वनिक्षेप (प्रचलित आहे.)

फक्त : केवळ, नुसता, मात्र. (हा परशब्द अगदी अनावश्यक, पण घरींदारी बोकाळलेला; अगदी तत्काळ बहिष्कार्य.)

कॅलेंडर : कालदर्श, मितिपट. (प्रतिवर्षीं नवीं कॅलेंडर्स छापताना यापुढे सर्वांनी कालदर्श वा मितिपट हा शब्द त्यावर अवश्य छापावा. म्हणजेच एकदोन वर्षांत ह्या सुरेख स्वकीय शब्दाची भर भाषेंत पडेल.)

इमारत, बिल्डिंग : घर, गृह, बांधकाम, भवन, आलय इत्यादि. (हे दोन्ही परशब्द किती अनावश्यक आणि तरीहि किती बोकाळलेले! ज्याच्या त्याच्या तोंडीं! घर बांधलें रे बांधलें, कीं झाली ती बिल्डिंग!! भवन, निकेतन प्रभृति दहा तरी सुरेख शब्द घरीं असून घराच्या नांवासाठी दुसऱ्याच्या दारीं भीक मागण्यावाचून वास्तुशांति अशी करायचीच नाही असा लतकोडगेपणा आजकाल चालू आहे! मोहन बिल्डिंग, विश्राम बिल्डिंग अशा शब्दाच्या ठायीं मोहनालय, विश्राम भवन हीं नांवें काय शोभत नाहींत? नुसतें बांधणीविषयीं बोलावयाचें तर शाळेची इमारत न म्हणतां शाळागृह किंवा शाळागृहाचें बांधकाम म्हणा.)

उमर : वय. (हा परशब्द मरूं घातला आहे. अगदी त्याज्य.)

मरहूम : मृत, विगत, परलोकवासी. (वरील टीप पहा.)

बद्दल : विषयी, संबंधी. (हा परशब्दहि 'शिवाय, हल्ली' यांच्यासारख्या तोंडीं नी लिखाणांत इतका बोकाळलेला असतो. एकेका पानांत वेदान्तासारख्या अगदी गंभीर ग्रंथांतहि 'बद्दल' दहादा येईल; पण 'विषयी' वा 'संबंधी' अगदी विरळा ! हा परशब्द तत्काल बहिष्कार्य !

बाबत : गोष्ट, विषय, प्रकरण. (वरील टीपच लागू.)

खुलासा : उलगडा, विवरण, स्पष्टीकरण. (वरील टीपच लागू).

जखम } जखमी } घाव, दुखापत. (या दोन्ही परशब्दांविषयी वरचीच टीप कीं, हे परशब्द घायाळ आहेत. ज्याच्या त्याच्या तोंडीं इतके रूढावले आहेत कीं, तदर्थक स्वकीय शब्द लेखनांतहि दहा वेळांतून एक वेळसुद्धा येत नाहीत. हवें त्याने पारखून पहावें आजचें लिखाण वा बोली.)

मेजवानी : जेवणावळ, भोजन. (ब्राह्मणसभेने टिळकांना मेजवानी दिली, असें म्हणणें म्हणजे शाकभाजीला सागुती म्हणण्याइतकेंच विसंगत आहे ! कारण, मेजवानी म्हणजे टेबलावरचें जेवण ! पण रूढी हा अपप्रयोग गटकन् गिळते, आणि भोजन वा जेवणावळ ह्या सुसंगत स्वकीय शब्दांनाच हासते ! भोजन दिलें, पंगत दिली, जेवणावळ दिली, असेच प्रयोग करावे, कीं तेहि रूढ होतील.)

सो-काल्ड : तथाकथित.

अर्जंट : त्वर्य.

नजर : दृष्टि, दृष्ट (अगदी अनावश्यक पण बायकांपोरांच्या सुद्धा तोंडीं बसलेला हा परशब्द तत्काळ बहिष्कार्य.)

मालक : धनी, स्वामी.

मालकी : स्वामित्व (वरील टीपच लागू.)

खात्री : निश्चिति, प्रत्यय. (आम्ही 'निश्चिति पटली' हा प्रयोग करू लागल्यापासून मराठींत तो रुळू लागला आहे. खात्री हा परशब्द अगदी पावलोपावली येतो. प्रतिशब्द म्हणून तरी एक स्वकीय शब्द भाषेंत प्रचलवावा.)

हजर : उपस्थित, विद्यमान. (उपस्थित हा शब्द हिंदी-बंगालींत रूढ होता, तो आम्हीं मराठींत योजूं लागलों. प्रथम पुष्कळ टीका झाली; पण आता मराठींत तो उपस्थित शब्दच रुळत असून 'हजर' मागे पडत आहे.)

गैरहजर, हजेरी : अनुपस्थित, उपस्थिति. (वरील टीपच लागू.)

तयार : सज्ज, सिद्ध, (तयार या परशब्दाने स्वकीय 'सिद्ध, सज्ज' हे शब्दच परकीय करून सोडले ! तेच नवखे करून सोडले !)

पूर्वतयारी : पूर्वव्यवस्था, पूर्वसिद्धता. (पूर्वतयारी हा धेडगुजरी शब्द अगदी संभावित वाङ्मयांतहि खपतो ! त्याची खंत कोणासहि वाटत नाही ! पण त्याचे ठायीं पूर्वव्यवस्था वा पूर्वसिद्धता हा शुद्ध स्वकीय योजला कीं, तोच विलक्षण नी अतिरेकी म्हणून त्या शिष्टांना वाटतो ! खोड, दुसरें काय !!

खातर : साठी. (जसें पैशाखातर—पैशासाठी, धर्मखातर—धर्मार्थ, धर्मास्तव.)

खुद्द : प्रत्यक्ष, स्वयम् , स्वत: (वरील टीप पहा.)

जाहिरात : प्रसिद्धक. (नवीन घडलेला हा शब्द रुळत आहे. हिंदी-बंगालींत 'विज्ञापन' हा शब्द जाहिरात ह्या अर्थी सर्व वृत्तपत्रें वापरतात. आमचीं पत्रें प्रसिद्धकें हा शब्द जाहिरातीच्या ठायीं वापरतील तर त्वरित रूढावेल.

जाहीरपणे : प्रकटपणे.

जाहीर : प्रकट.

इरादा : हेतु, बेत.

मार्फत : द्वारां, हस्ते, विद्यमाने. (अगदी अनावश्यक परशब्द. पण लेखी-तोंडीं उगीचच घर धरून बसलेला.)

खलास : समाप्त, संपूर्ण (वरील टीपच लागू).

सबब : यासाठी, यास्तव, निमित्त.

सध्या स्थलाभावी इतके शब्द दिग्दर्शनार्थ पुरे आहेत. भाषाशुद्धिवाद्यांनी आपल्यापुढे या शब्दांची टिपणी नेहमी ठेवावी आणि आपलें कोणतेंहि पत्र,

निबंध वा इतर लिखाण संपताच ह्या दृष्टीने पुन्हा एकदा वाचावें. सवयीमुळे वरील परशब्द त्यांत पडलेला दिसताच तो खुडून वरील टिपणींतील वा दुसरा कोणचा पटेल तो स्वकीय शब्द योजावा. शंभर जणांनी जरी आपल्या लेखांत हे परशब्द बहिष्कारून तदर्थ स्वकीय शब्द एक वर्ष भर वापरले, बोलींत आणले, तरीदेखील ते स्वकीय शब्द भाषेंत आज आहेत त्याहून शतपटीने अधिकपणे रुळत गेलेच पाहिजेत, ते परशब्द मागे पडलेच पाहिजेत. पण 'केल्याने' होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे !!

आता शेवटी एक परशब्द तेवढा दाखवायचा आम्हीं हेतुतःच मागे ठेवला आहे. कारण ह्या वरील सर्व परकीय शब्दांपेक्षा त्या परशब्दाचें आपल्या भाषेंतील अस्तित्व नी डोईजडपणा आपल्या भाषेला अत्यंत लज्जास्पद झालेला आहे !

तो अत्यंत लज्जास्पद परशब्द म्हणजे 'कायदा' (निर्बंध)!!

पहा, मराठींतच काय, पण काश्मीर ते रामेश्वर नी द्वारका ते कामरूपपर्यंत आपल्या सर्व हिंदु भाषासंघांत 'कायद्या'ला स्वकीय असा प्रतिशब्द उरला नाही. जगांतील अत्यंत प्राचीनांतील प्राचीन नी त्या काळांतील श्रेष्ठांतील श्रेष्ठ स्मृति–मनुस्मृति–ज्या राष्ट्राने रचिली 'First codified law as such' ज्या राष्ट्राने रोम्युलस, लायकर्गस, जस्टिनियनाच्या शतकोंशतकें आधीं ग्रंथिला, त्या आम्हां हिंदूंच्या राष्ट्रभाषांतील एकाहि भाषेंत आज Law 'कायदा' ह्या दोन्ही परकीय शब्दांवाचून स्वकीय असा 'कायद्या'ला शब्द उरला नाही! चंद्रगुप्ताचीं साम्राज्यें चालविणाऱ्याच्या नी चाणक्याचीं अर्थशास्त्रें रचणाऱ्याच्या वंशजांना समाजाची मूलभित्तीच ज्या भावावर उभी तो 'कायद्या'चा भाव व्यक्तविण्यास परशब्दांविना स्वकीय शब्द असा उरला नाही !! आज जर मंगळावरील एखादा पर्यटक आला तर तो आजच्या अवस्थेवरून असाच सिद्धान्त बांधील कीं, हिंदू समाजांत मुसलमान येण्यापूर्वीं 'कायदा' असा नव्हताच. तो भाव व्यक्तविणारा शब्दसुद्धा त्यांच्या स्वतःच्या भाषेंत नाही ! जसा अंदमानी बुशिटो प्रभृति रानटी टोळ्यांच्या !!

परंतु हें शल्य, आम्ही 'कायद्या'ला स्वकीय प्रतिशब्द नसल्याविषयी सारखी ओरड करितों कोणच्याच मनाला बोचावें तसें बोचलें नाही ! कायदे-कौन्सिल,

कायदेपंडित, कायदेशास्त्र, कायदेतज्ज्ञ, कायदेशीर (!) असे अत्यंत भुक्कड, कर्णकटु नी आचरट शब्द यच्चयावत् हिंदू जनता–पंडित अपंडितसुद्धा वापरीत आली, निःसंकोचपणे आजहि वापरीत आहे !

या लेखांत 'कायदा', Law ह्या शब्दांविषयी किंवा त्यांना स्वकीय प्रतिशब्द आम्ही सुचवीत आहों त्याविषयी विशेष विवरण करण्यास स्थळ उरलें नाही. पण आमच्या 'भाष शुद्धि' या पुस्तिकेंत वाचकांनी एकदा तरी अवश्य पहावें.

या लेखापुरतें थोडक्यांत इतकेंच सांगतों कीं, आता एकंदरीत 'कायद्या'ला 'निर्बंध' हाच स्वकीय शब्द योजावा. तो निर्बंध शब्द दुसऱ्या अर्थीं न योजता 'कायदा' याच अर्थीं राखून ठेवावा. अडथळा या अर्थीं प्रतिबंध शब्द योजावा. कायदेशीर–नैर्बंधिक, बेकायदेशीर–अनैर्बंधिक, निर्बंधविरुद्ध. ह्या निर्बंध शब्दापासून घडणारे निर्बंधशास्त्र, निर्बंधपंडित, निर्बंधतज्ज्ञ, निर्बंधशील प्रभृति शब्द वरील कायदेपंडित, कायदेतज्ज्ञ प्रभृति आचरट शब्दांहून किती सुसंगत, शुद्ध नी श्रुतिसुस्वर आहेत पहा !

● ● ●

१५

# स्वराज्य आणि साहित्य

[नाशिक येथील सार्वजनिक वाचनालयाचा शतसांवत्सरिक उत्सव १९४१ च्या जानेवारींत सावरकरांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. या प्रसंगी दि. १९ ला कवि गोविंदांच्या पुतळ्याचें अनावरण व 'प्रदक्षिणा' ग्रंथाचें प्रकाशन त्यांच्याच हस्ते झालें. या वेळी त्यांनी जें ओजस्वी, उत्स्फूर्त व उद्बोधक भाषण केलें तें पुढे दिलें आहे. स्वराज्य आणि साहित्य यांच्याकडे पहाण्याचा सावरकरांचा दृष्टिकोनच या भाषणांत व्यक्त झालेला आहे.]

कवि गोविंदांना स्वातंत्र्यकवि गोविंद म्हणा. आपण सर्वजण कवि गोविंद यांना स्वातंत्र्यशाहीर म्हणता; पण आमच्या मते, कवि गोविंद यांचें काव्य लक्षांत घेता, स्वातंत्र्यशाहीर अशी पदवी त्यांना लावणें बरोबर नाही. शाहीर या शब्दांत रस नाही. प्राचीन काळांत मोठमोठ्या राजांच्या पदरीं भाट किंवा चारण असत. पृथ्वीराजाच्या पराक्रमावर व तत्कालीन परिस्थितीवर यथातथ्य प्रकाश पाडणारें, एक लक्ष श्लोकांचें काव्य चंद्रभाटाने रचलें आहे. अलीकडे आपण भाट हा शब्द अवास्तव स्तुति करणारा अशा अर्थी वापरतों, पण तो त्याचा खरा अर्थ नाही. जुना अर्थ लक्षांत घेतला तर, आमच्या मतें आपण कवि गोविंद यांना स्वातंत्र्यभाट किंवा स्वातंत्र्यकवि असें म्हणणें हेंच सयुक्तिक होईल. कवि गोविंद यांचें शिक्षण फार झालेलें नव्हतें. त्यांना संस्कृत येत नव्हतें. पण त्यांच्या काव्यांतील उत्कृष्ट मराठी

शब्दांचें वैपुल्य पाहिलें म्हणजे त्याबाबत त्यांची तुलना कविवर्य मोरोपंत यांच्याशींच करावयास पाहिजे. देशाला स्वातंत्र्यप्राप्ती कशी होईल ही एकच तळमळ स्वातंत्र्यकवि गोविंद यांना जन्मभर लागली होती. चार-पाच भूपाळ्या केल्या, दोन-तीन पदें केलीं किंवा दहा-पाच संवाद लिहिले की झाला कवि ! ! पण स्वातंत्र्यकवि गोविंद हे या दर्जाचे कवि नव्हते. त्यांचें काव्य फार उच्च दर्जाचें आहे. 'मुरली' या त्यांच्या काव्यांतील सौंदर्य आपण पाहाल तर मी काय म्हणतों तें आपणास कळेल. एखादा कुशल रत्नपारखी जसा निवडक रत्ने उचलतो तसें स्वातंत्र्यकवि गोविंद हे आपल्या काव्यांत उच्च दर्जाचे नि निवडक शब्द गुंफीत. त्यांच्या काव्यांतील प्रत्येक शब्द मौलिक आहे. त्यांच्या काव्याचें संशोधन करण्याची वेळ आता आली आहे. आणि म्हणूनच तरुण पिढीला त्यांच्या काव्याचें महत्त्व अधिकाअधिक वाटू लागलें आहे. स्वातंत्र्य-कवि गोविंद यांचें काव्य तरुण पिढीनें अवश्य अभ्यासावें. कवि गोविंद यांच्यासंबंधी कांही आठवणी मीं सांगाव्या असें मला सुचविण्यांत आलें; पण निरनिराळ्या व नवनव्या कामांमुळे आणि वेगवेगळ्या चळवळींच्या प्रवाहामुळे माझी स्मरणशक्ति थोडी बुजली आहे. वेगवेगळे प्रवाह वरचेवर वाहत असल्यामुळे खालचा प्रवाह दिसेनासा होतो. महापुराखाली अनेक गावें व शहरें बुडून जावीं तशी माझी स्मृति चालू नव्या प्रवाहाखाली थोडी बुडून गेली आहे.

**विषण्णता नाहीशी करा : स्फूर्ति मिळवा.**

आजचा हा समारंभ सुखदु:खमिश्रित आहे. आपलें राज्य जाऊन शंभर वर्षें होऊन गेलीं याबद्दल दु:ख, आणि आपलें वाचनालय शंभर वर्षें जगून आज त्याचा शतसांवत्सरिक उत्सव करण्याची संधी लाभली याबद्दल आनंद. मी आज पेशव्यांच्या वाड्यांत बसलों आहे. याच ठिकाणी त्या कालांत किती तरी महत्त्वाचीं खलबतें झाली असतील. केव्हा कोणत्या स्वारीवर निघावयाचें, याचा विचार याच ठिकाणी पेशव्यांनी केला असेल. पण आता या वाड्यांत काय राहिलें आहे ? पूर्वीचें छत गेलें; त्याखाली बसून होणारीं तीं पूर्वीचीं खलबतेंहि गेलीं ! स्वाऱ्यांचे विचार विलीन झाले. आक्रमणाची शक्ति नाहीशी झाली. आज या वाड्यांत चिमण्या चिवचिवत आहेत ! पण

ज्यांनी काळाला कलाटणी दिली, जनतेला जुनें वैभव काव्यरूपाने सांगितलें अशा एका मोठ्या कवीची स्मृति आज आपण येथे जागवीत आहों. वाडा बांधावा धन्यांनी; पण त्यांत राहावे चोर, अशी या वाड्याची स्थिति झाली आहे ! ही स्थिति पालटविण्याची खटपट अनेक तरुणांनी केली. त्यांपैकी कित्येकांना याच वाड्यांत ३०–३५ वर्षांपूर्वी अनेक प्रकारचे छळ आणि हाल सोसावे लागले. कांही जणांना जन्मठेप काळ्या पाण्याची कठोर शिक्षा भोगावी लागली; कांही जणांना हुतात्मे व्हावें लागलें. पण आज त्यांपैकीं जे जिवंत राहिले तेच लोक याच वाड्यांत उजळ माथ्याने येतात इतकेंच नव्हे, तर स्वातंत्र्यकवीचा पुतळा उघडतात. अभिनव-भारत-संस्थेचें कांही लोक आज मला या समारंभांत आलेले दिसत आहेत. तेंच सरकार, तेच पोलीस, म्हणजे तीच राज्यसंस्था, असूनहि आज या पेशव्यांच्या वाड्यांत आपण राजरोसपणे एकत्र झालों. ज्यांनी स्वातंत्र्यासाठी अक्षरशः आपले प्राण खर्ची घातले त्यांचे आत्मे आज या सभागृहांत अदृश्य स्वरूपांत वावरत असतील. त्यांचे नातेवाईक, आप्त, इष्ट-मित्र हे तर आज माझ्यासमोर बसले आहेत. आज पेशवे परत येऊं शकले नाहीत, त्यांचें गेलेलें राज्य आपणाला परत मिळविता आलें नाही हें खरें; पण आज आपण स्वातंत्र्यकवि गोविंद यांचें स्मारक करून स्वातंत्र्याची स्फूर्ति प्रज्वलित केली व तेवढ्यापुरता तरी आपण आज हा वाडा थोडा शुद्ध केला. आशेला विषण्णतेचें खत मिळालें की आशा सफल होते. आज आपणास जी विषण्णता वाटत आहे, त्यांतूनच मिळेल तेवढा उत्साह आपण घ्यावा. असा एक काळ येईल की, त्या काळांत आपण स्वराज्यांत असूं आणि पुनरपि याच पेशवे वाड्यांत खलबत करण्याकरिता एकत्र येऊ.

आजच्या प्रसंगीं मीं साहित्यावर बोलावें अशी अनेकांची इच्छा मलाहि दिसली. पण मुंबई येथे तीन वर्षांपूर्वी भरलेल्या साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून मीं जें भाषण केलें तेंच आतापर्यंत शेवटचें ठरलें होतें; कारण त्यानंतर आतापर्यंत मीं साहित्याची पोथी गुंडाळून ठेवली होती. मुंबईच्या साहित्यसंमेलनप्रसंगीं मीं माझ्या अध्यक्षीय भाषणांत 'लेखण्या मोडा नि बंदुका घ्या' असें सांगितलें, ते ऐकून अनेकांना मोठें चमत्कारिक वाटलें. इतकेंच नव्हे तर अजून त्यावर महाराष्ट्रांत वादविवाद सुरू आहे. एखाद्याने लग्न-

समारंभासाठी यावें आणि त्याने नवऱ्यामुलाला संन्यास केव्हा घेणार, असा प्रश्न विचारावा; म्हणजे जसें त्याला चमत्कारिक वाटेल, तसेंच साहित्य-संमेलनासाठी आलेल्या सरस्वति-भक्तांना, मीं अध्यक्षपदावरून ' लेखण्या टाका आणि बंदुका घ्या,' असें सांगितल्यावर जरा चमत्कारिक वाटलें. 'लेखण्या टाका व बंदुका घ्या' हें सूत्र मीं उगीच सांगितलें नाही. साहित्याच्या संरक्षणाकरिताच मीं तें सांगितलें. दहावीस पुस्तकें एकत्र केलीं कीं, झालें वाचनालय. पण तेवढ्याने भागत नाही. त्या पुस्तकांची योग्य ती व्यवस्था ठेवण्याकरिता एक मंदिर हवें आणि त्याचें रक्षण करण्याकरिता बाहेर पहारेकरीहि हवा. साहित्यमंदिर तयार करणें आणि त्याचें रक्षण करणें याबद्दल जर मीं कांही युक्ति सुचविली किंवा मार्ग सांगितला तर त्यांत विषयांतर तें काय झालें ? ज्या देशांत किंवा ज्या राष्ट्रांत उत्तमोत्तम सैनिक नसतील, ज्या राष्ट्राजवळ पराक्रमी सैनिकबल भरपूर नसेल, तें राष्ट्र तर जातेंच; पण त्याचबरोबर त्या राष्ट्राची भाषा, त्या राष्ट्राचें वाङमय, त्या राष्ट्राची संस्कृति हीहि नामशेष होते. मुसलमान राज्यकर्ते कडवे आणि इंग्रज राज्यकर्ते लुच्चे. मुसलमानांनी आमच्या देशावर आक्रमण करून जो भाग घेतला त्या भागांतील आपलें वाङमय, आपले ग्रंथ त्यांनी जाळून टाकले व आपली संस्कृति नाहीशी केली. आज इंग्रज राज्यकर्तेहि तीच गोष्ट, आपणास कळणार नाही इतक्या बेताने, करीत आहेत. ही स्थिति पालटावी, आपणाला आपल्या वाङमयाचें, आपल्या भाषेचें व आपल्या संस्कृतीचें संरक्षण करता यावें यासाठी मी म्हणतों की लेखण्या टाका नि बंदुका घ्या. तक्षशिला, नालंद या विद्यापीठांचें महत्त्व पूर्वी इतकें मोठें समजलें जात असे की, जितकें सध्यां ऑक्सफर्ड-केंब्रिज विद्यापीठांना महत्त्व आहे. त्या काळच्या ज्ञात जगांतील विद्यार्थि विद्याभ्यासासाठी तक्षशिला विद्यापीठांत येऊन राहत. त्या काळचे जपानी विद्वान् तक्षशिलेच्या दिशेकडे पाहत प्राण सोडीत. अशा या जगन्मान्य तक्षशिला विद्यापीठाचें पुढे काय झालें ? आज त्याचे अवशेष-देखील उरले नाहीत. कां असें व्हावें ? या विद्यापीठांतील विद्येचें पीठ कां झालें ? याला कारण एकच व तें म्हणजे त्या विद्यापीठांतील क्षात्रवृत्ति नाहीशी झाली, क्षात्रतेज लयास गेलें हेंच होय. विद्यापीठाचें रक्षण करण्याची ताकद

आपणामध्ये राहिली नाही. मुसलमानी राज्य झाल्याबरोबर त्यांनी मोठ-मोठीं विद्यापीठें जाळून टाकलीं ! तक्षशिला विद्यापीठांतील ग्रंथालय सहा महिने जळत होतें ! इतकी तेथील ग्रंथसंपत्ति मोठी होती. आपल्या जुन्या वाङ्मयाची, जुन्या पुस्तकांची अशी राख कां झाली ? कारण एकच. आपल्यामध्ये त्यांचें रक्षण करण्याची शक्ति उरली नाही म्हणून. सापाच्या दृष्टीने पाहिलें तर मनुष्यप्राण्याला दंश करणें हें पाप ठरणार नाही. पण मला जर तो चावूं लागला तर त्याला चेचण्यांत मीं तरी कां पाप समजावें ? ज्या विद्वान् पंडितांनी तक्षशिलेसारख्या महान् विद्यापीठांत राजांच्या आश्रयाने विद्याभ्यास चालविला होता, त्यांची सरसहा कत्तल करण्यांत आली ! याचेंहि कारण त्यांच्या हातांत बंदुका नव्हत्या, आत्मरक्षणाचें व विद्यापीठाच्या रक्षणाचें सामर्थ्य त्यांच्याजवळ नव्हतें हेंच होय. म्हणून मी म्हणतों की साहित्य आणि शस्त्र यांचा संबंध अगदी निकटचा आहे.

या माझ्या विधानाबद्दल चमत्कार वाटण्याचें मुळीच कारण नाही. आजहि आपली स्थिति तशीच आहे. ज्या सार्वजनिक वाचनालयांत अनेक दुर्मिळ जुने ग्रंथ आपण ठेवता त्याच वाचनालयांत आपणाला माझीं किंवा स्वातंत्र्य कवि गोविंद यांचीं जप्त पुस्तकें, शिवरामपंत परांजपे यांचे काळमधील लेख आपणाला ठेवता येत नाहीत. याचेंहि कारण हेंच की, असे ग्रंथ ठेवले तरी त्यांचें संरक्षण करण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं कोठे आहे ? आज आपल्या हातीं बंदुका असत्या, आपल्या बाहूंत बळ असतें, तर जीं पुस्तकें जप्त आहेत तीं आपणाला बंधमुक्त करता आलीं नसतीं काय ? आपल्या लेखणींत इतकेंहि सामर्थ्य नसेल तर तिची किंमत एक मोडका बोरू इतकीच करावी लागेल. आपण जसे पारतंत्र्यांत खितपत पडलों आहों तसेंच आपलें साहित्यहि पारतंत्र्यांत जखडलें गेलें आहे. ही पारतंत्र्याची शृंखला तोडावयाची असेल तर, साहित्याबरोबर संग्रामशक्ति निर्माण करा. कारण आज ती लुप्त झाली आहे. लढाईवर जाऊन विजयी होऊन परत आलेला एखादा साहित्यिक आनंदाने शीळ घालू लागला, एखादी मौजेची कविता त्याने लिहिली, तर क्षम्य होईल; पण लढा सुरू असताना जर तो प्रेमकाव्य रचीत बसला तर आपण त्याला काय म्हणाल ? आपणावर आलेलें व येणारें संकट कोणतें आहे याचा

विचार अगोदर करा, त्याचें निवारण कसें करता येईल याचा प्रथम विचार करा नि मग कविता लिहीत बसा. कवितांचा आकडा कमी भरला तरी चालेल; पण अगोदर सैनिक-शिक्षण घ्या. जो सैनिक नाही तो जातिवंत कवीच होऊं शकत नाही. घरांत धान्याचा दाणा नाही, पोरेंबाळें भुकेनें तड-फडून मरत आहेत, अशा स्थितींत काव्य काय निर्माण होणार आणि तें पोरांची भूक कशी भागवणार ! देश पारतंत्र्यांत असताना कसल्या कविता करता ? म्हणून मी म्हणतों की कांही काळ लेखण्या मोडून टाका आणि हातांत बंदुका घ्या. जिवंत साहित्य निर्माण व्हावें म्हणून आपण आपल्या हातीं बंदुका घ्या.

स्वातंत्र्यकवि गोविंदांनी 'घे हातीं तरवार, देवा ! घे हातीं तरवार' असें आपल्या काव्यांत म्हटलें. कवि गोविंदांच्या मनांत 'घे हातीं, तरवार हिंदू ! घे हातीं तरवार' असेंच लिहावयाचें होतें; पण परिस्थिति आड आली. कवि गोविंदांना आम्ही स्वातंत्र्यकवि कां म्हणतों ? त्यांनी झेंडूच्या फुलांवर, विहार करणाऱ्या पक्ष्यांवर, बागेंत खेळणाऱ्या मुलांवर कविता रचल्या म्हणून नव्हे. याचा अर्थ फुलांवर नि मुलांवर मुळीच कविता करू नयेत असा नाही. झेंडूच्या फुलांवर कविता लिहा; पण त्या अगोदर समय कोणता आहे, संकट कोणतें आहे, भोवतालची परिस्थिति काय आहे याकडे पाहा, त्याचा अगोदर विचार करा. घराला आग लागली की, जवळपासचें पाणी आणूनच ती विझवावयास पाहिजे. त्या वेळीं चंद्रावर पाणी किती आहे आणि तें खाली कसें आणता येईल याचा विचार करींत बसण्यांत काय अर्थ ! स्वातंत्र्यकवि गोविंद हे नुसते कवि नव्हते; तर स्वातंत्र्यकवि होते, स्वातंत्र्याचे उपासक होते. आणि म्हणूनच त्यांच्या शब्दांत तेज होतें. मी सिंहगडचा पोवाडा रचला; पुढे तो जप्त झाला; पण त्या काळांत ज्या माझ्या थोड्या मित्रमंडळींनी तो म्हटला त्या वेळीं त्यांत खरा रस निर्माण होत होता. कारण त्यांच्या अंतःकरणांत स्वातंत्र्याची तळमळ होती. आज तो पोवाडा अनेक लोक गुणगुणतात; पण ती तळमळ आज नष्ट झाल्याने त्याच शब्दांचा तो अर्थ मात्र लोपल्यासारखा वाटतो. आपल्या आत्म्याचा खरा विकास व्हावयाचा असेल, श्रेष्ठ नि जिवंत साहित्य निर्माण करावयाचें असेल, तर अगोदर क्षात्रतेज निर्माण करा. नॉर्मन लोक इंग्लिश शब्दाचा अर्थ गुलाम

असा करीत. पण आज ती स्थिति राहिली नाही. याचें कारण त्यांनी आपल्यामध्ये निर्माण केलेलें क्षात्रतेज. आपली संस्कृत विद्या लुप्त होत चालली आणि सातासमुद्रांपलीकडील इंग्रजी विद्येला मान मिळूं लागला. आपले अनेक प्रभावी कवि मागे पडले; पण सातासमुद्रांपलीकडील शेक्सपियर ग्रे, मिल्टन यांना आपल्या देशांत मान मळू लागला. याचें कारण इंग्रजांची, वाढलेली सत्ता हेंच होय. नुसत्या नांवाने राष्ट्र वर येत नसतें. राष्ट्र ऊर्जितावस्थेला येण्यास पराक्रम लागत असतो. पराक्रमाने नांवाला महत्त्व येतें. आपण आपल्या पराक्रमाने हिंदु शब्द शिरोधार्य करून ठेवा. आजच्या समारंभाला आर्यसमाजी मंडळी आली आहेत. त्यांना मला असें सांगावयाचें आहे की, त्यांनी येत्या शिरगणतींत आपली जात हिंदु म्हणूनच लावावी.

मी आपणाला सांगितलेंच की, माझ्या जुन्या आठवणी बुजल्या आहेत. पण ज्या कांही या प्रसंगीं मला आठवतात, त्या चार-दोन सांगतो. स्वातंत्र्यकवि गोविंद याचे शिक्षण बेताचेंच झालें होतें. त्यांना संस्कृतहि येत नव्हतें. त्यांना वृत्त म्हणजे काय हेंहि माहीत नव्हतें. मला देखील लहानपणीं गणवृत्त समजत नसे; पण पुढे मीं त्याचा वृत्तदर्पणावरून व इतरांच्या काव्यावरून अभ्यास केला. कवि गोविंद हे येथून जवळच असलेल्या भागवतांच्या वाड्यांत राहत होते. त्यांनी माझ्याकडून शब्दकोष नेला होता व त्यांतून ते नेमका शब्द उचलून काव्यांत घालीत. इतक्या अल्प सामुग्रीवर त्यांनी काव्य लिहिण्यास प्रारंभ केला व पुढे ते स्वातंत्र्यकवि झाले. या माझ्या सांगण्यांत मी सोनाराला महत्त्व देत नाही. हिऱ्याला अधिक महत्त्व देतों. प्रथम कवि गोविंद यांचा संबंध मित्रमेळ्याशी आला. पुढे त्यांतूनच अभिनवभारत ही संस्था निर्माण झाली. तिच्या शाखा शहरोशहरी निघाल्या, आज महाराष्ट्रांत जीं प्रमुख माणसें आपणांस दिसत आहेत ती माणसें त्या वेळीं आमच्या अभिनवभारत संस्थेंत होती. आमचे सहकारी मित्र आबासाहेब खरे यांना ज्या वेळी मीं या संस्थेची माहिती दिली त्या वेळी त्यांना ती मोठी चमत्कारिक वाटली व 'ना विष्णु: पृथ्वीपतिः' असें वचन त्यांनी मला ऐकविलें. नृप याचा प्रजेचे पालन करणारा असा अर्थ आहे--प्रजा भक्षणारा असा नाही. पृथ्वीपति म्हणजे पृथ्वीचें रक्षण करणारा; नाश करणारा नव्हे; ज्या वेळी

अभिनवभारत संस्थेच्या ध्येयाची कल्पना मीं कै. बाबाराव खरे यांना सांगितली त्या वेळी त्यांना ती मुळीच पटली नाही. 'ना विष्णु: पृथ्वीपति:' हें वचन त्यांनी मला उत्तर म्हणून सांगितलें; पण मी 'न अविष्णु: पृथ्वीपति:' ही कल्पना त्यांना विशद करून सांगितली आणि या वचनाने त्यांचें इतकें समाधान झालें की 'ना विष्णु: पृथ्वीपति:' म्हणणारे बाबाराव खरे कट्टे स्वातंत्र्यवादी झाले, नव्हे त्यांना स्वातंत्र्यसंपादनाचें वेड लागलें ! स्वातंत्र्य, स्वातंत्र्य-लक्ष्मी हा शब्द प्रथम आम्ही नाशिक येथेच उच्चारला, आणि मग तो बंगाल्यांत गेला. बाबाराव खरे हेहि त्या वेळी मजबरोबर स्वातंत्र्याचा जयजयकार करण्यांत होते. आपणाला मी सांगितलेंच की, अभिनवभारत संस्था प्रथम येथेच स्थापन झाली. तिच्या संस्थापनेच्या वेळी ज्यांनी शपथा घेतल्या त्यांपैकी शेकडा ९० जणांनी त्या आजवर पाळल्या आहेत. या शपथेकरिताच श्री. कर्वे, कान्हेरे, चाफेकर, फडके या वीरांनी आत्मबलिदान करून ते हुतात्मे झाले. लाला हरदयाळ, डिंगरा प्रभृतींनी परदेशात कार्य केलें. आत्मक्लेश हा विजय नाही. आत्महत्या हा पापी विजय आहे. तो जय नसून पराजय आहे. जो शत्रूची हानि अधिक करतो व स्वत:ची हानि कमी होऊ देतो तोच खरा सेनानी. नाशिक हे क्षेत्र आहे. येथे अनेक पुण्यस्थानें आहेत; पण आजच्या प्रसंगाने मी आपणांस सांगतों की, ज्या भागवतांच्या वाड्यांत स्वातंत्र्यकवि गोविंद हे राहत होते त्या खोलीत तुम्ही त्यांचें मंदिर बांधा. अशा रीतीने आपण नाशिक क्षेत्रांत यात्रेचें एक नवें ठिकाण निर्माण करा.

मी इंग्लंडमध्ये असताना ऑक्सफर्ड-विद्यापीठांत सुप्रसिद्ध विद्वान् प्रो. जयस्वाल हे होते. त्यांना व इतर हिंदी विद्यार्थ्यांना मी कवि गोविंद यांचें काव्य वाचून दाखवीत असें. तें काव्य ऐकून जयस्वाल यांनी कवि गोविंदांना 'स्वातंत्र्य-कवि-कोकिल' अशी बहुमानाची पदवी दिली. यानंतर इकडे परत आल्यावर मी अंदमानांत गेलो त्या काळांत स्वातंत्र्य शब्द उच्चारणेहि महाकठीण होते. पण मी अंदमानातून परत येऊन पाहतों तों रस्तोरस्तीं, बोळाबोळांतून, लहानथोर सर्वजण स्वातंत्र्याचा जयजयकार करीत असलेले दिसले. स्वातंत्र्यदेवी, स्वातंत्र्यलक्ष्मी हा शब्द प्रथम आम्हीं उच्चारला. लो. टिळक जेव्हा प्रथम नाशकास आले त्या वेळी आम्ही सर्व मुलें स्वातंत्र्य-

लक्ष्मीचा जयजयकार करीत चाललो होतो. लोकमान्यांना त्याचें मोठें आश्चर्य वाटलें. लो. टिळकांनी जवळच्या मनुष्यास असें विचारलें की, हा शब्द या मंडळींनी पचवला आहे. यावर लोकमान्य म्हणाले मग खुशाल चालू दे. पण या बाबतींत लोकमान्यांचें मत आम्ही मुलें फार घाई करतों असें होतें, व त्यांच्या दृष्टीने तें योग्य होतें. कारण ते जबाबदार पुढारी होते व मी एक उच्छृंखल सनिक होतों. स्वातंत्र्यदेवीच्या उपासनेला सर्वजण लागले. जे उंच होते त्यांनी पूजेकरिता फळें काढलीं, जे त्याहून लहान होते त्यांनी फुलें काढलीं. मी लोकमान्यांचा अत्यंत नम्र सेवक आहे. मी त्यांचा एक निःश्वास आहे.

सर्व लहानथोर स्वातंत्र्यलक्ष्मीची उपासक बनली खरी; पण कित्येकांना स्वातंत्र्य आणि स्वराज्य या शब्दांतला फरक कळला नाही. पूजेला पाणी हवें; पण तें घेतांना खरें जळ कोणतें आणि मृगजळ कोणतें, हें त्यांना समजेना. सर्व लोक खरें जळ सोडून मृगजळाच्या पाठीमागे पाण्यासाठी धावत आहेत. स्वराज्याच्या चळवळींतून हिंदू-संघटनाची चळवळ सुरू झाली आहे हे लक्षांत ठेवा. केळीला नवा कोंब फुटतो. तो उंच असतो. एखाद्याने विचारलें कीं, या कोंबाचा केळीच्या बुंध्याशीं काय संबंध ? कोंब वर टोकाला आणि बुंधा तर जमिनींत पण त्या बुंध्यांतूनच नवा कोंब फुटत असल्यामुळे कोंब आणि बुंधा यांचा निकट संबंध आहे.

'अभिनव भारत संस्था' ही स्वातंत्र्य-संस्था याच नाशिक क्षेत्रांत स्थापन झाली आणि तिचाच कोंब म्हणजे हल्ली महाराष्ट्रांत भगव्या झेंड्याखाली एकत्र येऊन चाललेली हिंदुसंघटनेची चळवळ होय. अनेक जण असा आक्षेप घेतात कीं, १९०८ सालचें सावरकर आणि आजचे सावरकर हे एक नाहीत. हा आक्षेप खरोखरी पाहता अगदी बरोबर नाही. १९०८ सालीं जे सावरकर ज्या पवित्र्यांत आपणापुढे उभे होते त्याच पवित्र्यांत ते आज १९४१ सालींहि आपणापुढे उभे आहेत. त्यांत त्यांनी बदल केलेला नाही. ज्यांना कांही थोडा बदल झाल्यासारखा वाटतो तो त्यांच्या दृष्टीत आहे. ही त्यांची दृष्टि पूर्व-वत् साफ व्हावी एवढ्याचकरिता मी आपणास केळी आणि तिचा कोंब यांचा दृष्टान्त दिला. असो, स्वराज्य आणि हिंदुसंघटन यांच्यामध्ये अत्यंत निकटचा

संबंध आहे. आम्हांला स्वराज्य असेंच हवें आहे की, ज्यांत भारतीयचें स्वत्व सुरक्षित राहील.

स्वराज्यप्राप्तीच्या चळवळींत ज्यांनी आत्माहुति दिली म्हणून मी सांगितलें ते हातात गीता घेऊन फासावर चढले. हातीं कुराण घेऊन फाशी गेले नाहीत. हुतात्मा मदनलाल धिंग्रा यांनी तर परमेश्वराची अशी प्रार्थना केली की, "पुनर्जन्म जर खरा असेल तर हे परमेश्वरा! मला तूं पुन: हिंदुधर्मांत जन्मास घाल." सर्वच लोक राष्ट्रीय व्हावेत. मी मनुष्य मात्र ओळखतों; पण हें तत्त्व जोंपर्यंत सर्वांना मान्य होत नाही, हिंदुस्थानची मर्यादा हिमालय ठरवली जाते तोंपर्यंत ज्या देशांत जे बहुसंख्य त्यांची त्या देशांत सत्ता असेंच म्हटलें पाहिजे. योग्यतेप्रमाणें ज्याला त्याला जागा द्या. पण हा मुसलमान म्हणून याला अधिक जागा, अधिक हक्क, अधिक सवलती द्या असें म्हणणें म्हणजे हें स्वराज्य नसून चोरांचें राज्य झालें असेंच म्हणावयास पाहिजे. बहुसंख्य असणें हें जसें पाप नाही तसेंच अल्पसंख्य असणें हें पुण्य नाही. स्वातंत्र्यकवि गोविंद यांच्या काव्याकडे आपण या दृष्टीने पाहा आणि त्या काव्याचा अभ्यास करून आपण स्वराज्य म्हणजे काय हें समजून घ्या.

● ● ●

गठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप
अनुक्रम ३६२२५ ... विः ...निबंध...
...९।८।६८... नों विः २८.८.३

१६

# कर्तव्याचें कृपाण

[बुद्धकालीन राजकीय व सामाजिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर लिहिलेलें सावरकरांचें 'सन्यस्त खड्ग' हें तेजस्वी व गाजलेलें नाटक. त्यांतील दुसऱ्या अंकांतील ६ वा प्रवेश म्हणजे सावरकरांच्या व्यवहारी राजकारणाचा एक बोलका नमुनाच होय. क्षात्रवृत्तीची उपेक्षा केल्यामुळे शत्रूच्या आक्रमणाला बळी पडलेल्या राष्ट्राला संजीवनीमंत्र देणारा हा प्रवेश सांप्रतकाळी विशेष मार्गदर्शन करील.]

(बुद्धदेव, सेनापति विक्रमसिंह [भिक्षु विक्रम] आणि इतर भिक्षु बसले आहेत.)

**विक्रम** :—शेवटी चाळीस वर्षांपूर्वी मला वाटलेली भीति अशी खरी ठरली ! केवळ दयेने दुष्टता, केवळ कारुण्याने क्रोध, केवळ अहिंसेने हत्या, केवळ शास्त्राने शस्त्र सदोदित आणि सर्वत्र वशीभूत होत नाहीत, जिंकली जात नाहीत, नष्ट करिता येत नाहीत ! हेंच कठोर सत्य शेवटी आपल्या डोळ्यादेखत प्रत्ययास आलें ना ! भगवान्, जन्म, व्याधि, जरा आणि मृत्यूपासून मनुष्यमात्रास विनिर्मुक्त करण्यासाठी मनुष्यांत जर कोणी अधिकांत अधिक त्याग केला असेल, तप केलें असेल, चिंता वाहिली असेल तर ती तथागत भगवान् बुद्धदेव आपण होय. त्रिविध तापाचा अशेष नाश करण्याचा ज्या आर्यपंथाचा आपण आविष्कार केलात, तृष्णानाश केला असता मनुष्य जन्म परंपरेच्या कैचींतून सुटून मुक्त होतो हें जें आपण तात्त्विक निदान ठरविलेंत

त्यावर आणि आपल्या पारलौकिक स्वरूपाच्या मुक्तीवर ज्यांचा विश्वास बसत नाही ते ऐहिकवादी लोकहि आपलें एवढ्यासाठी स्वभावकौतुक करतील, सादर कृतज्ञच रहातील की, निदान या जन्मीं या आयुष्यांत तरी जन्म-व्याधि जरा-मत्यु या चारी संकटांपासून दैहिकत:हि मुक्त--अक्षरश: पूर्ण मुक्त करणें मनुष्याचे हातांत नाही—एवढे तरी आपण सिद्ध केलेंतच ! कितीहि दु:खमय असले तरी बद्धास वा बुद्धास याच जगांत देह आहे तोंवर राहिलेंच पाहिजे आणि जगांत आहों तों भौतिक अर्थी तरी ह्या चारी आधीव्याधींना मनुष्य-मात्रास—मग तो पारलौकिक अर्थी बुद्ध असो, मुक्त असो—तोंड दिलेंच पाहिजे. हें कठोर सत्य आता संशयास्पद आहे, असें म्हणण्याची मानवी आशेची हिंमत पुन्हा होणार नाही. मनुष्य-प्रयत्नांची आपण शेवटची पराकाष्ठा केलीत आणि निसर्गशक्तीपुढे मनुष्याच्या यत्नांनी हात टेकले. हाहि कांही थोडा लाभ झाला नाही. असला पराजयहि आंशिक जयच होय. जे जे अपरिहार्य म्हणून ठरेल त्यास तोंड देण्यास जो शूर आहे तो आपल्या अल्लड इच्छांच्या अश्रूंतच गटांगळ्या खात न बसता दंड थोपटून सज्ज असतो. आता जर ह्या भौतिक अस्तित्वांत तरी जन्म-व्याधि, जरा-मृत्यु ह्या चार शत्रूस तोंड दिलेंच पाहिजे, तर मग त्या भौतिक शक्तीशी द्याव्या लागणाऱ्या झुंजींत स्वपक्षास कमीत कमी हानि होऊन अधिकांत अधिक लाभ ज्या प्रकारे होईल अशीच युद्धनीति मनुष्याने अवलंबून केली पाहिजे. माझ्या मते ती युद्धनीति म्हणजे मनुष्य जातीचे अधिकांत अधिक सुख साधण्यास्तव किंवा पाहिजे तर असं म्हणा कीं, तिचें दु:ख कमींत कमी करण्यास्तव सांसारिक सर्व कामें यथावत् करणारा कर्मयोग हीच होय. आपल्या मते संसारातील कामिनी, कृषि, कृपाण ह्या तिन्ही वस्तूंचा आत्यंतिक त्याग करणारा कर्मसंन्यास हाच मरेतो जगण्याचा उत्तम मार्ग होय. परंतु आता अनुभवानेच सिद्ध झाले नाही का कीं, त्या तिन्ही त्यागांतहि आत्यंतिक शस्त्रत्यागाची प्रतिज्ञा तरी लोकहितास अत्यंत बाधक होते. कारण आपल्यासारख्याचा शस्त्रत्यागाचा हा उदात्त उपदेश सत्प्रवृत्त लोकच पाळणार. तदनुसार ते केवळ दया, अहिंसा, क्षमा ह्या भावनांच्या आधारावर जगू पहाणार. आणि मुख्यत: दुष्ट, दुर्जनच आपल्या उपदेशास लाथाडून शस्त्राने, शक्तीने, बळाने कुरघोडी करू पहाणार.

अशा सामन्यांत पोथीच्या पानांची पोचट ढाल पक्क्या पोलादाच्या आघाताखाली पिचून पिचून जाऊन पुण्यशीलांचा विनाश आणि पापशीलांचा विजय होणारच होणार--हें भाकीत जें मी चाळीस वर्षांपूर्वी केलें तें आज सत्य होत आहे कीं नाही, पहा. हें मी आनंदानें म्हणत नाही, अत्यंत दुःखानें म्हणत आहे. माझें हें अनिष्ट भविष्य खोटें ठरावें म्हणून तर मी माझ्या इच्छेविरुद्ध आपल्या म्हणण्याप्रमाणें शस्त्रसंन्यास करून भिक्षुधर्माचें आपल्या आज्ञेनुसार तंतोतंत पालन करीत आलों. पण शेवटीं शस्त्रयुद्धें शांतिमय जगांतून नाहीशी होण्याचे स्थलीं त्या शस्त्रयुद्धान्या रक्तधुमाळींत त्या जगांतून ती शांतीच नामशेष होण्याची पाळी आली. एका बाजूस मगधचा राजा बिंबिसार आपला शिष्य झाला, क्षमेचा आणि अहिंसेचा भोक्ता झाला; पण त्याचा पोटचा पुत्र अजातशत्रु आपला द्वेष्टा झाला; बापाविरुद्ध त्यानें बंड केलें आणि बापास ठार मारून तो सिंहासनावर—आमच्या सर्वांच्या छातीवर विराजमान झालेला आहे. ही मगधाची बातमी जुनी न होते तों ही कोसलची बातमी येऊन धडकली कीं, विद्युद्गर्भानेंहि आपल्या पित्यास मरणाचे दारीं ढकलून राज्यश्रीस दडपलें. तो पिताहि, कोसलचा तो प्रसनेजित महाराजहि आपला शिष्य, आपल्या दया, शांति, अहिंसेचा भोक्ता ! पण त्या आपल्या उपदेशाचा परिणाम त्याच्याच पुत्रावर—ह्या विद्युत्गर्भावर लवलेशहि न होऊन तो झाला आपला कट्टर द्वेष्टा ! त्यानें—त्या दुष्ट पुत्रानें शस्त्रशक्तीच्या आधारावर बंड केलें आणि तो—तो सुष्ट पिता शस्त्रसंन्याशाचा अभिमानी, त्या बंडांत जीव घेऊन पळत असता मृत्युमुखीं पडला. ज्यांनी ज्यांनी आपला उपदेश ऐकिला ते ते सुष्ट, राजा बिंबिसार राजा प्रसेनजित् आणि हे शाक्य मारले गेले—जाण्याच्या पंथास लागले—आणि जे जे तो उपदेश न ऐकता शस्त्रालाच शास्त्रासमान पूजित राहिले ते ते दुष्ट भरभराटले. शेवटी निर्बल कारुण्याला क्रोधानें मारिलें; दुबळ्या दयेचा प्राण दुष्टतेनें घेतला.

**बुद्ध** :—भिक्षु विक्रमसिंह ! या माझ्या संन्यस्तसंघामुळे आजवर लोककल्याण असं कांहीच साधलं नाही असे का आपलें म्हणणें आहे ?

**विक्रम** :—भगवान्, या संन्यस्तसंघानेंच नव्हे, तर संन्यास आश्रमानेंहि जीवमात्रावर जे उपकार केले आहेत त्याला पारावार नाही. अहो, सर्वसंग-

परित्याग करून वनामध्यें संन्यासी जो शब्द बोले तें उभ्या मानवाचें शास्त्र होत आलेलें आहे. 'धर्मो हि विश्वस्य प्रतिष्ठा' हें वाक्य तथ्य आहे; पण हें वाक्यहि अगदीच अतथ्य होणार नाही कीं, 'संन्यासो हि धर्मस्य प्रतिष्ठा'— इतक्या थोर थोर विभूतींच्या पदस्पर्शानें हा संन्यासाश्रम स्वर्गासमान पूज्य झाला आहे. आपल्या या संघाचीच गोष्ट घेतली तरी, आज चाळीस वर्षें भगवान् आपल्या ह्या अत्यंत सरळ, सोप्या आणि करुणामय शीतल धर्मोपदेशामृतामुळें सहस्रावधि जीवांची तळमळ शांत झाली आहे. यज्ञांचं वैयर्थ्य आपण सिद्ध करून शेकडो उपयुक्त जीवांस जीवदान दिलंत; देवदेवतांचं काल्पनिक बंड मोडून टाकून सदाचरण आणि लोकप्रेम हेंच खरं धर्मसाधन म्हणून स्थापित केलंत. आपले भिक्षु गावोगाव जाऊन रोग्यांची सेवा करितात, अडल्यांची सुटका करितात, परस्परांचा मत्सर करूं नका, अन्योन्यीं दया करा, अपराध क्षमा करा, इत्यादि उदार उपदेश करीत घरोघर समाधानाचा शीतल संदेश पोचवितात, हे आपले उपकार, हे दयामय देवा, जगत् कधीहि फेडू शकणार नाही. परंतु आपल्यासारख्या महान विभूतींच्या चाळीस वर्षांच्या अत्यंत उत्कट विरुद्ध प्रयत्नांनीहि शस्त्रबळाची उपेक्षा हानिकारक आहे हें सत्य असिद्ध झालं नाही. पण हें सकृद्दर्शनी भासणारं अपयशच त्या त्या प्रयत्नांचा यशस्वी परिणाम होय.

**आनंद** :—(प्रवेशून) बुद्धं शरणं गच्छामि, धर्मं शरणं गच्छामि, संघं शरणं गच्छामि. भगवन् ! शाक्य गणतंत्राचे वतीनें त्यांचा प्रत्यक्ष राजप्रतिनिधि तथागत बुद्धांची आणि भिक्षुवर विक्रमाची भेट घेण्यास आला असून त्यानं अशी अत्यंत दुःखकारक बातमी आणली आहे कीं, कोसलचा राजा विद्युत्गर्भ यानें असावध अशा शाक्य प्राजकावर एकाएकी स्वारी करून त्याची अगदी धूळधाण उडविली आहे.

**विक्रम** :—काय शेवटी या थरावर गोष्ट आलीच ना ! आनंद ! जा जा, त्या शाक्यीय राजदूताला बुद्ध भगवानांचे समीप घेऊन या जा. (आनंद जातो) भगवन् पाहिलेत ना ! आपल्या आत्यंतिक अहिंसामय उपदेशानं कांही व्यक्ति करुणामय बनतील; पण सर्व व्यक्ति तशा बनूं शकणार नाहीत. प्रत्यक्ष आपल्या दैदीप्यमान उपस्थितींत जर जगाची ही स्थिति तर आपला अवतार

अस्तंगत झाल्यावरची कथाच काढावयास नको. क्रूर प्रवृत्तीचे असूर ह्या जगांत व्यक्तिरूप रहाणारच, हें व्यवहारतः तर प्रत्ययास येतच आहे. तत्त्वतःहि ही उभी पिढीची पिढी जरी आपण संन्यस्त करून सोडू शकू असें आपण गृहित धरलें तरी जे कोटिकोटी जीव पुढील पिढींत जन्म घेणार त्यांची पूर्व संचित कर्में भिन्न असल्यामुळे त्यांची उपजत प्रवृत्तीहि परस्पर विभिन्नच असणार आणि म्हणून-एकाच उपदेशापायीं कोणी दयाशील होऊ शकेल तर कोणी होऊ शकणार नाही. कारण त्या कोटयवधि जीवांच्या मनोविकासाच्या कोटयावधि परंपरा असणारच. एतदर्थ दयेने द्रवतील तर ठीकच; पण जे दुष्ट तसे वळणारच नाहीत त्यांस दंडाने, बळाने त्या परोपद्रवी दुष्टतेपासून परावृत्त केलें पाहिजे. जसे पिसाळलेल्या कुत्र्यास आपण दंडाने परावृत्त करणें हीच खरी भूतदया समजतों. **अधिकांत अधिक सुष्ट प्राण्यांचे हितार्थ एका दुष्ट प्राण्यास दंडिणें हाच खरा धर्म समजतों, हिंसेची दंत नखें शस्त्राने छाटून टाकते तीच खरी अहिंसा होय.**

**शाक्य राजदूतः**—(प्रवेशून) बुद्धं शरणं गच्छामि, धर्मं शरणं गच्छामि संघं शरणं गच्छामि. भगवान्, शाक्य राष्ट्राच्या जीवावर जें संकट आलं आहे तें इतकं असह्य आहे आणि जो संदेश मी आपणाकडे आणीत आहे तो इतका त्वर्य आहे कीं, आपल्या प्रश्नांचीहि अपेक्षा न करिता ते सर्व आपण होऊनच मला सांगून टाकावं लागत आहे. सेनापति विक्रमसिंह, शाक्यांवर कोसलचा क्रूर राजा विद्युत्गर्भ विजेसारखा कोसळून पडला आहे. स्वसैन्य वाताहत झालं आहे. एकच वीर तेवढा अजूनहि न डगमगता रणांत विद्युत्गर्भास अडवून उभा आहे—तो म्हणजे विक्रमसिंह, आपला पुत्र वल्लभसिंह, आणि मरणासन्न शाक्य राष्ट्राच्या हृदयांत जीवनदायी अशी अजून एकच आशा, एकच धुगधुगी उरलेली आहे—ती म्हणजे हे शाक्यांचे धुरंधर सेनापति, हे वीरवर, हे शाक्य राष्ट्रपितामह—तुमचं सहाय्य आणि भगवान् बुद्धदेवांचे आशीर्वाद ! आमची अशी प्रार्थना आहे कीं, आमच्या विक्रमसिंहांनी जो संन्यासाश्रम स्वीकारला आहे त्यास आमची ही विनंती विसंगत असताहि, शाक्य राष्ट्राच्या प्राणांतिक संकटीं त्याची मुक्तता करण्यासाठी विक्रमसिंहा आपण गजेंद्रासारखे धावून यावें, श्रीकृष्णासारखा प्रतिज्ञाभंगहि उचितकालीं

आर्तपरित्राणार्थ तरी उचितच समजावा. विद्युत्गर्भाला जिंकलं नाही तर हें शाक्यराष्ट्र नष्ट झाल्यावाचून रहात नाही. आणि विद्युत्गर्भाला जिंकण्याला आपणच एक वीर समर्थ आहां.

**बुद्ध** :—राजदूत ! तूं शाक्य राष्ट्राला आमचा निरोप कळीव कीं, तुमच्या दुःखानं तथागतास फार दुःख होत आहे. परंतु तितकेंच दुःख विद्युत्गर्भ आणि त्याचे कोसलीय सैन्य यांच्या दुःखाविषयीहि होत आहे. कारण तुम्ही त्याच्या छळाच्या आणि अत्याचाराच्या आगीने पोळत आहां; तर ते छळक संतापाच्या आणि अतितृष्ण मत्सराच्या आगीने भाजत आहेत. आम्हांस दोघेहि सारखेच. दोघेहि वैर सोडा हेंच आमचें अनुशासन !

**विक्रम** :—अहो, पण ज्या दुष्टाने वैर धरले, साधले, त्यानं तें सोडलं पाहिजेना ! उद्या या पीठाचे वतीने जगांतील वाघ जातीलाहि आदेश धाडावा कीं, परवापासून गायगुरांचे वैर सोडा ! तो आदेश वाघाकडून जेव्हा पाळला जाईल तेव्हा देखील आपणांस असे आढळून येईल कीं, वैर सोडण्याचा आदेश मनुष्यांतील दुष्ट, दुर्जन पाळण्यास सिद्ध नाहीत ! म्हणून अशा दुष्टांचें दमन दंडानेच केलं पाहिजे.

**बुद्ध** :—पण जे दमन दंडाने होतं तें स्थायी नसतं. मनच दुष्टतेपासून परावृत्त करणें हा दुष्टांस सुष्ट करण्याचा उत्तम मार्ग नव्हे काय ?

**विक्रम** :—तो एक कल्पनेच्या पोकळींतील उत्तम मार्ग असेल ! जसं मेल्यावर मिळणारं स्वर्गांतील अमृत तृष्णाशमनास अगदी उत्तम; पण या सतृष्ण जगाच्या तान्हेल्या जीवांस गावच्या टेकडीवरील उडचा टाकीत येणाऱ्या लहान ओढयाचं ओंजळभर गोड पाणीच अधिक शीतलता देतं. काव्यांत कल्प-वृक्ष मोठा उत्तम; पण प्रत्यक्ष उन्हांत अगदी साध्या बिचाऱ्या वडपिंपळाचाच उपयोग त्यापेक्षा शतपट अधिक होतो ! आणि दुसरं असं कीं, दुष्टांचं मन सदुपदेश ऐकण्याच्या सत्प्रवृत्त स्थितींत आणण्यासच दंडशक्तीची मात्रा बहुधा पहिला रामबाण उपाय असतो. आपला चाळीस वर्षांचा अनुभव हेंच सांगतो कीं, दुष्टतेची एक स्थिति अशी आहे कीं, ती प्रत्यक्ष बुद्धाच्याहि साधुवादाने असाधुत्व सोडीत नाही. विद्युद्गर्भ हा तसाच एक दुष्ट आहे. म्हणून त्याचं मन दंडाने वळविता जरी आलं नाही तरीहि तें पंगु तरी करून टाकिता येतंच

येतं. पण नुसत्या उपदेशाने तो तात्कालिक लाभहि होत नाही; स्थायी तर होत नाहीच नाही. त्याच्या क्रोधाची नखें छाटलीं, दंत उपटले, मग तो नुसताच स्वत: जळफळत पडला, शांत झाला नाही तरीहि हा लोक तरी त्याप्रमाणे त्यांच्या प्राणघातक रक्तपी हावेपासून मुक्त होऊन निर्भय शांति भोगू शकेल.

**बुद्ध** :—भिक्षुप्रवर विक्रम, आपल्या या भाषणांतील मर्म मी ओळखून आहे. पण आम्ही संन्यस्तकाम, संन्यासी. संन्यास धर्म अहिंसेचा पुरस्कर्ता; तथापि आपण म्हणता त्याप्रमाणे ज्या अर्थी आत्यंतिक अहिंसा ही आचरणे मनुष्यास केवळ अशक्य आहे आणि ज्या अर्थी प्रबळ अशा दुष्ट दुर्जनांनी तिचा अवलंब करण्याच्या आधीच केवळ सुष्ट सुजनांनीच काय तो तिचा आत्यंतिक अवलंब केला असता अशी असमय अहिंसा केव्हा केव्हा हिंसेइतकीच लोकघातक होऊ शकते, हें आपलं विधेय अखंडनीय आहे, नाकारताच येणार नाही, त्या अर्थी आम्ही यापुढे असं अनुशासन देतो कीं, न्याय्य युद्धांत आततायी शत्रूंशी लढण्यासाठी शस्त्रधारण करण्यास माझ्या गृहस्थाश्रमीय अनुयायांस माझी अनुज्ञा आहे. एतदर्थ शाक्य राष्ट्राने ह्या असुधारणीय विद्युत्गर्भाच्या या अत्याचारी आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी शस्त्रधारण अवश्यमेव करावें. त्या हिंसेचे पाप त्या सदाचारी प्रतिकाऱ्यांवर नसून त्या अत्याचारी अनुयायांवर आहे. मन्युस्तन् मन्युमृच्छति. हे राजदूता जा, आणि ही माझी अनुज्ञा शाक्यांस कळव—या धर्मयुद्धांत तुमच्या असिलतेला माझे आशीर्वाद सहाय्यक होवोत !

**राजदूत** :—भगवन् ! आपल्या आशीर्वादाविषयी उभं शाक्य आपलं अत्यंत आभारी आहे. आता त्या शाक्य असिलतेला सहाय्यक व्हावयासाठी आपण हे दैवी आशीर्वाद मला दिलेत ती शाक्यांची असिलताहि तेवढी मला भगवानांनी अर्पण करावी कीं, हा राजदूत मागले पायी शाक्यांकडे परतलाच! होय, ती शाक्यांची असिलता आपल्याच चरणापाशी आज चाळीस वर्षें कोषबद्ध होऊन पडली आहे.

**बुद्ध** :—शाक्यांची कोषबद्ध असिलता ? कुठं आहे ? इथं ?

**राजदूत** :—होय भगवान् ! ही पहा इथं ! ह्या शाक्य सेनापतीच्या देहकोषांत गुप्तीसारखी गुप्तपणे निवसत असलेली वीरता—हीच आमच्या

शाक्यांची राष्ट्रीय असिलता आहे ! भगवान्, तिला तेवढी आता आमच्या हातीं द्या. ह्या खड्गहस्त सेनापति विक्रमसिंहाचे समरशृंग रणांगणांत फुंकलं जाताच शाक्यांच्या रानांतील कोल्हेहि सिंह होतील !

**बुद्ध** :—म्हणजे, भिक्षुवर विक्रमांनी तलवार उपसावी ? संन्याशानं आपल्या वस्त्रास रक्तांत भिजवून तीं भगवी करावीं ? अशक्य ! राजदूत, आम्हीं संन्यासी, विरक्त, समदर्शी, आम्हांस तुमच्या सांसारिक वादविवादांत पडावयाचं नाही. आम्हांस तुम्हीं सर्वच सारखे. सन्याशानं शस्त्र उपसून माणसाच्या शाका करीत सुटावं आणि आम्हीं त्यांस अनुमोदन द्यावं हें तुम्हांस विचारवलं तरी कसं ? आत्यंतिक ब्रह्मचर्य आणि आत्यंतिक शस्त्रत्याग ह्या तर संन्यस्त भिक्षुधर्माच्या दोन मूलभूत प्रतिज्ञा आहेत. त्या कशा तोडल्या जाणार ?

**विक्रम** :—क्षमा करा ! किंवा करू नका, पण भगवान् मला हें तुम्हांस सांगितलेच पाहिजे कीं, सांसारिक वादांत जर संन्याशानं विरक्तानं पडावयाचं नसेल, जर आम्हीं न्यायी व अन्यायी दोघांनाहि सारखंच मानावयाचं असेल तर तथागत बुद्धांच्या या अनुशासनाचा अधिकांत अधिक भंग करणारा अपराधी म्हणजे तथागत बुद्धच ठरतील. भगवान्, आपण पूर्वी लाजगृहीं असताना तेथे एक शेकडो जीवांस मारणारा यज्ञ होणार होता. तो बळीदानाचा कळप वाटेनं चालत असता त्यांतील एक लहानसें कोकरू लंगडत चाललेलं आपणांस दिसलें. आपणांस ते पाहताच इतकी दया आली की त्या कोकरास आपण स्वतः कडेवर घेऊन त्या कळपामागोमाग राजयज्ञागारी गेलात, विप्राशी वादविवाद करून यज्ञांत जीवहिंसा करणे पाप आहे, असं आपण त्यांस पटविलंत आणि कोकरासुद्धा सर्वांची मुक्तता केलीत. एका कोकराच्या शंभर पशूंच्या हिंसेस वाचविण्यासाठी आपण संन्यस्त कर्मांचे मुकुटमणीहि सांसारिक वादविवादांत भाग घेते झालेत. आणि शेकडो अर्भक मुलांच्या शेकडो अनाथ कन्यांच्या, हजारो निरपराध माणसांच्या प्राणाशी बेतली असता आपण म्हणता सांसारिक वादांत संन्याशास पडता येत नाही ! म्हणे संन्याशास शाक्य आणि विद्युत्गर्भ दोघेहि सारखेच. समबुद्धि हा संन्याशाचा धर्म ! परंतु संन्यासी भिक्षु चुलटचा सोलून ऊस खातात, भूस फुंकून तांदूळ खातात, गढूळ डबकें

सोडून चांगल्या वहात्या नदीचं पाणी पितात. दुभत्या गाईच्या कासेंत हात घालतात, सापाचे बिळांत हात घालीत नाहीत. मध जरी खातात तरी विषारी मधमाशांची पोळी आपल्या खाकेंत लागू देत नाहीत. तेव्हा चांगलें आणि वाईट आम्हीं ओळखतों.

बुद्ध—मग अशा समयी संन्याशानं काय करावं असं आपलं मत आहे ?

**विक्रम** :—काय करावं ? गायीची मान जबड्यांत धरणाऱ्या वाघापुढे धर्मपदाचं एकहि अनुष्टुप न गाता—कारण तें अनुष्टुप पुरं होण्याच्या आधी त्या गायीचा कंठनाल चिरून तो व्याघ्र तिचं रक्त घटघटा पिऊनहि गेलेला असेल ! —एका झडपेसरशी खड्गाने त्या वाघाचं मस्तक छाटून टाकलं पाहिजे ! तसेच या दुष्ट विद्युत्गर्भाच्या सैन्यावर तत्काळ कोणाहि इतर संसारी सैनिकापेक्षा अधिक निकराची चाल करून जाऊन त्यास खऱ्या संन्याशानं अवश्यतर ठार केलं पाहिजे, आणि निरपराध सहस्रावधि शाक्यांच्या बायकामुलांस जीवदान दिलं पाहिजे. स्वर्गप्राप्तीच्या वेडापायी पशुहत्या चालू देणं हे जर संन्यस्त भिक्षूस निर्दयपणाचं आहे तर अहिंसेच्या खुळापायी ही नरहिंसा चालू देणें त्याहूनहि शतपट निर्दयपणाचं, संन्यासित्वास कलंक लावणारं नाही काय ? भगवान् मला समरांत उतरू द्या. माझ्यात अजूनहि दुष्टांचं शासन करण्याची शक्ति आहे. निदान त्याचें यापुढील क्रौर्य तरी पंगु करीनच करीन. निरपराधाची पुढील घोर हिंसा तरी टाळीनच टाळीन नव्हे, क्वचित् अजूनहि त्या अत्याचारावर शाक्य राष्ट्र विजयहि मिळवू शकेल !

**बुद्ध** :—तरी काय ! आज शाक्यांवर विद्युत्गर्भ जय मिळवीत आहे. उद्या शाक्य त्यांच्यावर जय मिळवितील. तरी काय ; जयानं तें वैर तसंच पुढं चालणार. जो पराजित होईल तो दुःखीच रहाणार. म्हणूनच जो खरा संन्यस्तकाम आहे, खरा उपन्यस्त आहे तो या जयापजयाच्या दोन्ही गोष्टी सोडून स्वस्थ झोप घेतो—

**" जयो वैरं प्रसवति दुःखं शेते पराजितः ।**
**उपसन्तः सुखं शेते हित्वा जयपराजयम् ।। "**

**विक्रम** :—हाय, हाय ! हें मी काय ऐकत आहे ! भगवान्, आपल्या स्वतःला जेव्हा वाटलं कीं आपण निर्वाणपदीं पोचलात त्यानंतरहि केवळ ह्या

दुःखतप्त जगास पाहून आपणांस आलेल्या कळवळ्यामुळे लोककल्याणार्थ आपण हा देह चालविलात तो काय ह्या वचनाच्या आधारे ? केवळ सुखं शेते—सुखाने झोपतो इतकाच संन्याशाचा मुख्य गुण ? तर मग आपण निर्वाणपदीं केव्हाच झोपा काढावयाच्या होत्यात, देहत्याग करावयाचा होता. सुखं शेते याचा लाक्षणिक अर्थ आपणास अभिप्रेत असेल तर मग ती स्थितप्रज्ञता, कर्म-फलाचा अंतस्त्याग शस्त्र संन्यासाप्रमाणे शस्त्रधारणांतहि शक्य आहे. काटा काढावयास संन्यासी सुई घेतोच की नाही ? मग खलकंटक काढावयास खड्ग कां घेऊ नये ? दहा कोसांवर कोणाला काटा मोडला तर तुमचं अंतःकरण कळवळतं आणि त्यास औषध देण्यास जाता तेव्हा आपली झोपमोड लाक्षणिक वा तात्त्विक अर्थी नसली तरी अक्षरशः होत नाही काय ? आपण म्हणता जय वैराग्य प्रसवतो आणि पराजित अन्याय दुःखी होतो; तें कांही अंशी खरं आहे. पण अन्यायी मनुष्यास पराजयाचं जें दुःख होतं तें टाळण्यासाठी न्यायाचा पराजय करून घ्यावयाचा काय ? चोरास चोरी फसल्याचें दुःख होऊं नये म्हणून सावांना घराची दारं उघडीं टाकणें भाग पाडावयाचं ? कां तें परा-जयाचं दुःख अन्याय कर्माची शिक्षा म्हणून त्या दुष्टास भोगणं प्राप्त होणेंच श्रेयस्कर मानावयाचं ? अन्यायी आततायास पराजयाचं दुःख होतं तें वाईटच; पण जर दुर्जनांचा उद्दंड अन्याय तसाच चालू दिला तर निरपराध सुजनांच्या छळानं अवघी मनुष्य जाति संत्रस्त आणि दुःखी होते त्याची वाट काय ? तें त्याहून सहस्रपट वाईट आहे ! त्यांतहि दुष्टांस जें दंडाचें प्रायश्चित्त मिळतं तेंच त्यांच्यांतील दुष्टाई करण्याच्या प्रवृत्तीस प्रथम भयाचा आळा घालतें. आणि ती अशी पंगु झाली म्हणजे सदुपदेशानं वा सवयीने ती नष्ट होऊं शकते. परदुःख हें केव्हा केव्हा परकल्याणाचं अपरिहार्य मूल्य असतं. आपण संसार सोडलात तेव्हा यशोधरेला केवढं दुःख झालं; पण पिता वा पत्नी याच्या दुःखा-साठी आपण परत घरीं गेला नाहीत. जो तरुण वा तरुणी संन्यस्त दीक्षा देऊन आपण संघांत घेतलात त्यांच्या घरीं रडारड चालू होते. यास्तव कित्येक नगरांनी आपल्यावर बहिष्कार घालून आपणांस काढून लावले. देवदत्तानं नवीन पंथ काढला; आपण विरोध केलात. त्यामुळे तो दुःखी झाला, क्रुद्ध झाला. वैर इतकं वाढलं कीं, आपल्यावर मारेकरी घातले; पण आपण त्याचा

पंथ स्वीकारून आपला बुद्धसंघ देवदत्ताच्या दुःखास्तव वा तें वैर तेथेंच थांबविण्यासाठी विसर्जन केला नाहीत. कारण हेंच ना कीं लोककल्याणार्थ देवदत्ताचं दुःख आणि वाढतं वैर हें अपरिहार्य मूल्य होतं. अपराध्याचं दुःख टाळणं म्हणजे लाखों निरपराधी लोकांस दुःखी ठेवणें होतें. तर मग तोच न्याय संन्याशाच्या शस्त्रधारणासहि का लागू नये ? ज्या राष्ट्राचं अन्न खाऊन हा संन्याशाचा पिंड प्रतिदिन पोसला जात आहे त्या राष्ट्रावर एक अत्यंत उद्दंड, प्रत्यक्ष आपल्या बापासहि राज्यासाठी मारू मागे न घेणारा हा राक्षस सहस्रावधि सैनिकानिशी चालून आला आहे, अशा वेळी एका तरवारीच्या झटक्यासरशी तो राक्षस मारणं शक्य आहे असं वाटत असताहि जो संन्यासी आपली झोप बिघडू नये म्हणून तो खड्ग सावरण्याचे सोडून आपलं पांघरूण सावरू पहातो, आपल्या राष्ट्रांतील लाखो स्त्रीबालवृद्ध भोसकले जात असता त्यांच्या कर्कश किंकाळ्यांनी झोप मोडू नये म्हणून कानांत निरर्थक आणि अनर्थक प्रतिज्ञांचे बोळे घालून ' सुखं शेते ' स्वस्थ घोरत पडतो, त्या संन्याशास शतवार धिक्कार असो ! सुखं शेते ! केवळ स्वस्थ घोरत पडणें हें कां उपसंतांचं, संन्याशाचं ध्येय आहे ? तें अजगराचे ध्येय असू शकेल ! ––संन्याशाचं नव्हे ! तेव्हा भगवन्, मला आज्ञा द्यावी. म्हणा––आधीच शाक्यांच्या आशेची आणि आयुष्याची घटिका मोजावयास घातली आहे––तेव्हा विलंब न करता म्हणा 'जा'. आणि मी गरुडासारखी झेप घेऊन कोसलच्या त्या अत्युग्र भुजंगाचे शाक्यांच्या प्राणास पडलेले भयंकर विळखे तोडून फोडून विच्छिन्न करून टाकतो पहा––पण दंश होण्याचे आधी मला तेथे पोचू द्या–म्हणा, 'जा'!

**बुद्ध** :––भिक्षुवर विक्रम, आपल्यासारख्या तत्त्वज्ञानी संन्यस्त भिक्षूने असें एकाएकी उत्तेजित होऊन उठावे हें आश्चर्य आहे. कांही झालें तरी मला तुम्हाला आमच्या संघाच्या प्रमुखतम भिक्षूला शस्त्रयुद्धांत शस्त्र घेऊन "जा लढा"––असें सांगणें शक्य नाही. संघाची आणि संन्यासाची मूल भित्तीच ज्या कांही प्रतिज्ञांवर अवलंबून आहे त्यांतील आत्यंतिक शस्त्रसंन्यासाची ही शपथ कोणाहि भिक्षूला मी मोडूं देणार नाही.

**विक्रम** :––दुर्दैव राष्ट्राचें कीं ज्यांत हा दुबळा संन्यासधर्मच सर्वोच्च धर्म समजला जाईल ! दुसरें काय ! शाक्यदूत हो, जा आणि राजसभेस सांगा कीं

अदूरदर्शीपणानं आत्यंतिक शस्त्रसंन्यासाची प्रतिज्ञा करणें ही चूक झाली. म्हणून तीमुळे लोककल्याणास अत्यंत हानि पोचत आहे, असें स्पष्ट झालें असताहि ती चूक--स्वतःच्या दृढनिश्चयाचें स्तोम माजविण्यासाठी--सुधारण्यास नाकारणें म्हणजे दृढनिश्चय नसून केवळ दुराग्रह आहे, असें विक्रम सिंहास वाटत असताहि बुद्ध भगवानांची अनुज्ञा नसल्यामुळे त्यांची स्थिति एखाद्या मंत्रबद्ध नागासारखी झाली आहे. त्यास तसे मर्यादेबाहेर हलता येत नाही. शाक्यांच्या रक्षणार्थ खड्ग निष्कोषित करून समरांत शिरण्यास उद्युक्त असताहि तुमच्या सहाय्यार्थ मला येता--

**राजदूत**:--हां, हां ! तें अशुभ वाक्य, तो निर्दय निर्णय, ती राष्ट्रघातक अर्थव्यप्ति पुरी करण्याच्या आधी एक पळभर तरी थांबा ! बुद्धदेवांच्या इच्छेचा शेवटचा शब्द आपण एक श्रवणाने ऐकलांत, पण त्याचे बरोबरच या आर्त, त्रस्त, मरणोन्मुख शाक्य राष्ट्राचाहि शेवटचा शब्द दुसऱ्या श्रवणाने ऐका आणि मग तुमच्या त्या निर्णायक वाक्याचा शेवटचा शब्द बोला ! शाक्य राष्ट्राच्या आत्म्याची ह्या भयानक संकटांतील तळमळ, जिवाची तगमग, त्याच्या शेवटच्या आशेचा तो शेवटचा शब्द व्यक्तविण्याचें सामर्थ्य कोणाहि एका व्यक्तीच्या जिव्हेंत असणें शक्य नसल्याने शाक्य जातींची ही जातीय जिव्हाच आपल्यापुढे ती राष्ट्रीय करुणा भाकील !

(विक्रमसिंहाचा खड्ग काढून त्याजपुढे ठेवतो.)

**विक्रम** :--(दचकून) काय ? हा माझा खड्ग ! हें माझं कृपाण ! चाळीस वर्षें होतील मी संन्यास घेतला तेव्हा हा मी खाली ठेवला ! ह्या खड्गाने मी बारा वेळा शाक्यांच्या शत्रूस धूळ चारली आहे.

**राजदूत** :--सेनापति, त्याच्या मुठीवर त्या बारा विजयांचे स्मारक म्हणून बारा रत्नांचा जडाव चढवून हा आपला खड्ग आमची राष्ट्रीय मत्ता म्हणून आमच्या राज्यसभेंत आम्ही शाक्य सदा लटकत ठेवीत असतो. प्रत्येक नवा सेनापति ह्याला वंदन करून आपले पद स्वीकारतो, तो हा खड्ग ! शाक्यांनी ह्या खड्गास आमचा प्रतिनिधि म्हणून आपणांस संदेश देण्यास, आमची प्रार्थना ऐकविण्यासाठी आणि मन वळविण्यास धाडलेला आहे. शाक्य राष्ट्र जर आता मरणेंच असेल तर निदान वीरोचित प्रतिकार करीत तरी मरावे--पण

पण तेंहि आता आपण हा खड्ग उचलून रणांत अगदी त्वरीत उतराल तरच शक्य ! महाराज, क्षणभर मी जो प्रकार पहात आलों तो डोळ्यासमोर आणा. तीं आमापल्ली, केदनावती, लींबणीय कोसलच्या सैन्यांनी लावलेल्या आगींत गावेंचीं गावें भडकत आहेत पहा ! कडकडा मोडून पडणाऱ्या पेटलेल्या बहालांच्या आणि छपरांच्या खालीं म्हातारे आणि मुलें जिवंत दबून जळून जात आहेत ते पहा ! त्यांच्या मांसाचा तो उग्र वास कोस कोस पसरत आहे ! मारा, हाणा करीत कोसलचे शेकडो सैनिक नागवी तलवार घेऊन भेटेल त्या शाक्यास सपासप कापीत, लुटीत, ठेचीत धावत आहेत पहा ! त्या स्त्रियांच्या थव्यांवर घोडे घातले पाहा, ती मुलें ठिचून गेलीं पहा ! त्या रक्ताच्या चिळकांड्या, तीं मुंडकीं, त्या किंकाळ्या, तो पळ, तो कण्ह !––महाराज, शाक्य राष्ट्र आपलें मूल आहे. हा कसाई विद्युत्‌गर्भ आणि त्याचा दुष्ट सेनानी चंड सुरा घेऊन त्याचे पाठीवर येत आहे ! तें रडतं भ्यालेलें लेकरूं आपल्या कमरेस बिलगत आहे, आपण दया करा, वाचवा !

**विक्रम** :––वाचवतो ! ज्या शाक्य संन्याशाला राष्ट्राची इतकी दुर्दशा चालली असता सुखाने झोप लागते त्याला लागो ! मला तरी ती लागत नाही. भगवन्, ऐकलंत ना सारं ! मग उचलू ना हा खड्ग ?

**बुद्ध** :––संन्यासधर्माच्या, भिक्षुधर्माच्या हें सर्वस्वी विरुद्ध आहे ! ह्याहून मी कांहीच सांगू इच्छीत नाही.

**विक्रम** :––तर मग तुम्ही न सांगता मी अशा त्या दुबळ्या, जातिघातक, मनुष्यहितविरोधक संन्यासधर्माचाच हा संन्यास केला आहे ! हें कर्तव्याचें कृपाण उचललें पहा ! माझ्या शाक्य राष्ट्रा, हे संत्रस्त मनुष्यमात्रहो, राष्ट्रधर्मास्तव, मनुष्यधर्मास्तव, भूतदयेस्तव अपरिहार्य साधन म्हणून हा संन्यासी हें शस्त्र उचलीत आहे पहा ! हें शस्त्र मी अशा परिस्थितींत उचलीत आहे कीं, त्यायोगे विद्युतगर्भाच्या क्रौर्यास पद्‌जित नसलें तरी पंगु करून टाकून सहस्रावधि जीवांस मी वाचवूं शकणार आहें. गेल्या चाळीस वर्षांतील शस्त्रसंन्याशाने मी जितक्या साधूंचें परित्राण आणि जीवांची दुःखापासून सुटका करू शकलो नाही तितकें लोककल्याण ह्या शस्त्रधारणाने मी येत्या चाळीस दिवसात करूं शकेन ! जातों मी. क्षणाक्षणाचा उशीर शाक्यांचा गळा

मरणाच्या फासात अधिकाअधिक गुंतवीत आहे. तरीहि हे चराचरहो, तुम्हीच साक्ष आहांत की, मी लोकहितास प्रसंगीं प्रतिकूल जाणाऱ्या प्रतीकांनी पंगु असलेल्या या संन्यासाश्रमास सोडून जात आहें; ज्या आत्यंतिक अहिंसेमुळे दुष्टांचें परित्राण आणि साधूंचा विनाश होतो ती अहिंसा धर्म नसून प्रत्यक्ष अधर्मच असल्यामुळे मी तिला सोडून जात आहें; भगवान् बुद्धदेवास नव्हे !

• • •

२३०९५

REFBK-0013095